# काव्य-कुसुम-क

## थमोद्भव.

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ९८८
सन १९३३

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

मराठी ग्रंथ संग्रहालय
७०३०

REFBK-0004935

कवि
काव्यकौस्तुभ
यशवंत सदाशिव कोरेकल.
हैद्राबाद दक्षिण.

किंमत १ रुपाया.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं
ता.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.

श्रीसद्गुरु माणिकप्रभू प्रसन्न.

# काव्य-कुसुम-कलिका

## ( प्रथम-उद्भव )

कवि

काव्यकौस्तुभ यशवंत सदाशिव कोरेकल.

मराठी ग्रंथ संग्रहालय

हैद्राबाद, द.

REFBK-0004935

संपादक

एस्. के. दीक्षित,

माणिकनगर

१९३३.

प्रकाशक—एस्. के. दीक्षित,
माणिकनगर, पोस्ट-होमिनाबाद.
जि. गुलबर्गा, निझाम डोमिनियन.

मुद्रक—गणेश काशिनाथ गोखले,
मॅनेजिंग डायरेक्टर, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स
४९५-४९६ शनिवार, पुणें नं. २.

प्रस्तावना लेखक

प्रो. श्रीकृष्ण नीळकंठ चापेकर

एम्. ए. एल्एल्. बी.

श्री

# काव्य-कुसुम-कलिका.

थ

## कलिकाघ्राण

"प्रकीर्णः पुष्पाणां हरिचरणयोरञ्जलिरयम् ॥"—वेणीसंहार

"किंवा असें सौंदर्य बघावें सुरम्य विश्वाचें ।
रम्य कल्पना, रम्य धारणा, देणें देवाचें ॥"

—काव्य-कुसुम-कलिका. (कलिका क्रं. ५८ पृ. १३८.)

'ऋतूनां कुसुमाकरः' या श्रीकृष्णवचनानुसार, परमेश्वरविभूतिरूप अशा वसंत ऋतूत एकाच वेळीं अनेक लहान मोठ्या वृक्षलतादिकांना आपापल्यापरी रम्य, सुगंधयुक्त व विविधरंगभूषित अशा पुष्पांचा एकाच वेळीं बहर येतो; किंवा त्यापैकीं कांहींच्या ठिकाणीं, भावी विकासवैभवसूचक मुग्धमनोहर, अर्धोन्मीलित अशा कलिका दृग्गोचर होतात. त्याबद्दल कोणाहि खऱ्या रसिकास कधीं कंटाळा किंवा विषाद वाटतो काय ! अथवा "काय हो फुलांची जिकडे तिकडे गर्दीच गर्दी ही ! या उद्यानांत फुलांची सांथच आली आहे कीं काय ! येथें सर्वत्र दरवळणाऱ्या विविध सुगंधानीं तर आपलें डोकें अगदीं भणाणून गेलें !' असे अप्रयोजक व उद्वेगजनक उद्गार कोणाही 'स-हृदय' माणसाच्या तोंडून कधीं तरी निघतील काय ! तसेंच मधुरस-पूर्ण विशुद्ध अंतरंगाचीं सुमनें आणि रसग्रहणचतुर असा भ्रमर यांच्यातील निसर्गनिर्मित आप्तसंबंध सुप्रसिद्धच आहे. तेव्हां वेळोंवेळीं अनेक प्रेमळ आप्तांनीं अगत्यपूर्वक निमंत्रित केलेल्या सुहृज्जनाप्रमाणें, एखाद्या उद्यानांत एकच एक भ्रमर क्रमाक्रमानें अनेक प्रफुल्ल किंवा विकासोन्मुख सुमनांच्या सान्निध्यात वरचेवर दिसला तर, 'काय हो लोचट, आधाशी, आगंतुक हा ! आणि हीं इतकीं अनेक सुमनें तरी या एकट्यावरच कां अशीं लुब्ध होऊन तुटून पडतात ! आम्हांला कसें कोणी चुकूनसुद्धां विचारीत नाहीं !'

असे क्षुद्र व मत्सरग्रस्त विचार गांधील माशाप्रमाणें केवळ नागी मारण्याचाच ज्यांचा जन्मजात दुष्ट स्वभाव अशाशिवाय दुसऱ्या कोणाच्याहि डोक्यांत येणार नाहींत. हाच न्याय अलीकडे, अनेक लहान मोठीं खंडकाव्यें, कविता-संग्रह वगैरे प्रसिद्ध होण्याची जी अभिनंदनीय लयलूट चालू आहे तिला आणि, अशा पुस्तकांपैकीं कांहींचा प्रस्तावक होण्याचा 'सूत्रधारी' प्रसंग ज्यांच्यावर वरचेवर येतो अशा माझ्यासारख्यांना लागू आहे. असो.

प्रस्तुत 'कलिका-संग्रह' दोनतीन गोष्टींनीं विशेष लक्षणीय आहे. त्यांपैकीं पहिली गोष्ट अशी कीं, या संग्रहाचे जनक **कविवर्य काव्यकौस्तुभ रा. यशवंतराव सदाशिव कोरेकल** हे सुंदर हस्ताक्षर, चित्रकला, कोरीव व खोदीव कागदी नकशीकाम, गायनवादन इत्यादि अनेक कलांत निपुण; संस्कृत, मराठी, पर्शियन व उर्दू या चारी भाषांवर उत्तम प्रभुत्व असणारे आणि त्या चारी भाषांत मनोहर पद्यरचना करण्याचा काव्यगुण अंगीं असणारे सत्कवि म्हणून मोंगलाईत ऊर्फ निजामशाही मुलुखांत सर्वश्रुत आहेत.

त्यांचा उर्दू काव्यांचा एक संग्रह नुकताच प्रसिद्ध झाला असून, त्यास निजामशाहींतील सुप्रसिद्ध राज्यकार्यधुरंधर व विद्यारसिक **हिज एक्सलेन्सी महाराजा सर किसनप्रसाद बहादुर, सद्र आजम** ( प्रेसिडेंट ) बाबे हुकूमत (एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल) सरकारे-आली, यांच्या हातच्या प्रस्तावनेची अमूल्य जोड लाभण्याचा अपूर्व सन्मान मिळालेला आहे आणि त्यांत महाराजाबहादुरांनीं **काव्यकौस्तुभ रा. कोरेकल** यांच्या कवित्वाविषयीं पुढीलप्रमाणें गौरवोद्गार काढले आहेतः—

"......साहित्यक्षेत्रांतही हे केवळ सैनिक नाहींत तर शाही घोडेस्वारा-( रथी—महारथी )—समान यांची धांव आहे.... यांचा वेदान्तपर संस्कृत ग्रंथांचा व्यासंग बराच आहे. त्याचा परिणाम यांच्या काव्यावर झाला आहे. ......सामान्यतः ब्राह्मणांत साहेबे-दीवान* विरळाच; असले तरी फारच कमी. पण 'नुसरत' साहेबांत ( उर्दू कवितेतील रा. यशवंतरावांचें टोपण नांव ) हें विशेषत्व आहे कीं हे ब्राह्मण, त्यांतहि दक्षिणी ब्राह्मण असून

---

*वर्णाक्षरानुसार अनेक कविता रचून प्रासात्मक क्रमपरिपूर्तता केलेला कवि.

दोन्हीं भाषेतील यांची विचारसरणी अत्युच्च आहे. उर्दूभाषेवर मातृभाषाभिज्ञाइतकेंच यांचें प्रभुत्व आहे.

"...आलमगीर (बादशहा) च्या वेळीं एक शायर (कवि) होते, ज्याचें तखल्लुस ( कवितेंतील टोपण नाव ) " ब्रहेमन " होतें. त्यानंतर ब्राह्मणातून ( काव्यप्रदेशात ) " नुसरत " यांचाच प्रवेश होत आहे.

" .शायरी (कवित्व) नैसर्गिक व जन्मजात असल्यानें यत्नसाध्याचा संबंध यास क्वचितच लागूं पडतो. ईश्वरी प्रेरणाच कवीला कवि बनविते— 'अश्शोअरा तलामिजुर्रहमान' ( कवि परमेश्वराचेच शिष्य ). प्रस्तुत पुस्तक याचें प्रत्यक्ष प्रत्यंतर होय. पाषाणास टाकी देऊन कोणालाहि रत्न बनविता येणार नाहीं. कवित्व हें मनोविकाराचें स्फोरक व अतर्मुखतेचा परिणाम होय. यात फक्त स्वयं स्फुरणाचेंच आविष्करण असतें.....

"...वर जरी काहीं थोड्याच कविताचा निर्देश केला आहे तरी माझ्या मतें यांचा हा सर्व कवितासंग्रहच निवडक समजल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं."

यावरून रा. कोरेकल यांच्या सर्वांगिण चतुरस्रत्वाची वाचकांस चागली कल्पना येईल.

पुणें जिल्ह्याप्रमाणेंच वास्तविक मोंगलाईप्रान्त उर्फ श्रीगोदावरी-तटाचा प्रान्त हाच महाराष्ट्र भाषेच्या विकासाचें व महाराष्ट्राच्या अध्यात्मिक वैभवाच्या उत्कर्षाचें आदिपीठ होय. त्याच भाग्यशाली प्रान्तांत अनेक थोर संत-कवि उत्पन्न होऊन त्यानीं तो प्रान्त देशी भाषेंत अध्यात्मिक उपदेशाच्या घोषानें व सगुणमूर्ति परमेश्वराच्या अनेकविध लीलाचरित्राच्या भक्तिप्रेमवर्धक रसाळ अनुवादानीं व पुण्यपावन नामसंकीर्तनाच्या उद्घोषानें दुमदुमून टाकला; व त्याच्या अनेकविध प्रतिनिनादांनीं आसेतुहिमाचल भारतवर्षही घुमत व गाजत राहिला. कालाच्या अतर्क्य गतीमुळें, व निरनिराळ्या राजकीय घडामोडींमुळें सकल महाराष्ट्राची, प्रचंड धरणीकंपामुळें जमिनींत व जलप्रवाहांत अकल्पित स्थित्यंतर झालेल्या एखाद्या अफाट प्रदेशासारखी स्थिति होऊन, गेल्या दीड-दोनशें वर्षांत महाराष्ट्र व मोंगलाई हें प्रान्त सामाजिक दळणवळण व वाङ्मयविनिमय या दोन्ही

बाबतींत एकमेकांपासून अगदीं पृथक व परके झाल्यासारखे झाले होते. परंतु, सुदैवानें गेल्या पावशतकांत, साऱ्या देशभर जी सर्वांगीण जागृतीची व ऐक्याची लाट पसरली तिच्या योगानें, हे दोन्ही प्रान्त पुनः संयोगीभूमीनें जोडल्यासारखे झाले व त्यांच्यांत विशेष निकट दळणवळण वाढून, परस्परांबद्दलचा ओढा व जिव्हाळाहि जास्त जोराचा झाला आहे. मोंगलाई व महाराष्ट्र या दोन प्रान्तांच्या गेल्या २५ वर्षांतील इतिहास ठोकळ मानानेंहि जोडल्यामुळें आपल्यास ही गोष्ट कोणाच्याहि सहज ध्यानात येण्यासारखी आहे.

या ऐक्यवर्धक प्रवृत्तीचा परिणाम वाङ्मयाच्या क्षेत्रांत विशेषच ठळकपणें दृग्गोचर होतो याचें उत्तम प्रत्यन्तर म्हटलें म्हणजे गेल्या पांचदहा वर्षांत, मोंगलाईतील कित्येक नामांकित महाराष्ट्रीय कवींच्या कवितासंग्रहांची आधुनिक मराठा काव्यवाङ्मयांत चांगली भर पडली आहे हें होय. त्यांपैकीं ठळक नांवें घ्यावयाचीं झाल्यास तीं, संत-सत्कविवर्य दासगणूमहाराज, त्यांचे सच्छिष्य सत्कवि कीर्तनकार देवीदासपंत महाजन, मृदुकोमल व रम्य संगीत गुणोत्कृष्ट काव्यशैलीचे हातकरू कवि 'प्रफुल्लपद्माकरा'चे कर्ते रा. दत्तोपंत पद्माकर, आपल्या काव्यांत खऱ्या प्रतिभेची मधून मधून चमक दाखविणारे 'यादवसुत,' (मुळावेकर), 'वाग्विलास' कर्ते रा. [illegible] —वगैरेंचा हात

वरील कविमंडळी आणि प्रस्तुत 'कुसुमकलिका' चे कर्ते रा. यशवंतराव कोरेकल यांच्यामध्यें, परिस्थितीच्या दृष्टीनें एक महत्त्वाचा फरक आहे. तो हा कीं, बाकीची मंडळी कमी अधिक मानानें सांसारिक धंदे करणारी असली तरी, काव्यरचनेस योग्य अशी बरीच फुरसत व स्वतंत्रपणा याची त्यांस अनुकूलता मिळण्यासारखी आहे. किंबहुना काव्यरचनेचा संबंध शिक्षकाच्या व कीर्तनादि व्यवसायांशीं नित्याचा व निकटचा आणि बऱ्याच अंशीं आवश्यकहि असल्यामुळें, ते व्यवसाय काव्यस्फूर्तीस पोषक, प्रेरक व उपकारक असेच आहेत. पण सरकारी जाबेदारीची नोकरी, आणि तशांत हिशोबी खात्यासारखी आकडेमोडीची डोकें भंडावून सोडणारी नोकरी. ही काव्यरचनेस सर्वथैव मारक व काव्यशक्तीस थिजविणारी अशीच होय. अशी नोकरीहि उत्तम प्रकारें बजावून व सभाळून, इतक्या काव्यरचनेस विपुल

फुरसत काढणें हें काम कवीच्या ठिकाणीं काव्याची खरी हौस व काव्य-शक्तीचा बराचसा उपजत गुण असल्याखेरीज, त्याच्या हातून घडणें शक्य नाहीं.

या दृष्टीनें पहातां, रा. कोरेकल याचा अल्पावधींत निर्माण झालेला तिन्हीचारी भाषांतील विपुल व विविध कवितासंग्रह हा खरोखर आश्चर्य-कारक व कौतुकास्पद आहे यांत शंका नाहीं. याच्या कवितासंग्रहाच्या विपुलत्वाची व विविधतेची योग्य कल्पना खालीं दिलेल्या तपशीलवार कोष्टकावरून वाचकांना पूर्णपणें होईल असें आम्हांस वाटतें. उच्चप्रतीच्या

| काव्यकृति | कविता | श्लोक | चरण किंवा ओळी |
|---|---|---|---|
| काव्य-कुसुम कलिका प्रथम उद्भव (मुद्रित)... | ७५ | ९८६ | ३३७६ |
| ,, ,, ,, द्वितीय-उ. पुष्पाकळ्या ( मुद्रित )... | २३६ | १७३१ | ६७३८ |
| ,, ,, त्रि. उ. सुमनसौरभ (मुद्रण चालू) | ३०० | १६३१ | ६४०७ |
| ,, ,, चतुर्थ उद्भव. ( अमुद्रित )... | २४ | १०१ | ३८१ |
| ,,इतर कविता ( अमुद्रित )... .. ... | ७४ | ३५८ | १०८३ |
| "विरोधवैचित्र्य" नाटकातील पद्यसंख्या — (अमुद्रित) .. ... .. | ३२ | ७१ | २३६ |
| हिंदी कविता .. ... ... | १९ | ११४ | ३०४ |
| उर्दू ( दीवान ) सोज़ोसाज ( उर्फ ) कलाम-नुसरत ( मुद्रित ) .. ... | १२३ | २४६ | ४९२ |
| "करिष्मैइष्क" नाटकांतील पद्यसंख्या ( अमुद्रित ) ... ... | २८ | ७२ | २०६ |
| "इश्तियाके-ताअलीम" नाटकातील " ( अमुद्रित ) ... ... | ११९ | २३६ | ४८४ |
| एकूण— | ११२५ | ५७५२ | १९४०३ |

काव्यगुणाचा विचार जरी क्षणभर बाजूला ठेविला तरी, आमच्यांतील जुन्या साधुसंतादि सत्कवींपैकीं बहुतेकाचा प्रत्येकीं असलेला अफाट

ग्रंथसंख्याविस्तार पाहिला असता, कोणीही सहृदय व विचारी माणूस त्यांच्या अखंड व प्रचंड उद्योगशीलतेविषयीं सादर आश्चर्यानें स्तंभित झाल्याशिवाय रहाणार नाहीं, अशी आमची खात्री आहे. या आदर्शभूत उद्योगपरतेचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे, कवित्वशक्ति किंबहुना, वाणी अथवा शब्द ही एक ईश्वरी देणगी आहे; तेव्हा तिचा विनियोग त्या परमेश्वराच्याच सगुणचरित्रलीलांचें वर्णन करण्याकडे आणि परब्रह्मतत्त्वाच्या निरूपणाकडे करणें हें मनुष्यजन्माचें खरें सार्थक होय, अशी त्यांच्या ठिकाणीं असलेली दृढभावना, हेंच होय. याच परंपरागत भक्तिमूलक भावनेची छटा रा. कोरेकल यांच्या सर्व काव्यकृतींत व तत्संबंधींच्या उद्गारांत सर्वत्र व्यापून राहिलेली दिसून येते; व याच भावनेची प्रेरणा त्यांच्या (रा. कोरेकल) विशाल व कौतुकास्पद काव्यनिर्मितीचें आदि-कारण असल्याची साक्ष त्यांच्या अनेक प्रासंगिक कविता ठळकपणें पटवून देतात.

येथवर रा. कोरेकल यांच्या काव्यरचनेवरून सहज सुचणाऱ्या कित्येक अवांतर व सामान्य पण काव्यचर्चेच्या दृष्टीनें विशेष अगत्याच्या अशा मुद्द्यांचें दिग्दर्शन केलें. आता खुद्द '**काव्य-कुसुम कलिकां**'च्या अंतर्बाह्य स्वरूपाचें थोडक्यात निरीक्षण करूं.

संग्रहांतील कांहीं 'कलिकां' त दर्शविलेल्या निरनिराळ्या रचना कालाकडे दृष्टि दिली असता, या 'कलिकांचा उदय केवळ गेल्या १०।१५ वर्षांपासूनच झाला आहे, असें वाचकाच्या ध्यानात येईल. त्याच्यापूर्वी व नंतरहि कवीचा फारशी, उर्दू हिंदी वगैरेंमध्यें गद्यपद्यात्मक वाङ्मयरचनेचा व्यासंग चालू होता व आहे. तथापि आपल्या प्रिय मातृभाषेंत काव्यरचना करण्याची जी स्फूर्ति झाली तिची आत्मचरित्रवजा मीमांसा कवीनें '**स्फुरद्देवते !**' (पृ. २९:१७ वी कलिका) या कवितेंत सविस्तर निवेदन केली आहे. सदहू कविता एकप्रकारें, कविवर्य रा. **यशवंतराव** यांच्या एकंदर काव्यरचनेच्या धोरणाची व त्यांच्या काव्यशैलींतील विशेषांची निदर्शक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं म्हणून प्रथम या कलिकेंतील महत्त्वाच्या ओळीं खालीं उद्धृत करून मग त्यासंबंधीं जें म्हणावयाचें आहे तें नमूद करूं.

" . . . . ... .. .काळजी।
मदीय हितसाधनीं सतत घालवी काळ जी।
तिच्यापदिं निमग्न कीं सतत राहणें त्यागुनी।
कशास डबकीं बघूं सुगम सोडुनी स्वधुनी ॥ २ ॥
कुणी तरि म्हणे असें 'कितिक आज राष्ट्रें जगीं।
सभाग्य-तरि आजही म्हणचि हें महाराष्ट्र कीं
तिथेंच तव जन्मही-असुनि मातृभाषा तुझी
जिला विबुध मानिती म्हणविते महाराष्ट्र जी ॥ ४ ॥
अमूल्य बघ हे हिरे दवडितोसि निश्वास जे।
करी हरण ती जरा तुजसि न्यावया जी सजे॥
विकोश करण्या तुला टपत काल हा तस्कर।
तुझे असुनि होतसे परि दुजास श्रेयस्कर ॥ ५ ॥
तुझ्यावरि गमे कृपा स्फुरणदेवतेची जनीं।
तदीय यश गाइ रे सतत तें स्वभाषेंतुनी॥
त्वरेंच विसरीं कसा गतकृती अतांपासुनी।
तपें उगिच दोन कीं दवडिलीं असें वाटलें।
प्रसून परकीय जें तव पदीं बलें वाहिलें॥

'परकीय प्रसून" म्हणजे कवीनें फारशी किंवा ऊर्दू भाषेंत केलेली काव्यरचना. बारा वर्षें लागलीं व कितीहि श्रम पडले तरी हरकत नाहीं पण आपण उर्दू भाषेंत एक मोठा 'दीवान' (पर्शियन वर्णाक्षर प्रासांतून क्रमानें लिहिलेल्या अनेक कवितांचा संग्रह) लिहूं अशी कवीनें प्रथम ईर्ष्या धरिली होती. पण वरीलप्रमाणें, स्वभाषेंतच काव्यरचना करण्याची स्फूर्ति मनांत जागृत झाल्यावर, सकल्पित "दीवानाची" रचना अर्धीअधिक पुरी झाली असूनही कवीनें निश्चय केला कीं:—

बघेन नच त्या पुनः चुकुनिही न कीं पाहिलें।
त्वदीय पदिं एकदां मम सुचित्त जें वेंघलें॥

तथापि, कवीला चिंता पडली कीं, आपण इतक्या उशीरां जी स्वभा-

वेंत रचना करू लागणार आहों ती एक प्रकारें, करपलेल्या फुलासारखी किंवा वठलेल्या वृक्षासारखी तर नाहीं होणार! पण लागलीच त्याच्या हृदयांत जागृत झालेल्या स्फूर्तिदेवतेच्याच प्रेरणेनें व वरप्रसादानें, त्याच्या (कवीच्या) चिंतेचा आपोआप परिहार झाला. या संबधाचे कवीचे पुढील दोन श्लोक फार रम्य व काव्यपूर्ण आहेत; ते असे:—

अशा करपल्या फुलां कधि सुगंध कां येइल !
विशुष्क मनवृक्ष हा नच गमे फलें देइल ॥
जरा न मनिं वाटलें मज मिळेल उद्गातृता ।
परि तव कृपाच कीं करित शक्त ही सर्वथा ॥१०॥

प्रदग्ध हृदयास कीं करिशि तूं क्षमा तत्क्षणीं ।
कृपामृत-तुषारही त्वरित त्यावरी सिंचुनी ॥
नवीन मृदु पल्लवा, मधुर रम्य पुष्पां झणीं ।
सुनिश्चयफलां अशां उगविलेस तूं मन्मनीं ॥११॥

या उद्धृत केलेल्या थोड्याशा श्लोकावरून देखील कविमित्र यशवंतराव व त्यांच्या काव्यशैलीची साधारण कल्पना रसिक वाचकास आल्यावांचून रहाणार नाहीं. त्याची शब्द रचना प्रौढ व सहजोधी आहे. कविता लहान असो कीं मोठी असो, प्रासगिक असो कीं विचारप्रेरित असो, तिच्या उत्तमपणाची मुख्य कसोटी म्हटली म्हणजे, त्या कवितेंत कवीच्या मनःपूर्वकतेची व त्याच्या उत्कट भावनेची जाणीव वाचकास ( श्रोत्यास ) स्पष्टपणानें झाली पाहिजे. या गुणाच्या दृष्टीनें पाहता, प्रस्तुत 'कलिका-संग्रहां'तील बहुतेक 'कलिका' त्यांतील विषयाशीं कवीचें पूर्ण तादात्म्य व तदनुषगानें त्याच्या मनात सहजगत्या लागोपाठ येत गेलेले विचारतरंग किंवा कल्पनाचिल्कार, या गोष्टींच्या चांगल्या निदर्शक आहेत. फळा-वरून झाडाची किंवा कार्यावरून कर्त्याची कल्पना करावयाची, या न्यायानें, कवीच्या वृत्तीचो अटकळ करू म्हटल तर, प्रस्तुत 'कलिकां'वरून, कवीची स्वाभाविक विचारशील व मननप्रिय मनोवृत्ति व भोंवतालच्या रम्य निस-र्गाचें आणि कवीचें अनकविध सांसारिक अनुभवांचें सूक्ष्म निरीक्षण करून त्यापासून योग्य तो बोध घेण्याची व तो बोध इतरांच्याहि मनात पटवून

देशाची हातोटी, ईश्वराची 'वाङ्मयी पूजा' करण्याविषयींची त्याची भक्तिप्रवण सौजन्य, उत्कट व अढळ निष्ठा इ० कवीच्या अंतःस्थित गुणांचा प्रत्ययहि वाचकास आल्यावांचून रहात नाहीं.

खुद्द कवीनेंच आपल्या कवितातील मुख्य विषयांचें व स्फूर्तिदेवतेच्या अंतःप्रेरणेनें होणाऱ्या उत्साहसंचारक अनुभवाचें, आनददायक संवेदनाचे— 'गुदगुल्याचें'—वर्णन वर सांगितलेल्या "स्फुरद्देवते"त असें केलें आहे:—

'......म्हणोनि घडली पहा अशि दशाब्द सेवा तुझी।
प्रभुस्तवन ही कधीं स्वमनभावसूक्तावली।
निसर्गमय वर्णनें-तरिहि तीं तुला अर्पिलीं॥ १२॥
अनेक विषयांतुनी सकल चाळिली ही मही।
सुतत्त्व मधुसार तें म्हणुनि कांहिं अध्यात्मही॥
जसें मजसि प्रेरिलें लिहित मी, न गर्वाकुल।
असे सकल काव्य हें तुझिच दिव्यता उज्ज्वल॥ १३॥
तव स्फुरण तें अहा! लव न हालतां डोलतां।
कसें कवन निर्मितें त्वरित चालतां बोलतां॥
स्वयें सतत जागवी हळु हळूं मला टोंचुनी।
अशक्त वच, होति त्या गुदगुल्या कशा आंतुनी॥ १४॥
कधीं स्फुरणशक्ति ती मजसि सांगते कीं पहा।
कशी मधुर कल्पना! सरस शब्द कैसे अहा!॥
असाच जरि राखिशी बसुनि वृत्तिसातत्य कीं।
कितीक कवनोत्पलां बघशी रम्य काव्योदकीं॥ १५॥

या अवतरणातील 'स्वमन–भाव–सूक्तावली' 'सुतत्त्व मधुसार तें म्हणुनि कांहिं अध्यात्महि' हीं पदें विशेष अर्थपूर्ण वाटतात. त्या पदांच्या योगानें कविवर्य यशवंतराव यांच्या ठिकाणीं जुन्या मराठी काव्याचें भक्तिपरतेचें व अध्यात्म–प्रधानतेचें ध्येय, आणि प्रसंगोपात कवीच्या मनांत उद्भवणाऱ्या निरनिराळ्या भाव-भावना आणि विचार-कल्पना-तरंग यांच्या आविष्काराचें आधुनिक मराठी कवितेचें ध्येय, या दोहोंचें मधुर मीलन

वसत असल्याची उत्तम साक्ष पटते आणि नुकतेंच वर म्हटल्याप्रमाणें, हीच गोष्ट प्रस्तुतचा एकंदर 'कलिका-सग्रह' वरवर चाळून पहाणाऱ्याच्या देखील सहज प्रत्ययास आल्यावाचून रहाणार नाहीं अशी आमची खात्री आहे.

मराठी वाङ्मयाच्या सध्याच्या सक्रमणावस्थेत, जुन्या नव्या काव्य-वाङ्मयाच्या, अशा मधुर मीलनरूप अथवा उभयान्वयी काव्यशैलीचे निदर्शक असे जे फारच थोडे—एकाच हाताच्या बोटानीं मोजतां येण्याजोगे कवी—आधुनिक कवींच्या मालिकेंत दाखवितां येतील, त्यांत माझे सन्मान्य कवि-मित्र कै. "अनत तनय" याच्याप्रमाणें, प्रस्तुत 'काव्य-कलिका' सग्रहाचे कर्ते "**काव्य-कौस्तुभ**" **कविवर्य यश-वंतराव कोरेकल** यांचीहि खात्रीनें प्रामुख्यानें गणना केली पाहिजे असें माझें मत आहे. ही गोष्ट जोर देऊन येथें सागण्याचें विशेष कारण आहे तें हें कीं, सध्यांच्या मराठी काव्यवाङ्मयांत ज्यांना नवीन धर्तीच्या म्हणून समजण्यात येतें अशाच केवळ कविता प्राय: ज्याच्या वाचनात व ऐकण्यांत येतात, त्यांचें लक्ष आधुनिक मराठी काव्याचें हें जें मधुर मीलनात्मक अथवा उभयान्वयी स्वरूपाचें महत्त्वाचें अग सांगितलें त्याच्याकडे सहसा वळत नाहीं. त्यामुळें त्याची काव्यरसास्वादाची दृष्टि एकदेशीय व आकुंचित स्वरूपाची बनते व तितक्या मानानें, ते खऱ्या व व्यापक स्वरूपाच्या काव्यरसास्वादास आपण होऊन मुकतात! कधीं कधीं दहीं आबटजहर निघाल्यामुळें श्रीखंड, दिसावयास मनोहर असूनही, कंपदायक व त्याज्य ठरतें! किंवा, नुसत्या मिष्टास बासुदीच्याच सदा सेवनानेंहि तोंडास कधीं कधीं मिठी बसते, किंवा पचनास ती जड जाते. परतु आम्ल व मधुर यांच्या योग्य प्रमाणशीर संयोगानें तयार केलेला सुधारस केव्हांही सुधा-तुल्यच वाटणार! तोच न्याय सर्वस्वीं नव्या धर्तीच्या किंवा सर्वस्वीं जुन्या धर्तीच्या, काव्यांमधील तारतम्यास लागू पडतो. ही महत्त्वाची गोष्ट दोन्ही काव्य-पद्धतींपैकीं कोणत्या तरी एकाच पद्धतीविषयीं निरतिशय अभिनिवेश बाळ-गणाऱ्यांनीं विशेषेंकरून ध्यानात ठेवणें इष्ट आहे. असो.

सुदैवानें गेल्या १०।१५ वर्षांत नव्या जुन्या कवितेसबंधाचा वाद

बराच मदावल्यासारखाच झाला आहे. या अवधींत आपल्या देशांतील निरनिराळ्या विश्वविद्यालयांतून मराठीच्या पद्धतशीर व शास्त्रीय चिकित्सा-युक्त अध्ययनाची प्रथा विशेष जारीनें सुरू झाली; आणि तिच्यांतील अभ्यासक्रमाच्या द्वारें, आधुनिक तरुण पिढीस, आधुनिक कवितेबरोबरच जुन्या मराठी कवींच्याहि काव्याचा प्रत्यक्ष परिचय व रसिकतायुक्त ज्ञान होऊं लागलें. तसेंच खरें वाङ्मय व खरें काव्य याच्याबद्दलच्या यथार्थ व सर्वांगीण कल्पनाचे इष्ट संस्कार आमच्या होतकरू व विचारी विद्यार्थी-वर्गाच्या मनांवर आपोआप घडत आहेत. त्या योगानें स्वतःस आधुनिक कवितेचे भोक्ते व प्रणेते म्हणविणाऱ्या कित्येकाकडून जुन्या मराठी कवी-विषयीं व त्यांच्या भक्तिप्रधान काव्याविषयीं जे अज्ञानपूर्ण स्वाभिमानशून्य व बाष्कळपणाचे प्रलाप ऐकू येत असत, त्यांना चांगलाच आळा बसला आहे; आणि आता आधुनिक पद्धतीच्या काव्याभिमान्यास जुन्या मराठी कवितेविषयीं तादृश्य प्रेम किंवा आदर वाटत नसला, तरी प्रत्यक्ष अध्ययनानें मनावर झालेल्या साहजिक सात्त्विक संस्कारामुळें आणि एकंदर सामान्य जनांत जी स्वाभिमानपूर्ण जागृति झाली आहे तिच्या प्रभावामुळें, पंधरा वीस वर्षांपूर्वीच्या काळांतल्यासारखे जुन्या मराठी काव्याविषयीं निरर्गल व स्वाभिमानशून्य उद्गार काढणें अशक्य झालें आहे. तसेंच, 'प्रतिभा' 'प्रतिभा' म्हणून ओरडत सुटून, तिच्या नांवाखालीं भाषादोष, भाषा-दारिद्र्य व कल्पनादैन्य यानीं संपूर्ण व्यापलेल्या अशा वाटेल त्या आधु-निक धर्तीच्या लहान-मोठ्या कवितेचा बडिजाव माजवायचा; आणि प्रौढ व संस्कारयुक्त रचनाशैलीचें, रम्य व बोधप्रद कल्पनाचें जुन्या धर्तीचें कितीहि उत्तम काव्य असले तरी, त्यांत 'प्रतिभा' नाहीं म्हणून त्यास नाकें मुर-डायचीं, याहि लब्धप्रतिष्ठितपणाला आता कोणी विचारी मनुष्य मान तुकवीत नाहीं. अकल्पित व दैवी स्फूर्तीनें एकदम उज्ज्वल व अपूर्वरम्य कल्पना ज्या कवीला सुचतात तोच खरा प्रतिभावान कवि होय, हें जरी खरें असलें, तरी अशी खरी प्रतिभा म्हणजे कांहीं दारची भाजी नव्हे; किंवा आततायीपणामुळें, त्राग्यामुळें व हट्टवादीपणामुळें प्राप्त होणारी क्षुद्र भिक्षाहि नव्हे हेंहि तितकेंच खरें आहे. श्रीव्यास-वाल्मीकि, कालिदास-भव-

भूति, होमर-शेक्स्पीअर वगैरेसारखे खरे प्रतिभावान महाकवि फार विरळाच उत्पन्न होतात. म्हणून अशी खरी प्रतिभा जरी दुर्मिळ असली तरी, अशा प्रतिभावान कवींच्या महाग्रंथाचें अध्ययन करून व सूक्ष्मनिरीक्षण, रसिक कल्पनाशक्ति, मर्मग्राही विचारसरणी आणि मनास उत्कटपणें स्फुरलेल्या कोणत्याहि विषयाचा यथोचित व रम्य पद्यरचनाद्वारें आल्हादकारक आविष्कार करण्याची हातोटी—इत्यादि स्वतःच्याहि ईश्वरदत्त गुणांचा विकास करून निर्माण होणारें काव्य—ज्याला 'प्रज्ञा-प्रेरित' काव्य अशी मी संज्ञा देतों—हेंदेखील प्रतिभाप्रेरित काव्याच्या इतकेंच किंवा फार तर त्याच्या खालोखालच्या योग्यतेचें काव्य आहे. कोणत्याहि भाषेच्या वाङ्मयांत अशा 'प्रज्ञाप्रेरित' काव्याचाच अंश बराचसा असतो; आणि स्वतःचा बुद्धिविलास व स्वतःचें आणि इतरांचेंहि उन्नत आत्मरंजन या दोन हेतूंनीं प्रेरित झालेल्या अनेक कवींच्या स्वयंस्फूर्त काव्यनिर्मितीनेंच सगळ्या जगास आल्हाद व आराम देऊन, त्याची बौद्धिक व आध्यात्मिक उन्नति करून त्याचा 'उद्धार' करणारा असा हा कवींचा 'व्यापार'–सतत व्यवसाय–अनादिकालापासून चालत आलेला आहे; इत्यादि गोष्टींचें ज्ञान कमी-अधिक मानानें सध्यांच्या सर्वसाधारण जनतेंत हळुहळू बरेंच प्रसृत होत चालल्याचें दिसत आहे, ही मोठी आनंदाची व समाधानाची गोष्ट आहे.

प्रस्तुत 'काव्य कुसुम-कलिका' हा कविता संग्रहहि 'प्रज्ञा-प्रेरित' काव्याच्याच स्वरूपाचा आहे. यांत एकंदर पाऊणशें कलिका आहेत; आणि त्यांचें वर्गीकरण स्थूलमानानें (१) भक्तिप्रधान व ईश्वरगुणवर्णनात्मक, (२) निसर्गवर्णनपर, कवि व काव्य, ( ३ ) अध्यात्म-तत्वचिंतनात्मक व नीति-प्रतिपादनपर, ( ४ ) प्रासंगिक मनोवृत्तिप्रदर्शक, असें करितां येईल.

खरी 'प्रतिभा' काय किंवा खरी 'प्रज्ञा' काय–दोन्ही ईश्वराच्याच कृपाप्रसादसूचक देणग्या आहेत; आणि या देणग्या कमीअधिक मानानें आवळ्याजावळ्या बहिणींसारख्या आहेत. म्हणजे या दोहोंपैकीं कोणत्याहि एका शक्तीचें एखाद्या कवीच्या काव्यांत अधिक अस्तित्व दिसून आलें, आणि तिला जर वडील बहीण असें मानलें, तर दुसरीहि शक्ति तिच्या पाठोपाठ व तिच्या अनुषंगानें तिच्याबरोबर नेहमीं वास्तव्य करीत असलेली दिसावयाची असें म्हणण्यास हरकत नाहीं.

लहान मुली अथवा यौवनोन्मुख तरुणी स्वभावत:च जास्त जिज्ञासु, उल्हसित वृत्तीच्या व भोंवतालच्या गोष्टींचें सूक्ष्म निरीक्षण करण्यांत व त्यांतील मर्म चट्‌कन् ग्रहण करण्यांत फार चतुर असतात. त्याप्रमाणेंच, या दोन्ही देणग्यांचा अंश अंगीं वास करणाऱ्या कवीनेंहि त्या शक्तींचा उपयोग, भोंवतालच्या विविधरम्य निसर्गाचें सूक्ष्म अवलोकन करून त्याचें हुबेहूब व काव्यमय रीतीनें मोहक वर्णन करण्यात आणि जगातील प्रत्येक सचेतन-अचेतन वस्तूपासून स्वयंस्फूर्तीनें जो सहजगत्या अनेकविध बोध मिळतो, त्याचेंहि आकर्षक रीतीनें आविष्करण करण्यात केला पाहिजे. हेंच खऱ्या कवीचें लक्षण, ध्येय व ब्रीद होय. या तत्त्वाची प्रस्तुत कवीला उत्तम जाणीव आहे, हें त्याच्या–आरंभीं उद्धृत केलेल्या अर्थपूर्ण पक्तींत आहे.

मनाचा स्वाभाविक कल आणि परंपरागत कुलसंस्कार, परिस्थिति व शिक्षणादि अन्य सामग्री या सर्वांचा संयुक्त परिणाम म्हणून, कवीची काव्य-प्रवृत्ति मुख्यत: अध्यात्म चिंतनपर असून, शिवाय प्रत्येक बाह्य पदार्थ अथवा लोक व्यवहाराचीं निरनिराळीं दृश्यें यांच्या बुडाशीं असलेलें तत्त्व शोधून काढण्याविषयीं आणि त्यावर विशेष भर देऊन तदनुसार आपल्या कवितेला स्वरूप देण्याविषयीं सदातत्पर व अखंड अभ्यासानें चतुर बनलेली अशीहि ती दिसून येते. याच्या उत्तम निदर्शक कविता म्हटल्या म्हणजे क्रमांक ८— 'स्वांतद्रष्टा कवि' ( पृ० १४ ), क्र. १६ ' मनुजा; ' क्र. १७ ' स्फुर-देवते ! ' क्र. २३, २५, २७, २८, २९, ३०, ३५, ४८, ६७, ६८, ६९, ७०. अर्थात् या चिंतनपर कवितांतील ब्रह्म, माया, जीवात्मा, कर्म, पुनर्जन्म वगैरे संबंधाच्या कल्पना उपनिषदान्तर्गत वेदान्ताशीं किंवा आमच्या श्रीज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, वामनपंडित, रामदास वगैरे संत-कवींच्या आध्यात्मिक ग्रंथांचा थोडाबहुत परिचय असणाऱ्यांना जरी सामान्य व नेहमींच्या अशा वाटल्या तरी, कवीनें ज्या निरनिराळ्या विषयांच्या व प्रसंगांच्या अनुरोधानें व ज्या विशिष्ट रीतीनें त्यांचा उपयोग केला आहे त्या योगानें त्या कल्पना कांहीं ठिकाणीं विशेष परिणामकारक, बोधप्रद व आनंद-दायक झाल्या असल्याचें दिसून येईल. या दृष्टीनें पाहिलें असता ' स्वांत-द्रष्टा कवि' ही कविता आटपशीर, रम्य व उत्कट परिणामकारक वाटल्या-

वांचून राहणार नाहीं. विशेषत: तिच्यातील २ ते १६ श्लोक हा भाग रचनेंतील भाषालालित्य व सोत्साह आवेश याच्या दृष्टीनें फारच सुंदर साधला आहे. त्यांतील दोनतीनच मुद्दाम उल्लेख करण्यासारखे आहेत. उदा०—

जो सदा राहतो कल्पनेच्या नभीं ।
आत्मविश्वासिं जो पूर्ण कोणां न भी ॥
आपुलें चालवी नित्य कोठेंहि हा ॥
सर्वदा तृप्ति, आनंद भोगी पहा ॥ २ ॥

दिव्य सौंदर्य हा जेथवां पाहतो ।
तेथ तद्रूपता सजुनी राहतो ॥
स्वात्मतत्त्वीं सदा मग्न हा राहुनी ॥
भोगितो स्वांतदष्टत्व-ही-उन्मनी ॥४॥

मेदिनीं राहतो, स्वर्गिंचें जाणतो ॥
अंबरीं वागतो, जी सर्व धावतो ॥
दृष्टिनें पाहतो जें मनीं लक्षितो ॥
रेथिचें तेंच तो होउनी राहतो ॥ ७ ॥

दिव्य पीयूष ऐसें कधीं वर्षवी ॥
दग्ध वृक्षां फुटे तत्क्षणीं पालवी ॥
दु:ख दैन्यादिकां घालवी, मालवी ॥
हर्ष, आनंद, भाग्योदया दाखवी ॥ ९ ॥

प्रेम ठेवोनिया गोड बोलोनियां ॥
सर्व भूतीं दया वागणूकीं नया ॥
सर्वदा राखवी, लोक संतोषवी ॥
नीववी, हांसवी, डोलवी, नाचवी ॥ १० ॥

जाणतो जो जगां दीर्घ स्वप्नापरी ॥
आत्मविश्वास जो ठेवितो अंतरीं ॥
ज्ञानरूपींच तो होउनी राहतो ॥
स्वांतदष्टत्व हें सौख्य तो भोगितो ॥ १६ ॥

केवळ पाश्चात्य किंवा इंग्रजी वाङ्मयावरून ज्यांच्या 'खऱ्या कवी' विषयींच्या कल्पना बनल्या असतील, त्यांना वरील श्लोकांत, जणू काय आपल्याच कल्पनांचा अनुवाद केला आहे असें वाटेल; परंतु वस्तुतः या कल्पना म्हणजे, कवीच्या अंतरंगांतील उज्ज्वल अध्यात्मदीपाच्या बाह्य प्रभेची इंद्रधनुष्यांतील मनोहर रंगांसारखी विविध-रम्य छटाची हीं कमनीय वलयं आहेत.

याशिवाय, कोणत्या ना कोणत्या तरी काव्यगुणाच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें विशेष लक्षणीय अशा कविता म्हटल्या म्हणजे क्रमांक ३, ७, ९, १२, १३, ६१ ६४ व ६५ या कविता होत. कवितांचे विषय 'मातृप्रेम,' 'प्रेमाचे बोल,' 'ओढा' अशासारखे सकृद्दर्शनीं नेहमींचे असे वाटणारे जरी असले, तरी त्यासंबंधीचें विचारप्रदर्शन करण्यात कवीचें जे वैशिष्ट्य दिसून येतें, त्यामुळें त्या त्या विषयांना एकप्रकारचें नाविन्य प्राप्त होऊन त्या त्या विषयाचें महत्त्व अभिनव व आनंददायक रीतीनें वाचकांच्या मनावर ठसतें. उदाहरणार्थ—'प्रेमाचे बोल' यांतील पहिलीच आर्या पहाः—

**प्रेमाच्या साम्राज्यीं प्रेमाची प्रार्थना कधीं नसते।**
**विनती, इच्छा, आज्ञा, तिहींची एकरूपता असते॥**

किंवा या दोन आणखी आर्याः—

**बोलावें हृदयानें प्रेमाला भाषणें न कामाचीं।**
**मृण्मय मूर्ती सजवा! हेमाला भूषणें नको साचीं॥५॥**

**प्रेमप्राकारांतिल आदर्शसम दुजें न दाखवितें।**
**नुसतें नच तें असतें, प्रतिबिंबीं बिंब तेंच कीं दिसतें॥७॥**

(पृ० १५६)

याचप्रमाणें 'मातृप्रेम' या सर्वपरिचित विषयासंबंधीं रम्य, अभिनव कल्पनायुक्त पुढील दोन तीन श्लोक पहाः—

**झंझावात बळेंच जात गगनीं धूळीस कीं घेउनी**
**पाहोनी नयनें न धीर धरिते तत्काल ही मेदिनी—**

चिंतेनें कृश होय, या अनुभवा आली जशी कीं मही ॥
भूमातेविण या विशाल जगतीं दूजी नये एकही ॥ १ ॥

( पृ. १५२ )

सेवा सह्य न बालकांकडुनियां केव्हांहि इच्छी न जी ॥
बाळांना सुखवावयास अपुल्या सौख्यां सुखानें त्यजी ॥
स्वीकारी अति साभिमानहृदयें निःसीम दास्यत्व जी ॥
त्रैलोक्यांतहि एक मातृसम ती व्यक्ती न आहे दुजी ॥९॥

( पृ. १५३ )

मातेपासुनि दूर ओढुनि बलें पर्णादि धूलीस हा ॥
नेलें अंबरिं वायुनें जरि तया वात्सल्य तीचें पहा ! ॥
वाळूचा अति सूक्ष्म एक कणही जाऊं न दे अंबरीं ॥
एका मांडिवरूनि कीं उचलुनी ठेवीत दूजीवरी ॥ २० ॥

( पृ. १५५ )

कित्येकांना, ' दसरा ' ' दिवाळी ' ' सक्रान्त ' ' होळी ' वगैरेसारख्या सणावाराच्या प्रासंगिक कविता पाहिल्या कीं, अंगावर कांटा उभा राहिल्यासारखें किंवा अंगाची 'होळी' झाल्यासारखें वाटतें ! अर्थात् सणासुदीच्या दिवशीं केवळ कुळधर्म म्हणून, बऱ्या-वाईट कशा तरी पुरणपोळ्या केल्याच पाहिजेत, किंवा संक्रान्तीला ' बाजारविक्री 'साठीं, अर्थात् मासिकादिकांच्या दसरा दिवाळी-सक्रान्तीच्या वगैरे खास अंकासाठीं गोडधोड, ओबडधोबड कसा तरी हलवा तयार केलाच पाहिजे, अशाच दृष्टीनें व हव्यासानें ( कुंथन-काव्यत्वजा ! ) ' येन केन प्रकारेण ' ज्या कविता निर्माण झालेल्या दिसतात, त्याच्यासंबधानें कांहीं वाचकाची अशी स्थिति होत असल्यास त्यांत कांहीं अस्वाभाविक किंवा दूषणीय नाहीं ! परतु अशा प्रासंगिक कविता म्हणजे सरसकट टाकाऊ, किंवा अशा कविता करणें म्हणजे हीन कविवृत्ति अशी जर कित्येकांची समजूत असेल तर ती मात्र सर्वस्वीं चुकीची होय. इतकेंच नव्हे तर, वास्तविक पाहतां, हे सण, त्यांची उत्पत्ति आणि त्या त्या दिवशीं करावयाचे विशिष्ट विधि व रूढाचार यांमध्यें खऱ्या उज्ज्वल

प्रतिभेच्या व व्यापक प्रज्ञेच्या कवीला प्रतिवर्षी नूतन स्फूर्ति देणारीं आणि त्याच्या 'अभिनवान्वेषी' बुद्धीची ( Originality ) व कल्पकतेचीं सालोसाल कसोटी पहाणारीं अशीं कितीतरी अपूर्व, आल्हादकारक काव्य-बीजें भरलेलीं आहेत; आणि परिचित आकड्याच्याच साहाय्यानें जशीं नवीं नवीं कौतुकास्पद किंवा कूट अशीं असंख्य उदाहरणें निर्माण करतां येतात, त्याप्रमाणेंच, खऱ्या प्रतिभाशाली किंवा प्रज्ञावत कवीलाहि अशा सणा-दिकांच्या वार्षिक आगमनप्रसंगीं, तत्संबंधाच्या परिचित शब्दादिकांचा आणि विधी व रूढी यांचा 'रहस्योद्ग्राही' पद्धतीनें त्यानें कांहीं काल मनांत विचार घोळत ठेविल्यास, त्याला प्रतिवर्षी सहज-रम्य अशा नव्या नव्या कल्पना सुचल्याशिवाय रहात नाहींत, असें आम्ही स्वानुभवानें म्हणूं शकतों. मात्र, नुकतेंच वर सूचित केल्याप्रमाणें दरखेपेस म्हटल्या वेळीं अशा कल्पना सुचल्याच पाहिजेत, असा त्यानें अट्टाहास धरणें किंवा खरी नाविन्यदर्शक कल्पना सुचली नसताहि, सुचेल ती कल्पना 'आपली' म्हणून उत्तमच असा अभिनिवेश धरणें केव्हांहि उचित होणार नाहीं. सारांश, अशा प्रासंगिक कविता, हा कवीच्या दृष्टीनें त्याच्या बुद्धिसंघर्षास उत्तेजक असा उपयुक्त व आनंदप्रद बुद्धिविलास असून, शिवाय अशा कवितांच्या द्वारें आपल्या समाजातील स्वाभिमान, उदात्त संस्कृति वगैरेंचें महत्त्व व वैशिष्ट्य रम्य रीतीनें साधारण जनतेच्या मनावर ठसविण्याचें कार्य यथाशक्ति करणें हेंहि त्याच्या व्यापक काव्यव्यवसायाचें एक जिव्हाळ्याचें व सुपरिणामकारक कर्तव्य आहे, अशी आमची दृढ श्रद्धा आहे. म्हणून अशा तऱ्हेचे प्रयत्न करणाराचें आम्ही केव्हांही अभिनंदन करण्यास उत्सुक असतों.

हें काव्याच्या व्यापक परिणामाच्या दृष्टीनें विवेचन झालें; परंतु याहीपक्षा, खुद्द काव्याच्याच दृष्टीचाहि एक विशेष अगत्याचा मुद्दा सांगा-वयाचा आहे. तो हा कीं, अशा परिचित विषयासंबंधीं करण्यांत येणाऱ्या प्रासंगिक कवितांनीं व त्यांतील साधारण वाचकाच्याहि सहज ध्यानांत येणाऱ्या, शब्दादिकांवरील कोट्यांनीं त्यांना आपोआप काव्यास्वादाची गोडी लागते आणि कोणी मनुष्य सुबुद्ध व कल्पक असला कीं, "एक गहू

प्रकार बहू ' या म्हणीप्रमाणें एकाच परिचित विषयासंबंधीं किंवा शब्दासंबंधीं, प्रत्येक खेपेला कशा नव्या नव्या, आनंददायक व उन्नत बोधप्रद कोट्या सहज मजेदार रीतीनें करूं शकतो आणि तद्द्वारां तो स्वतःच्या व इतरांच्या सामुदायिक आनंदात कशी भर घालूं शकतो, या अनुभवाचाहि साधारण जनतेस जणुं काय 'वस्तुपाठ' मिळाल्यासारखा होतो! या गोष्टीचें उत्तम प्रत्यंतर म्हणून आपले कविमित्र यशवंतराव कोरेकल यांच्या 'संक्रांती'च्या कवितेंतील पुढील अगदीं साधीसुध्या पण सांसारिक व्यवहारासंबंधीं रम्य-उपरोधगर्भ व करुणरस-समिश्र, उदात्त अर्थपूर्ण अशा दोनच आर्या उद्धृत करतों; त्या ह्या :—

**पोष्टानें तिळगुळ कीं पत्रीं तत्काळ तो पाठवितो ।**
**जो जीव जिवलगास्तव तिळतिळ कीं तुटत हेंचि दाखवितो ॥११॥**

**'मगरमिठी' मारावी म्हणतो कीं मकरसंक्रमण तळिं ।**
**परक्यालाहि पडावा पोटांतिल प्रेम पाहुनी पीळ ॥ १२ ॥**

या दोन्ही आर्यांत केवळ शाब्दिक कोटीबाजपणा नाहीं. स्वतःच्या पोटास प्रसंगविशेषीं अंतस्थरीतीनें चिमटा घेऊनहि पोष्टानें 'तिळगुळ' धाडण्यासाठीं पैसा खर्च करण्याची तयारी असणें, यांत सध्याच्या मध्यम स्थितींतील साधारण जनांची अंतस्थ आर्थिक विपन्नता मोठ्या सूक्ष्म–रम्य व करुणरसोत्कट रीतीनें सुचविली असून प्रेमाच्या शुष्क अवडंबरासाठीं पैसाहि खर्च करण्यास तयार नसणाऱ्या 'ओष्ठ–प्रेमी' (Lip-sympathiser) केवळ शब्दांतच प्रेमाची रेलचेल उडवून देणाऱ्या कजुष कवडीचुंबकांवरहि मोठा मार्मिक उपरोधगर्भ कोरडा उडविला आहे! 'मकर–संक्रमण' या शब्दांतील 'मकर' शब्दाच्या अनुरोधानें सुचलेली 'मगर–मिठी'ची कल्पना कांहींकांस सकृद्दर्शनीं रम्य वाटेल, तर कांहींना, प्रत्यक्ष 'मगरमिठी'च्या प्राणघातक अनिष्टत्वाच्या स्मरणानें ती कल्पना किंचित् न्यूनत्वपूर्ण वाटेल. दुसऱ्या आर्येचा दुसरा अनुप्रासयुक्त चरण मात्र अगदीं सहजगत्या व फार झोंकदार रीतीनें पडला असून त्या योगानें कवीच्या मूळ कल्पनेचें चांगलें उद्दीपन झालें आहे!

कविवर्य कोरेकल यांच्या कवितेचें स्वरूप ठोकळ मानानें म्हणावयाचें झाल्यास, पद्यरचनेच्या व विचारप्राधान्याच्या बाबतींत जुन्या धर्तीचें आहे. म्हणजे आताच दर्शविल्याप्रमाणें बरेचसे काव्यविषय अध्यात्मपर, चिंतनात्मक, लोकव्यवहारप्रदर्शक व नीतिप्रतिपादक असून, पद्यरचनाहि बऱ्याच अंशीं वृत्तनिबद्ध आहे. अर्थात् संस्कृत, प्राकृत अध्यात्मपर ग्रंथ आणि जुनें संस्कृत पंचमहाकाव्यादि वाङ्मय आणि श्रीज्ञानेश्वर, नामदेव, तुकारामादि संतकवि आणि मोरोपंत, वामनपंडित, श्रीसमर्थदास वगैरे जुने सत्कवि यांची काव्यरचना यांच्या अध्ययनानें, जुन्या धर्तीच्या म्हणजे पहिल्या पिढींतील गणेशशास्त्री लेले, लोंढे, लेंभे, अनंततनय, रे० टिळक प्रभृति कवींच्या कृतींत उतरलेले जे विशेष दृग्गोचर होतात, ते कविवर्य कोरेकल यांच्याहि काव्यरचनेंत दिसून येतात. ते म्हटले म्हणजे, शार्दूलविक्रीडित, शिखरिणी, मंदाक्रान्ता, पृथ्वी, स्रग्धरा वगैरे मोठमोठ्या पल्लेदार वृत्तांत सहजौघी व सफाईदार रचना करण्याचें कौशल्य, भारदस्त व प्रौढ रचना, प्रसंगानुसार रचनासौष्ठवास बाध येऊं न देता, किंबहुना त्यास परिपोषक अशा रीतीनें मोठमोठीं सामासिक पदें अधुनमधुन योजणें, शब्दादिकांवर सहजरम्य श्लेष व कोट्या करणें; नेहमींच्या परिचित कल्पना मार्मिक कल्पकतेनें किंचित् निराळ्या स्वरूपांत मांडून त्यांत नाविन्याची छटा आणणें इत्यादि गुणांची प्रतीति कोरेकल यांच्या प्रस्तुत 'सुमन–कलिकां' चें वरवर आघ्राण करणाऱ्यासहि झाल्यावांचून रहात नाहीं. निरनिराळ्या विषयासंबंधीं, मोठमोठ्या वृत्तांतील त्यांचा ५०–७५ श्लोकसंख्येपर्यंतसुद्धां सहज लीलेनें विस्तार पावत गेलेला अस्खलित रचनेचा ओघ पाहून आणि 'विषयमूलकेच्छाततीं' (पृ. ३), मनोऽब्धिसंवर्धिनी–' 'नर्मेंदुनयनोत्सवे !' (पृ. ४२; ) 'काव्यरसाश्रयकोकिलकूजन ''(पृ. ३); विगतनिद्राविद्वज्जनां (पृ. १३); 'शांतसुमनोगंधासवें' (पृ. १३) 'सिंहावलोकनन्यायें' (पृ. ५१) वगैरेंसारखीं लांबलचक सामासिक पदें सहजगत्या योजलेलीं आढळून आलीं म्हणजे मनास फार कौतुक वाटतें यांत शंका नाहीं. पण यांच्याच बरोबर आधुनिक काव्यें बऱ्याच अंशीं वाचनीय व आकर्षक होण्याचें जें मुख्य कारण त्या काव्यांचा आटोपशीरपणा, आणि काव्यांतील मर्मग्राही

कल्पना थोडक्यांत व उत्कट रीतीनें संकलित करून व्यक्त करण्याची हातोटी—या दोन गुणाचा अभावहि बऱ्याचशा कवितात जाणवल्यावांचून रहात नाहीं, त्यामुळें कित्येक कवितांचा मूलभूत विषय काव्योत्कट असूनही केवळ रचनेच्या प्रमाणातिरिक्त प्रदीर्घतेनें त्यास शिथिलता व क्षीणता येऊन, रसिक वाचकाचा फार हिरमोड होतो. यांचीं ठोकळ उदाहरणें म्हटलीं म्हणजे पृ. १०२ ते १०८ पर्यंत, पुरीं सात पृष्ठेंपर्यंत लांबलेली 'व्यर्थ जगत नाशिवत एकचि सत्यप्रभु अमुचा' व पृष्ठ १४३ ते १४८ पर्यंत लांबलेली 'आला पूर खरा परतु समजा ओढा पुनः कोरडा—' या दोन कविता होत. दोन्ही कवितांचे विषय वस्तुतः उद्बोधक व महत्त्वाचे आहेत. परतु त्यांतील तत्त्व विशद करण्याकरितां म्हणून किंवा विशेष परिणामकारक रीतीनें वाचकाच्या मनावर ठसवावें म्हणून, त्यांत अनेक दृष्टान्तांची व इतर कल्पनांचीं लांबलचक माळच्या माळ गुंफल्यामुळें ५–२५ कडवीं व श्लोक वाचल्यावर चांगल्या रसिक वाचकाच्याहि मनःस्वास्थ्याचा भग होऊन त्यास कवितेच्या लांबटपणाबद्दल विषाद वाटून ती शेवटपर्यंत वाचण्याइतकी त्याची मनःशान्ति न राहतां तो मध्येच ती कविता सोडून देतो. अर्थात् या कविता मूलतः लोकप्रियतेनें अर्जन करण्याच्या दृष्टीनें लिहिल्याच नसून केवळ आत्मविनोदार्थ केलेला हा बुद्धिविलास आहे असें समर्थन करण्याचा कदाचित् कोणास मोह पडेल! तरी अखेर, समर्थन तें समर्थनच! तें केव्हाहि रसिक वाचकाचें समाधान करण्याच्या बाबतीत 'समर्थ न' असेंच म्हटलें पाहिजे.

हें सर्व सांगण्याचा मुख्य उद्देश्य हाच आहे कीं, कविवर्य रा. कोरेकल यांची काव्यशैली जरी जुन्या धर्तीची म्हणजे विस्तारशील तिकडे झुकणारी आहे हें खरें, तरी ही बाब वगळल्यास, 'कलिकें' तील कांहीं विषय आधुनिक कवितेच्या धर्तीवर असून, त्या विषयांची केलेली मांडणी व कल्पनाविष्काराची पद्धत ही आधुनिक 'गीतकां' च्या (Lyrics) रचनेशीं बऱ्याच अंशीं जुळणारी आहे. याचीं कांहीं उदाहरणें हवीं असल्यास मार्मिक वाचकांनीं, सामान्यतः पहिल्या आठ कविता, नंतर क्रमांक ११ व १३ ते १५, १७ वगैरेंसारख्या कवितांचें स्वरूप व ध्येय याचा थोड्याशा

वारकाईनें विचार करावा, म्हणजे आमच्या म्हणण्याचें मर्म त्याच्या चट्कन लक्षांत येईल.

येथवर, 'कलिका' संग्रहकर्त्या कवींची रचनाशैली आणि विषय-प्रतिपादनाची धाटणी याच्याविषयीं सांगितलें. आतां जुन्या धर्तीच्या काव्य-रचनेचा व्यासंग करणाराच्या रचनाशैलींत जे कित्येक दोष अपरिहार्य रीतीनें प्रायः समाविष्ट झालेले दिसतात त्यांचा प्रथम सोदाहरण निर्देश करतों. त्यांतील पहिला दोष हा कीं, बरेचसे संस्कृत शब्द जुन्या काव्यवाङ्मयांत सरसहा व वारंवार येऊन गेल्यामुळें श्रवणरूपानेंच परिचित झालेले असतात; त्यामुळें त्यांची व्याकरणदृष्ट्या शुद्धाशुद्धता किंवा घटनेची युक्तायुक्तता यांकडे जुन्या संप्रदायाच्या कवींचें तादृश लक्ष जात नाहीं किंबहुना, कवित्व हा एक उत्कट भक्तिप्रेरित सात्विक व्यवसाय असून, केवळ तो ईश्वरार्पण करण्याचीच दृढ भावना जुन्या सांप्रदायिक कवींच्या ठिकाणीं असल्यामुळें शुद्धाशुद्धतेच्या विचारास, तादृश नव्हे तर मुळींच, महत्त्व देण्यांत येत नाहीं. उलट, अशी शुद्धाशुद्ध पहाण्याची दृष्टि अभाविक-पणाची किंवा शुष्क विद्वत्तेच्याच अभिमानाची दर्शक होय, असेंही मानण्या-कडे जुन्या लोकांचा कल दिसतो. तें कसेंहि असो, अशा वृत्तीनें काव्य-रचनेंत राहून जाणारे ठोकळ दोष म्हटले म्हणजे संस्कृतांतील संधि-नियमा-कडे अजिबात दुर्लक्ष, संस्कृत व प्राकृत शब्द मिळून होणारे संमिश्र समास भाववाचक प्रत्ययाची द्विरुक्ति, चांगल्या रसोत्कट व सौष्ठवयुक्त शब्दांशेजारीं रसापकर्षक शब्द किंवा कर्णकटु दुर्बोध सामासिक पद इ० होत. यांचीं तुरळक उदाहरणें प्रस्तुत संग्रहात आलीं आहेत, तीं हीं:—'लुब्धवी,' 'दिव्यवात्सल्यता,' 'आर्तआक्रंदनाकृष्ट,'' 'दिन' ('दीन' याऐवजीं), 'बुरसटलेलीं,' 'लवेक' ('लवैक' याऐवजीं), 'झोंबाझोंबी,' 'आशाळती,' 'नवाजीवन' ('नवजीवन' हा विशेष रूढ व श्रवणमधुर शब्द), 'आमा-निशी' (अमावास्येची रात्र), 'यशस्विता' रजनी (पृ. ४९) ('यशस्विनी' हा शब्द अभिप्रेत असावासा वाटतो), 'मनांदोलिका,' 'शिरादोलिका' (मूळ संस्कृत शब्द 'मनस्' व 'शिरस्' असे सकारान्त आहेत, हें प्रसिद्धच आहे),

'निमग्नमय' ( ' निमग्न-प्राय ' हें रूप शुद्ध व सयुक्तिक ), 'शांतिदानी,' ( शांतिदायिनी " हें विशेष सुबोध व काव्यानुकूल रूप ), 'अभ्र-गोळ्यां' ( पृ. ६२ ) 'विषय-बर्फजलें' ( पृ. २२), 'गप्पा हांकित ही' (पृ. ३२) अर्थात् वर म्हटल्याप्रमाणें हे दोष केवळ आगंतुक व गौण स्वरूपाचे होत. तसेंच उर्दू व मराठी यांच्या निकट व नित्य संमिश्रणामुळें काव्यरचनेंतहि 'बेशिस्त,' भिस्त,' 'सोडि बिछान्याला' असे काव्यरसापकर्षक शब्द कांहीं ठिकाणीं आले आहेत, तेहि याच न्यायानें क्षम्य व उपेक्षणीय समजले पाहिजेत. याखेरीज दुसरी एक शोचनीय गोष्ट म्हटली म्हणजे पुस्तकांत राहून गेलेल्या मुद्रणदोषाचें मोठें प्रमाण ही होय. कवि, छापखाना व कवीच्यातर्फे अधिकृत रीतीनें मुद्रितें तपासण्याचें मित्रकृत्य करणारा एखादा स्नेही या सर्वांचा प्रत्यक्ष अभाव नसला तरी, स्थलाच्या दृष्टीनें या तिघांच्या वास्तव्यासंबंधी कांहीं अशी ' त्रिस्थळी 'सारखा प्रकार झाल्यामुळें प्रस्तुत पुस्तकांत मुद्रण-तपासणीच्या पुष्कळच ढोबळ नजरचुका राहून गेल्या आहेत ! अर्थात् ही गोष्ट अपरिहार्य असल्यामुळें कवि, मुद्रक व मुद्रित-निरीक्षक यांपैकीं कोणालाच दोष देणें युक्त होणार नाहीं. हें जरी खरें असले तरी, प्रत्यक्ष पुस्तकाच्या निर्दोषपणासंबंधाचा हा प्रकार मात्र, घरात तीन प्रेमळ वडील माणसें असूनही, तीं आपल्या संसारी कामांत गढून गेल्यामुळें, पाळण्यांत असलेल्या गोजिरवाण्या अपत्याकडे त्याचें बराच वेळ मुळींच लक्ष जाऊं नये, त्याची उपासमार व्हावी अशासारखा झाला आहे, असें त्रयस्थांस वाटण्याचा पुष्कळच संभव आहे, हेंहि तितकेंच खरें आहे. परंतु सहृदय वाचकांस या बाबतींतील ही वस्तुस्थिति कळल्यावर ते या मुद्रण-दोषाच्या विपुलतेकडे क्षमशील दृष्टीने पहातील अशी आमची खात्री आहे. म्हणूनच आम्हीं या गोष्टीचा येथें जाता जातां ओझरता निर्देश करीत आहोंत; असो.

आतां शेवटीं, ' आम्राणचें ' मुख्य व आनंददायक कार्य जें या ' कालिकां'तील कांहीं रम्य स्थलांचें दिग्दर्शन वाचकांस सादर करण्याचें, त्याकडे वळतों.

कवितेचा शेवट उत्कट अथवा परिणामकारक होणें, हा जो महत्वाचा

काव्यगुण, त्याचीं कांहीं उदाहरणें—' खरा अमर कवि तो ' याचें शेवटचें कडवें--

' गात असे आर्धींच महानि जो, मृत्युहि ज्यास भितो ।
त्याचें गाणें कधिं का मरतें, ' खरा अमर कवि तो ' ॥ ८ ॥
( क्र. ४, पृ. ७ ).

क्र. १२ ' कीं वेडे सगळे मिळोनि जगतीं बाजार हा मांडिती ' ।

या कवितेतील शेवटचे दोन श्लोक ( १८।१९ ) व दुसऱ्याचा शेवटला चरण "प्राप्तेच्छा प्रिय वस्तुचीं धरुनियां प्राणी पुनः जन्मतो"–पृ.२७.

' स्फुरद्देवते !'तील शेवटले दोन श्लोक ( ३३।३४ )

' अनुग्रह तुझा असो मम शिरीं ' जरा हें म्हणूं ।
बळेंच तुज सारुनी मज विभक्त मी कां गणूं ॥
सुनिश्चितपणें असे तव कृपाहि आधींच ती ।
तव स्तवनिं सज्ज ती म्हणुन जाहली मन्मति ॥ ३३ ॥

" कधीं न रणगर्जना श्रवणिं ती कशी ऐकिली ।
अजूनि रणभूमि ना, जननि गे ! कधीं पाहिली ॥
गमे तुजसि आवडे म्हणुनि नांव तें ठेविलें ।
अधींच यशवन्त कीं करुनि, मागुती निर्मिलें ॥३४॥

क्र. ६७ ' मानव-महति ' आर्या ३९।४०:—

" नरतनुच्या नौकेला सगुणोपासक सुकाणुं लावावें ।
सज्जनसंगसमीरें सहज सुलभसे सुमार्ग साधावे ॥३९॥
गुरुकर्णधार-साह्यें भवसागरिं तरुनि जाय सहजगती ।
धन्यचि ते नर होती साधुनि इह यश सुकीर्तिसह जगती ॥४०॥

सहज–रम्य, अर्थपूर्ण वाक्यें, उक्ति इत्यादि:—

( १ ) जाणणें नेणणें दोन्हि लोपे जिथें ।
स्वांत-द्रष्टा सदा राहि मोदें तिथें ॥ पृ. १६ ॥

( २ ) स्वानुभूतित्व ही ज्या स्थलीं लोपतें ।
हेंच कीं स्वांतदृष्टत्वकैवल्य तें ॥ पृ. १७ ॥

( ३ ) अमितदृश्यहि दृष्टीत मावतें ।
स्मृति-निधीतलिं संतत राहतें ॥
फिरुनि येत असें मनिं तेंच तें ।
म्हणुनि आवडतें अपुलेंच तें ॥ ३ ॥ पृ. २१

( ४ ) प्रभुपदास सदा हृदयांतरीं ।
बसविल्यासचि तो विजया वरी ॥
अतुल होईल हो सुख सत्वरीं ।
सदनिं वा वनिं वावरला तरी ॥ ९ ॥ पृ. २२

सुंदर काव्यमय कल्पना—

( ५ ) शोकावेग न साहवे म्हणुनियां जैशा स्त्रिया भावड्या ।
बांधोनी कटिला शिला झडकरी कूपांत घेती उडया ॥
तैशी घेइ जणूं उडी घनतमीं सौदामिनी भूवरी ।
रात्रीं नित्य किती तरीहि अवनीं नक्षत्रही त्यापरी ॥ ९ ॥
पृ. २५

( ६ ) ज्याचें स्वागत सार्वकाल करण्या निःसीम भक्तांपरी ।
सेवा-तत्पर राहिले तरु जणूं एकाच पायावरी ॥ १५ ॥
पृ. १५४

( ७ ) पाहुनिया वाटे कीं नर देहानी अशी उभी रचना ।
ऊर्ध्वगती सिद्धचि कीं परि हा इकडे कधींहि पाहिच ना ॥९॥
पृ. १६०

( ८ ) कां उगि द्यावा दोष कुणाला ।
व्यर्थ कशाला दुःख मनाला ॥
कां दुसऱ्याला कीं अपुल्याला ।
मानहि द्यावा दैवगलाला ॥

( ९ ) येतो प्रश्न अशा फुला बघुनियां तेथें पुनः येथुनी ।
स्थानापन्न करूं शकेल कधिं का वृक्षच्युतातें कुणी ? ॥

क्रमांक ३८ 'कवींची बैठक,' ५९ 'एकादशीला शिवरात्र-भेटे,' ७१ 'नांवाची नवलाई,' ७२ 'नावाचे नामधारक' या कविताहि आपापल्यापरी मजेदार, चटकेवजा असून, त्यात हास्यरस व क्वचित् करुण-रस यांच्या छटा चांगल्या उतरल्या आहेत. 'रंगवल्लिका' व 'सामर्थ्य-दर्शक' या कवितांची धाटणी केशवसुतांची 'रांगोळी घालतांना पाहून' व ९० टिळकांची 'पुरें जाणतों मीचि माझें बल' या कवितांची सहज आठवण करून देते. तथापि, प्रसंगविशेषीं कवितेचे विषय दुसऱ्या कवींच्या कवितांवरून सुचले असले तरी, खऱ्या काव्य प्रवृत्तीचा कवि त्यांसबधीं आपलें वैशिष्ट्य कसें दाखवूं शकतो, याहि गोष्टीची वरील कवितांत चांगली प्रतीति येते. 'श्रीसद्गुरु माणिकप्रभु' यांच्या विषयींच्या कवितांत, रा. कोरेकल यांची भक्तीची उत्कटता, श्रीसद्गुरूच्या ठायीं असलेली निर्भर निष्ठा, अध्यात्मिक कल्याणाभिमोक्षाची लागलेली तळमळ व श्रीसद्गुरूंच्या इहलौकिक वियोगानें झालेली मनाची आर्त व शोकविव्हल स्थिति इत्यादिकांचें काव्योत्कट व हृदयस्पर्शी प्रतिबिंब उतरलें आहे.

नमुन्यादाखल इतकीं उद्धृत केलेलीं काव्यस्थलें व त्यांविषयींचें विवेचन बस आहेत, असें आम्हास वाटतें. या थोड्याशा उदाहरणावरूनदेखील, सत्कविवर्य 'काव्यकौस्तुभ' यशवंतराव कोरेकल यांच्या या काव्य-कुसुम-कलिका कशा विशद व विशुद्ध स्वरूपाच्या, उत्कट व मधुर सुगंधपूर्ण, नित्याल्हादकारक आहेत याची सामान्य कल्पना रसिक वाचकवर्गास बऱ्याच अंशीं आली असेल, अशी आम्हास आशा आहे. वास्तविक स्वतःसिद्ध गुणास निराळ्या शिफारशीची मुळींच आवश्यकता नसते, आणि चांगल्या सुवासिक फुलांच्या सुगंधाचा आमोद केवळ निरपेक्ष रीतीनें स्वतात आमोद सांठवून घेऊन इतरांतहि त्याचा तितक्याच निरपेक्ष सौहार्द बुद्धीनें प्रसार करण्याचें व्रत असणाऱ्या वाऱ्यामुळेंच कमलादि पुष्पाशीं निसर्गसिद्ध ऋणानु-बंध असणारे रसग्रहणचतुर भ्रमर त्यांच्याकडे धाव घेतात असें नाहीं व वाऱ्यासहि तसा अभिमान मुळींच वाटत नाहीं ही गोष्ट प्रसिद्धच आहे. वाऱ्याला स्वतः सुदैवानें प्राप्त झालेल्या पुष्पाघ्राणयोगाचें समाधान वाटत असतें व तेंच सुवासाचें समाधान आपल्या मंदमंद व सौम्य लहरीद्वारा

इतरांसही अदृश्यरूपानें व निरपेक्ष तादात्म्यवृत्तीनें करून देण्याचा तो निसर्ग-प्रेरित शक्तीनें प्रयत्न करीत असतो; व त्यानें त्याचें स्वतःचें समाधान तरी दुणावत असतें. हाच न्याय, सत्कविवर्य काव्यकौस्तुभ कोरेकल यांचा आतां प्रसिद्ध होत असलेला काव्यकलिकासंग्रह आणि 'आघ्राण' रूपानें त्या संग्रहाचें यथाशक्ति दिग्दर्शनवजा गुणाविष्करण व गुणग्राही रसिक वाचक-वर्गास सादर करणारा प्रस्तुत लेखक, याच्या बाबतींत लागू आहे. म्हणून आतां अधिक कांहीं न लिहितां, फक्त या 'आघ्राणा'च्या बाबतींत सत्कविवर्य रा. कोरेकल यांनीं माझ्याविषयीं अपूर्व सौहार्द व दीर्घकाल प्रतीक्षेच्या बाबतींत जी निःसीम सहिष्णुता दाखविली, तिच्याबद्दल मी त्यांचें मनःपूर्वक कृतज्ञतापूर्ण आभार मानतो आणि श्रीशारदेच्या कृपेनें त्यांच्या 'काव्यकौस्तुभा'ची उज्ज्वल व सात्विक प्रभा आपल्या या प्रिय महा-राष्ट्रभूमीवर अधिकाधिक सर्वत्र प्रसृत होऊन ती रसिकांच्या गौरवयुक्त आदरसत्कारास निरंतर पात्र होवो अशी मनःपूर्वक इच्छा व्यक्त करून हें 'आघ्राण' कार्य येथें पुरें करतों.

दुरितांचें तिमिर जावो। विश्वस्वधर्मे सूर्यें पाहो।
जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात॥

—श्रीज्ञानेश्वर.

पुणें, फाल्गुन वद्य त्रयोदशी,
शुक्रवार, शके १८५४
ता. २४।३।३३

श्री. नी. चापेकर.

॥ श्रीगुरु माणिक ॥

# प्रकाशकाचे चार शब्द

अत्यंत प्रिय व्यक्तींत एकानें ग्रंथकर्तृत्वाची कामगिरी पार पाडली कीं दुसऱ्यावर प्रकाशनाची जबाबदारी साहजिकच येते, व तें प्रिय कर्तव्य आनंदानें पत्करण्यास मी तयार आहे.

प्रस्तावनेनंतर प्रकाशकाला कांहीं लिहिण्याची जरूरी नाहीं. पण हा हक्काचा प्रश्न आहे व मौज अशी आहे कीं प्रकाशकानें पुस्तक प्रसिद्ध करी-पर्यंत स्वतः प्रस्तावना–लेखकासही मोकळेपणानें आस्वाद घेण्याचा हक्क पोंचत नाहीं. कमी श्रमाचा पण जिव्हाळ्याचा हा प्रश्न आहे व याचें सर्व स्वारस्य भावनेंत आहे. एखाद्या वस्तूचें अनावरण करण्याचा जो प्रघात आहे त्यांतलाच हा प्रकार आहे. आरंभीं व्यवस्थापकांनीं परिश्रम केल्या-नंतर खास अनावरणाकरितां त्यावर बिनश्रमाचा झिरझिरीत पडदा टाकला जातो व अनावरण करणारी व्यक्ति समयोचितपणें एखाद्या वेळीं स्वहस्तानें पडदा सारून किंवा तोंडींच प्रदर्शन खुलें झाल्याचें जाहीर करते. प्रदर्शन खुलें झाल्यानंतर तें पाहण्याचा जसा सर्व जनतेस हक्क पोंचतो तसा पूर्वी पोंचत नाहीं, व त्यांत गोडीहि पण नाहीं. जेव्हां जेव्हां काव्यें निर्माण झालीं तेव्हां तेव्हां जवळपासच्या रसिकांनीं ऐकिलीं आहेत, इतस्ततः मासिकांतून प्रसिद्ध झालीं आहेत, कांहीं हरवलीं आहेत, पण सार्वत्रिक रसिकांना आमंत्रण देण्याचा विधि प्रकाशनाखेरीज सांग होणार नाहीं. शिवाय ग्रंथकर्त्यांला प्रकाशकानें सही करून ग्रंथ हातानिराळा करी-पर्यंत कृत–कृत्यता लाभत नाहीं. म्हणून अनावरण जाहीर करण्यापूर्वी एक दोन आवश्यक बाबींना उल्लेख करूं.

प्रस्तुत काव्य कुसुम-कलिका या पूर्वींच विकसित व्हावयाच्या पण बराच कालावधि लागला, त्या कालावधीची सर्वसाधारण अशी कारणमीमांसा देत बसण्याऐवजी त्या कालांत कविवर्य काव्यकौस्तुभ रा. रा. कोरेकल यांनीं काव्याचा निदिध्यास जागृत ठेऊन व भरीव काव्यनिर्मितीचा व्याप संभाळून उर्दूसारख्या परक्या भाषेमध्यें, तज्ज्ञांकडून प्रशस्ति पावत असलेला "दीवान" लिहून स्फुट देवतेंतील "सदोद्यतहि दों करें नमन हें असो गे तुला" ही स्वोक्ति सव्यसाचित्वानें आचरून काव्य–देवतेला विजय-शाली नमन केल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें अवश्य आहे; व त्यामुळेंच

या प्रकाशनानंतर लागोपाठ आजवर मराठींत अनुपलब्ध असलेलें व परिश्रमपूर्वक तयार केलेलें संस्कृतातील बव्हशी उपलब्ध वृत्तांतून मराठी कवितेचें पुस्तक प्रसिद्ध होत असून कवीच्या काव्यविलासाचा तिसरा भागही लवकरच प्रसिद्ध होईल हें कळविण्यास उत्साह वाटतो.

काव्य गुणगुणण्याची उपजत प्रवृत्ति प्रतिभा होय, पण तिला "नवनवोन्मेषशालिनी" करण्याकरिता अखंड तपस्येची अवश्यकता असून त्या तपस्येवर काव्याची प्रभा अवलंबून असते. काव्य ही स्वयंस्फूर्ति दैवायत्त आहे. तिचें स्फुरण स्मृतिरूप व बीजभूत असल्यानें जसें स्फुरतें तसें परिस्फुट पावण्याजोगें नसतें, कारण तें नग्न-सौंदर्य होय ज्या अंतःकरणावकाशात त्याचा विकास व्हावयाचा त्यावर स्वायत्त पौरुषाच्या अभ्यासानें लालित्य, रमणीयता, भावोत्कटता व विलासाचे मार्मिक विक्षेपादि गुणाचे सत्कार करावे लागतात. अशा दृढ अभ्यासानें प्रतिभेची कूस प्रसादपूर्ण व संपन्न होत जाते आणि या श्रीमत गर्भांतून निपजणारा काव्य-शिशु प्रसन्न, चेतोहर व आकर्षक होतो. उद्धाची काव्यनिर्मिति प्रभावशाली असते असें म्हणतात त्याचा अर्थ व्यावहारिक संपत्तीनें श्रीमत असलेला उद्ध असा नसून काव्याभ्यासाच्या संपत्तीनें त्याला श्रीमत झाले पाहिजे असा होय. व्यावहारिक श्रीमत आपल्या इच्छापूर्तीचीं साधनें जशा संपत्ति-बलावर सहज सज्ज करून घेऊं शकतो तद्वत् या श्रीमत कवीच्या काव्याचा सहजौघ प्रास, यति, यमक, छंद, उपमा, उत्प्रेक्षा, अलंकार, शब्दसौष्ठव इत्यादि काव्याच्या हौसेचीं साधनें सहज लीलेनें पुरवू शकतो. मात्र काव्याची हौस कविस्वभावावर अवलंबून असल्यानें कविता चांगली व्हावयाची म्हणजे कवीनें चांगले झालें पाहिजे, व ते दोष कवीनें स्वतांतून नाहींसे केले पाहिजेत, कारण कवीला आपल्या अंतःकरणांतील कोणतीही भावना कवितेपासून अलिप्त ठेवता येत नाहीं. या विषयाचा अधिक विस्तार प्रस्तावनेनें लक्षित असल्यामुळें अधिक लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

इंग्रजी शिक्षणांतून ज्या अनेक पद्धतींचें अनुकरण आम्हीं केलें आहे त्यांतलीच-आपल्या पुस्तकाची प्रस्तावना स्वतः लिहिण्याची किंवा दुसऱ्या सन्माननीय व्यक्तीकडून लिहविण्याची-पद्धत आहे. उपयुक्तता

व चिकित्सक दृष्टीनें ती सरस वाटते. अपरिचित व्यक्तीशीं बोलतांना आपण प्रथमदर्शनीं ज्या भावनेनें स्वतःची ओळख करून देतो तीच भावना प्रस्तावनेंत अभिप्रेत असते. प्रेमी युगुलांचें नेत्रोन्मीलन होण्याबरोबर हृदयांत वाहणाऱ्या विषयाची प्रस्तावना उभयताच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेनें उदित असते व तिचा अभ्यास उभयता अनिमिष लोचनानें करतात; पण तो अभ्यास एकांगी असल्यानें प्रस्तावनेची गोडी पुढें टिकत नाहीं हें वेगळें ! प्रस्तावनेच्या शुद्ध अर्थाकडे पाहिल्यास ईशसृष्टींत सुद्धां तत्वप्रकाशनापूर्वी प्रस्तावना असते असें दिसून येईल. सूर्योदयाची प्रस्तावना अरुण करतो, विस्तीर्ण सरित्तट अमृतनिर्झरिणीची प्रस्तावना करतो. पावसाची प्रस्तावना करतांना वायूची कोण गर्दी उडते ! तात्पर्य सर्व विषय संपूर्ण स्वरूपांत उदित होण्यापूर्वी जी आगामी लक्षणें दाखवितात तें प्रस्तावनेचें शुद्ध स्वरूप होय. स्वतःच्या पुस्तकाची प्रस्तावना स्वतःच लिहिली तर ज्या ग्रंथाच्या वाचनावरून ग्रंथकर्त्याची मनोभूमिका तयार झाली त्यांतील महत्त्वाच्या विषयाचें विशदीकरण, संदर्भ, ग्रंथाचा नामनिर्देश, ग्रंथ रचताना आलेल्या अडचणी व तो हातानिराळा होईपर्यंतचा प्रसंग, आणि ग्रंथरचनेस प्रोत्साहन देणाऱ्या व साह्य करणाऱ्याबद्दल कृतज्ञता, इत्यादि गोष्टींचा त्यांत समावेश होतो. पण ती दुसऱ्यानें लिहिली कीं त्यांत त्यांना ग्रंथातील अभिजात विषयाचें मार्मिकतेनें व प्रामुख्यानें विवेचन करावें लागतें, व हें परीक्षण जितक्या काळजीनें झालें असेल त्या मानानें ग्रंथकर्त्याची सुधारणा होण्यास कारणीभूत होते. शितावरून जशी भाताची परीक्षा करतां येते तद्वत् अशा प्रस्तावनेनें वाचक ग्रंथाभिमुख होऊन विस्तारतः संपादलेला विषय थोडक्यांत पारखून घेऊं शकतो.

सदरहु ग्रंथाची प्रस्तावना महाराष्ट्र सारस्वतातील सर्वमान्य विद्वान् कसलेले लेखक, साहित्याचार्य श्री रा. रा. प्रोफेसर **श्री. नी. चापेकर** M. A, LL B. यांनीं आस्थेनें व प्रेमानें लिहून दिल्यामुळें वर दर्शविलेल्या प्रस्तावनेच्या उद्देशाचें पूर्णतेनें सार्थक झालें आहे. या त्यांच्या बहुमोल ऋणातून अंशतः उत्तीर्ण व्हावें म्हणून त्यांचे सादर कृतज्ञतेनें जितके अधिक आभार मानावेत तितके थोडेच आहेत.

यानंतर प्रसिद्ध होणारे दोन भाग इतक्या लवकर प्रकाशित होण्यासारखे नसते तर या उद्धातील " व्यर्थ जगत " व " ओढा पुन्हा कोरडा' या कविता कमी करण्याचा विचार होता पण प्रथम काव्यनिर्मितीचा नमुना म्हणून त्या तशाच ठेविल्या आहेत. काव्याची आस देत गुगत राहणारा भोंवरा कवीला बराच वेळ फिरता ठेवता येतो व दृगीला भासमान् होणारे का यावश्यक पदार्थ उत्प्रेक्षा रूपानें आपल्या काव्यात ग्रथित करून घेण्याचा सराव कवीला कसा आहे हे यावरून निदर्शनास येतें. कवीच्या मोजक्या कविता वेगळ्या काढून त्याचा मनावेधक पुष्प-गुच्छ करता आला असता, पण सुंदर पुष्पगुच्छाची तयारी करतांना वाङ्मयोद्यानातून नाना तऱ्हेच्या, विविधरंगाच्या, भिन वासाच्या अशा अनेक पुष्पांनीं आपली अंजली भरून घ्यावी लागते. येथें त्या अंजलींतील फुलें ज्या मनसोक्त भावनेनें खुडलीं तितक्याच अकृत्रिमपणें तिचा निक्षेप जनताजनार्दनपदीं केला आहे. शिवाय त्रितीयोद्धगांतील प्रगल्भ कवितेशीं या आरंभींच्या कविता ताडून पाहिल्यास कवीच्या काव्याभ्यासाचा इतिहासही टळकपण दिसून येईल.

कविता ही कवीची कन्या आहे व स्वतःची मुलगी कितीहि सद्गुणसंपन्न असो मासरच्या मंडळीकडून तिचा गुणगौरव झाल्याशिवाय आईबापाच्या डोळ्यात धन्यतेचे अश्रू येत नाहींत. उभयकुलाचा उद्धार तिच्या हातीं असल्यानें मुलापेक्षां मुलींना अधिक सुसंस्कृत करण्याची जबाबदारी रसिक कवीवर व त्याचप्रमाणें समाजावरही आहे.

उत्कृष्ट प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल पुन्हा एकवेळ प्रोफेसरसाहेबांचे, व छपाईचें काम सुंदर करून दिल्याबद्दल श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्सचे सेक्रेटरी श्री. गोखले यांचे आभार मानून व कवीचे " नवोनवो भवति जायमानो " या वैदिक मंत्रानें अभीष्ट चिंतून हें कवितेचें सदावर्त रसिक पथिकांकरता निरंतर खुलें झाल्याचें जाहीर करतों.

संस्थान माणिकनगर
ता. १५-६-३३
मा. श. ११५ गुरुवार.

शं. के. दीक्षित.
कारभारी,
सं. माणिकनगर.

# काव्य-कुसुम-कलिका प्रथम-उद्धांतील कलिकांची अनुक्रमणिका.

| कविता क्रमांक | कवितेचें नाव. | श्लोक संख्या | चरण ओळ | वृत्त किंवा चालीचें नांव. | पृष्ठ | प्रकाशन स्थळ व काल. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ॐ नाद. | २ | ८ | वृत्त–शा. वि. | १ | |
| २ | तुझ्यासम कवी कधीं जन्मती ! | ८ | ३२ | ,, पृथ्वी. | २ | |
| ३ | रंगवल्लिका. | ८ | ३२ | चाल–चंद्रिका. | ४ | |
| ४ | खरा अमर कवि तो. | ८ | ३२ | ,, ,, | ६ | |
| ५ | एकांति तूं विश्रांत. | ८ | ३० | ,, आन पडी दरबार. | ८ | तत्वज्ञानमंदिर. पौ. १८५१ |
| ६ | निसर्ग मधुहास्य. | ६ | २४ | वृत्त–पृथ्वी. | ९ | |
| ७ | होणार तें होउ दे ! | १० | ४० | ,, शा. वि. | १२ | |
| ८ | स्वातंत्र्य कवि. | २० | ८० | ,, स्रग्विणी. | १४ | |
| ९ | सामर्थ्य सप्तक. | ७ | २८ | ,, मंदारमाला. | १८ | |
| १० | स्वहित सप्तक. | ७ | २८ | ,, द्रुतविलंबित. | २० | मासिक मनोरंजन. डि. १९२८ |
| ११ | सुख स्वरूप. | ११ | ४४ | ,, ,, | २१ | विविध ज्ञानविस्तार.जाने.१९२९ |
| १२ | कीं वेडे सगळे मिळोनि... | १९ | ७६ | ,, शा. वि. | २४ | मासिक मनोरंजन. एप्री.१९२३ |
| १३ | चंपकमाला. | १५ | ६० | ,, चंपकमाला. | २८ | |
| १४ | कवीचें जग. | २४ | ८४ | चाल–श्यामाराणी. | ३० | |

| कविता क्रमांक | कवितेचें नांव. | श्लोक संख्या | चरण ओळ | वृत्त किंवा चालीचें नाव. | पृष्ठ | प्रकाशन स्थळ व काल. |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | निसर्ग देवीची भुपाळी. | २३ | ४६ | ,, केशवकरणी. | ३४ | |
| १६ | मनुजा ! | ११ | ४४ | वृत्त–पृथ्वी. | ३७ | |
| १७ | स्फुरद्देवते ! | ३४ | १३६ | ,, ,, | ३९ | |
| १८ | रजनीची रात्र. | ७ | ६८ | चाल–उद्धवा. | ४६ | |
| १९ | उषा निशा. | ८ | ३२ | ,, चंद्रकांत. | ४८ | |
| २० | आशा. | ५ | २० | वृत्त–मध्यक्षामा. | ५० | |
| २१ | वेणुस्वन. | १५ | ७२ | चाल–रामकरे... | ५१ | |
| २२ | मनादोलिका | १४ | ५६ | वृत्त–भुजंगप्रयात. | ५५ | |
| २३ | विषयवासना. | १० | ४० | ,, पृथ्वी. | ५८ | |
| २४ | सद्गुरु करुणाष्टक. | ८ | ३२ | ,, मालिनी. | ६० | |
| २५ | ध्येयानुसंधान. | ५ | २० | ,, अश्वधाटी. | ६२ | |
| २६ | समाधान सप्तक. | ७ | २८ | ,, उपेंद्रवज्रा. | ६३ | |
| २७ | उत्क्रांति. | १४ | ५६ | ,, इंद्रवज्रा. | ६५ | |
| २८ | मुमुक्षुबाळाचा पाळणा. | १३ | ५२ | चाल–पाळणा. | ६७ | |
| २९ | तत्व पंचक. | ५ | २० | वृत्त–स्रग्धरा. | ६९ | |
| ३० | निश्चय पंचक. | ५ | २० | ,, शा. वि. | ७० | |

| कविता क्रमांक | कवितेचें नांव. | श्लोक संख्या | चरण ओळ | वृत्त किंवा चालीचें नांव. | पृष्ठ | प्रकाशन स्थळ व काल. |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१ | मालिन्यास शुचित्व. | ७ | २८ | ,, ,, ,, | ७१ | |
| ३२ | लोभू नको. | ७ | २८ | ,, ,, ,, | ७३ | |
| ३३ | स्थानभ्रष्ट पुष्पास. | चतुर्दशिका | १४ | ,, ,, ,, | ७५ | चित्रमयजगत्. फेब्रुवारी १९२८ |
| ३४ | रडवाया कीं हसवाया ! | ९ | ३६ | चाल—पोवाडा. | ७६ | |
| ३५ | मोठें ध्येय. | १४ | ५६ | वृत्त—शा. वि. | ७७ | |
| ३६ | मलाच मी हंसलो. | २६ | १०२ | चाल—मेनका. | ८० | |
| ३७ | षट्पदगायन. | १५ | ६० | ,, वधूवल्ली. | ८५ | |
| ३८ | कवींची बैठक. | ५६ | २२४ | वृत्त—शा. वि. | ८८ | |
| ३९ | भ्रमसभ्रम. | ५ | २० | ,, हरिणी. | ९१ | |
| ४० | म्हणु कसें ' प्रियवदा ' | ७ | २८ | ,, प्रियवदा. | १०० | |
| ४१ | व्यर्थ जगत नाशिवत. | ७५ | १५० | चाल—चंद्रकात.. | १०२ | |
| ४२ | अधिकार अष्टक. | ८ | ३२ | वृत्त—उपजाति. | १०९ | |
| ४३ | चार चांदण्याच्या रात्री. | १० | ४० | ,, मद्राक्रांता. | ११० | |
| ४४ | सुवर्णा ! | २२ | ४४ | चाल—पालरा. | ११२ | |
| ४५ | तीस. | ३३ | १३२ | वृत्त—पृथ्वी. | ११४ | |
| ४६ | माणिकनगरचा हिरा हरपला. | १३ | ५२ | ,, ,, | १२१ | माणिकप्रभु मासिक जून १९२३ |

| कविता क्रमांक | कवितेचें नांव. | श्लोक तख्या | चरण ओळ | वृत्त किंवा चालीचें नांव. | पृष्ठ | प्रकाशन स्थळ व काल. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४७ | माणिक माणिक बोल ! | ७ | १४ | चाल—रामनाम तू... | १२४ | माणिकप्रभु मासि.अक्टो. १९२१ |
| ४८ | कोटील मी ! कोण मी ! | ११ | ४४ | वृत्त—शा. वि. | १२६ | तत्वज्ञान मंदिर, जाने. १९३० |
| ४९ | जगद्वद्या वंदा. | २ | ८ | ,, शिखरिणी. | १२८ | रामकृष्ण निकेतन मासि.मे १९२९ |
| ५० | भक्तकार्यकल्पद्रुम हा. | ५ | २० | चाल—बालानंद. | १२९ | |
| ५१ | वात्रशिल चिद्योर्मी. | ६ | २४ | वृत्त—पादाकुलक. | १३० | |
| ५२ | सेव्राप्रभुत्व. | ३ | १२ | ,, मधुमाधवी. | १३१ | |
| ५३ | संपादक. | ५ | २० | चाल—बालानद. | १३२ | |
| ५४ | रेगारे. | ३ | ६ | ,, चलो मदनमोहन. | १३३ | |
| ५५ | गारे माणिक तो. | २ | ६ | राग—तिलककामोद. | १३४ | |
| ५६ | तूंच एक. | ६ | २४ | वृत्त—अभग. | १३५ | |
| ५७ | जनजनार्दन पद. | ५ | २० | ,, पादाकुलक. | १३६ | |
| ५८ | वस्तुस्थिति लशाधन. | ११ | ४४ | चाल—चद्रकांत. | १३७ | |
| ५९ | एकादशीला शिवरात्र भेटे. | ७ | २८ | वृत्त—इद्रवज्रा. | १३९ | |
| ६० | एकादशीला शिवरात्र ! | ८ | ३२ | ,, ,, | १४१ | |
| ६१ | आदा पुन्हां कोरडा. | २९ | ११६ | ,, शा त्रि. | १४३ | |
| ६२ | विजयादशमी. | २४ | ४८ | ,, गाति (आर्या) | १४९ | अरुणोदयमाला. श. १८४६ |

| कविता क्रमांक | कवितेचें नांव. | श्लोक संख्या | चरण ओळ | वृत्त किंवा चालीचें नाव. | पृष्ठ | प्रकाशन स्थळ व काल. |
|---|---|---|---|---|---|---|
| ६३ | देवघेव. | ३ | ६ | वृत्त–गीति (आर्या) | १५१ | |
| ६४ | मातृप्रेम. | २१ | ८४ | ,, शा वि. | १५२ | |
| ६५ | प्रेमाचे बोल. | ७ | १४ | ,, गीति (आर्या) | १५६ | अरुणोदयमाला. १९२६ इ. |
| ६६ | संक्रांतीचा सण. | १९ | ३८ | ,, ,, | १५७ | |
| ६७ | मानवमहति. | ४० | ८० | ,, ,, | १५९ | |
| ६८ | माया उर्फ कल्पनाराणी. | २६ | ५२ | ,, ,, | १६३ | |
| ६९ | मायेची मगरमिठी. | २२ | ४४ | ,, ,, | १६५ | |
| ७० | जीवन्मुक्तानंदलहरी(समश्लोकी) | १८ | ७२ | ,, शिखरिणी. | १६७ | |
| ७१ | नांवाची नवलाई. | ११ | २२ | ,, अभंग. | १७३ | |
| ७२ | नांवाचे नामधारक. | ११ | २२ | ,, ,, | १७४ | |
| ७३ | नववत्सर. | १२ | ४८ | ,, यूथिका. | १७५ | चित्रमयजगत्. मे १९२८ |
| ७४ | स्वागत. | ११ | ४४ | ,, स्वागता. | १७७ | |
| ७५ | मंगलनाम. | ३ | ८ | चाल–राम करे... | १७९ | |
| | | ९८६ | ३३७६ | | | |

# अभिप्राय.

## श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर

लेजिस्लेटिव्ह असेंब्ली                                        पुणें, १७-४-१९२८.

रा. यशवंतराव कोरेकर यांची कविता चित्रमयजगत्, मनोरंजन, अरुणोदयमाला वगैरेंमधून प्रसिद्ध झालेली मराठी वाचकांच्या पाहण्यांत आहेच. त्याखेरीज त्यांचा अप्रकाशित कवितासंग्रह माझ्या पहाण्यांत आला. त्यावरून रा. यशवंतराव यांच्या प्रासादिक, यमकप्रचुर व प्रौढ कवितेविषयीं माझा अभिप्राय कायम झाला. त्यांचा ओढा वेदान्ताकडे असूनही देशभक्तीची भावना त्यांच्या अंतःकरणांत असल्यामुळें त्यांचें काव्य अनेक ठिकाणीं हृदयंगम व सूचक असें झालें आहे. हा संग्रह त्यांनीं छापण्यास घेतला आहे. व तो लोकांपुढें येईल तेव्हां आधुनिक चांगल्यापैकीं काव्यांत त्याची गणना होईल असें मला वाटतें.

(सही) न. चिं. केळकर

# अभिप्राय.

—:०:—

ग्वालियार संस्थानचे माजी चीफ जस्टिस, भारताचार्य, टिळक-महाविद्यालयाचे कुलपति श्री० चिंतामण विनायक वैद्य——

रा. यशवंत सदाशिव कोरेकल यांचा कवितासंग्रह मीं पाहिला. यांचें कवित्व चांगलेंच असून यमक उत्तम, चटकदार व गोड बसविण्याचें त्यांचें कौशल्य वाखाणण्यासारखें आहे. एकंदर कविता विदर्भाच्या प्राचीन प्रसिद्धीस साजण्यासारखी आहे.

पुणें, (सहि) चिंतामण विनायक वैद्य.

ता. २७–२–२८

तदेको वसिष्ठः
I alone persist
सर्वं खल्विदं ब्रह्म
All this is indeed Brahman.

शिवः केवलोऽहम् ।
Blissful : Absolute
नेह नानास्ति किंचन
There is nothing here apart from it.

## शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।

Surely Health is the primary requisite of spiritual life.

कैवल्यधाम Kaiwalyadhama-An Institute for Scientific Research in Psycho-Physiology, Spiritual and Physical Culture etc.

Director.—
Kuvalayananda,
( J Y Gune )

Lonavla, (Bombay-India),
17–9–28,

**श्री. यशवंत सदाशिव कोरेकल.**

हैद्राबाद ( दक्षिण ) यांस—

कृ. सा. न. वि. वि.

आपल्या काव्यसंग्रहांतील कविता आणि चित्रादि अन्य ललितकलाकृति पाहून अत्यंत संतोष झाला. ललितकला आणि तत्त्वज्ञान यांचें अत्यंत तादात्म्य आहे अशी माझी ठाम समजूत आहे. आपल्या एकंदर कृतींनीं या समजुतीस चांगलेंच पोषण मिळालें आहे- **विश्वाशीं तादात्म्य पावणारा कवि तत्त्वदर्शी असल्यास हृदयंगम कविता प्रसवतो.** हें आपल्या काव्यकलापाचें अवलोकन करीत असतां अनेक वेळां प्रतीत होतें. आपल्या वैदर्भी रीतीनें कोणाही रसिकाचें मनोरंजन होईल. ईशकृपेनें आपल्या हातून असला वाग्यज्ञ अव्याहत होवो. कळावें, लोभ करावा, हे विनंति.

हैद्राबाद,
राजारायरायान् बहादुर
याची देवडी

आपला नव्यपरिचित.

( सही ) कुवलयानंद.

संस्थापक, **( अभिप्राय )** आचार्यकुल,

विष्णुशास्त्री बापट २७०, सदाशिव पेठ, पुणें.

२९-२-२८

फा. शु. १ श. १८४९

शास्त्रसुधाकर आचार्यभक्त पंडित विष्णुशास्त्री बापट--

रा. यशवंतराव कोरेकल यांचा कवितासंग्रह मीं ठिकठिकाणीं काळजीपूर्वक चाळून पाहिला. विशेषत: **जीवन्मुक्तानंदलहरीची समश्लोकी** मूळ श्लोकाशीं ताडून पाहिली. इतर प्रकरणांचेंही विहंगमन्यायानें अवलोकन केलें. त्यावरून कर्त्याची प्रतिभाशक्ति व सहृदयता यांचा उत्कृष्ट प्रत्यय आला. काव्याचें जणुं काय हृदयच असा जो प्रसाद तोही या सर्व काव्यांत सर्वत्र अनुभवास येतो. वृत्तांतही छंदशास्त्रदृष्ट्या दोष कोठें आढळले नाहींत. एकंदरींत ही काव्यकुसुममाला केवळ संग्राह्यच नव्हे, तर वाचनीय, मननीय व आचरणीय आहे.

परमेश्वरा अशा सत्कवींना अशीच उत्तरोत्तर उत्तम काव्यें करण्याची स्फूर्ति व दीर्घायु देवो.

(सही) विष्णुशास्त्री बापट.

## श्रीयुत रा. रा. गणेश रघुनाथ कुलकर्णी

संपादक **श्रीमाणिकप्रभु** मासिक

श्रीमाणिकप्रभु अंक ७ वर्ष २ रें आक्टोबर १९२३.

श्रीयुत यशवंतराव कोरेकल हे हैद्राबाद शहरांत व प्रांतांत मोठे नांवाजलेले कवि आहेत. त्यांची कविता प्रेमळपणांत सरस असून कल्पनांची भरारी कौतुक करण्यासारखी आहे. त्यांचें कोणतेंही पद्य आम्ही मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करूं. यापूर्वीं आमच्या वाचकांस यांचा परिचय झालाच आहे. यापुढेंही या मासिकांत त्यांची कविता (व लेख) मात्र यावी अशी आमची इच्छा आहे.

संपादक.

ग्रंथालय
ग्रं. क्र. ४८३५

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध | पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | २ | नीलभिश्र | नीलमिश्र | १११ | ५ | पदवी | पदवि |
| ६ | २० | ताशाचा | ताशाचा | ११४ | १९ | हृदय केरवा | हृदयकेरवा |
| ९ | १० | ती | तो | ११५ | १२ | अजुनिहि | अजूनिहि |
| १०/३२ | ४/७ | लवेक | लवेंक | ११५ | १६ | अना | झणीं |
| १७ | १ | ज्ञानरूपीच | ज्ञानरूपीच तो | ११६ | १९ | आलापते | आलाप ते |
| १७ | १५ | कल्पना तीत | कल्पनातीत | ११६ | २० | आलाप ते | आलापते |
| २१ | ४ | आपुली | आपुलि | ११९ | ७ | जाणुती | जाणुनी |
| २१ | ८ | कुनी | कुनी | १२१ | ४ | निराशभय | निराशमय |
| २२ | ४ | खंगनि | खंगति | १२३ | ६ | प्रक्त | भक्त |
| २२ | १६ | बसविल्यास | बलविल्यास | १२३ | ८ | खादाड मी तूं | खादाड तूं |
| २५ | ३ | घनव्रुज | घनव्रज | १३१ | २ | घालशीं | घालविशीं |
| ३३ | १ | स्वातनत्र्याचा | स्वातंत्र्याचा | १३१ | १५ | जणुं | जणूं |
| ४१ | २ | सुनिश्चयफला | सुनिश्चयफला अशा | १३१ | १६ | न याविणें | नयाविणें |
| ४२ | ६ | कधिहि | कधींहि | १३२ | २६ | उपचराशीं | उपचाराशीं |
| ४२ | १८ | मनोडिंथ संवर्धिनी | मनोऽब्धि संवर्धिनी | १३७ | २ | मंदानिक | मदानिल |
| ४६ | १८ | वक्र | वक्रू | १३८ | ३ | तत्वदृष्टिनेंच | तत्वदृष्टिनें |
| ४९ | ७ | यशस्विता | यशस्विनी | १३८ | ५ | कालानि | काल्पनिक |
| ५० | २ | नियम न | नियमन | १३९ | १० | लभोनियां | लोभोनियां |
| ६५ | १९ | उन्नति दावि | दावि उन्नति | १४३ | २१ | पुरित | पूरित |
| ७४ | ६ | न तत्वप्रिंही | येई न तत्वप्रिंही | १४५ | १३ | पाहूं | पाहु |
| ७७ | ६ | त्वारें | त्वरें | १४६ | १५ | तरी | तरि |
| ८६ | १४ | तरी | तरि | १४९ | १० | देवाहिकांसही | देवादिकांसही |
| ९० | ६ | लुब्धवी | लोभवी | १४९ | १४ | काढिती | काढिते |
| ९१ | ४ | लाभावर | लाभे वर | १४९ | १७ | रहावें | व्हावें |
| ९४ | १६ | जरि | जरी | १५० | ११ | उत्कांति | उत्क्राति |
| ९६ | ६ | तारापतारापहा | ताराच तारा पहा | १५८ | ५ | होतें | हातें |
| ९६ | २० | कापति | कोपति | १६० | ८ | नकाय | नका या |
| ९९/१०० | ८/१० | किती | किति | १६० | १९ | आश्चर्यवत | आश्चर्यवत् |
| १५० | १६ | खेद्दोल्हास | खेदोल्हास | १६६ | १७ | सुरतेवीण | सुरतेवाचून |
| १०३ | १० | कोमलगात्री | कामलगात्रा | १६८ | १६ | पौरान्यश्यन् | पौरान्पश्यन् |
| १०५ | ३ | गाय | गाइ | १६९ | २२ | सत्तकें | सत्तकें |
| १०९ | ९ | लाभ | लाभे | १७१ | ५ | सत्पुषे | सत्पुष्पे |

॥ श्रीसद्गुरुमाणिकप्रभुप्रसन्न ॥

# —अर्पण-पत्रिका—

बा ! स्फोरका ! त्वत्पदिं लीन भावें । या "पाकळ्या" अर्पितसे स्वभावे ॥
माझें मला तेंच कसें मिळावें । जेव्हा तुझें पूर्ण तुला न पावे ॥ १ ॥

भक्तकार्यकल्पद्रुम गुरुसार्वभौम श्रीमद्राजाधि राजयोगी महाराज त्रिमुक-नानद अद्वैत अभेद निरजन निर्गुण निरालंब परिपूर्ण सदोदित सकल मतस्थापित सद्गुरु माणिकप्रभू महाराजकी जय

अखंड आनंदरूप असलेला आत्मा मायोपाधिमुळें विकृत होऊन चिज्जड, सज्जड, पिंड, ब्रह्मांड, बिंब, प्रतिबिंब, ईश, जीव, ख्याति, असत्ख्याति अशा मोडी वळणांतून स्वैर परिभ्रमण करून झालेली विकृति अविकृत कशी आहे हें बालबोधदृश्य पाहणारा, गद्याच्या अनियमबद्ध उद्यानांत न संचरता पद्याच्या नियमबद्ध प्रवाहांत स्रवणारा, व पद्यार्थानें स्वतःचें सत्व कसें व्याप्त होऊन राहिलें आहे हें पाहून निमित्तमात्र वाणीकडून संसृतिव्यसनविस्मरणपूर्वक बोबडे बोल वदवून कौतुक करणारा, हाशा निराळी कृति करून कर्तृत्वन्यास बिंबविणारा समर्पणप्रसक्त झाल्यामुळें ज्याच्या कृपाकटाक्षविलोकनभूत अंतःस्फूर्तीनें विकसित करविलेलीं प्रमोदपुष्पें परमपूज्य अखंडैकरसात्मक अज्ञानतिमिरच्छेदक, सच्चिद्घन, सर्वत्रानुस्यूत, सर्वान्तर्यामी सकलमताचार्य सनातनसद्गुरु **श्रीमन्मार्तंडमाणिकप्रभु** महाराजांच्या चरणारविंदीं ज्याचें त्यालाच समर्पण झाल्याशिवाय कसें राहील म्हणून या काव्यकुसुमकलिकांचें प्रथमउद्भव-हे बोलविलेले बोबडे बोल सादर अनन्यभावें

**श्रीचरणीं अर्पण असोत !**

पूर्णादि पूर्णमध्यञ्च पूर्णात्पूर्णावशिष्यते ॥
पूर्णत्वात्पूर्णदातारं सर्वं कर्तारमाश्रये ॥

चरणरजांकित बालक

**यशवंत सदाशिव कोरेकर.**



भक्तकार्यकल्पद्रुमादि बिरुदांकित

श्रीमन्मार्तंड माणिकप्रभुमहाराज (संस्थान श्रीमाणिकनगर.)

कवि—



य. स. कोरेकल.

# काव्य कुसुम कलिका

श्रीसद्गुरु माणिकप्रभु प्रसन्न.

# काव्य कुसुम कलिका

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं.
ता.

वृत्त—शार्दूलविक्रीडित

ॐ नादें जगतांत नांव अपुलें जों डिंडिमें ऐकवी ।
ध्याती ज्यांस नसोनि रूपहि परी ब्रह्मज्ञ, योगी, कवी ॥
वंदूं ज्यास न नाम रूप, नसती माता, पिता, नंदन ।
आरंभीं परि जो गजानन मिषें घेतो सदा वंदन ॥ १ ॥
ज्ञानी, भक्त, अशा उदारहृदिनां प्रेरीत जो अंतरीं ।
घेई विश्वमिषें तयांकडुनियां पूजादि सेवा खरी ॥
स्फूर्ति प्रेरक आणि पूरक असा प्रेमें जणूं तो वदे ।
" अत्यंत प्रिय तो मदीय जनता सेवीतसें जो मुदें ॥२॥

हैद्राबाद दक्षिण<br>आषाढ श० १८४९ }

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.

## २ तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? वृत्त–पृथ्वी.

प्रभुस्तवन व्हावया बुधहि भक्तिभावें किती ।
प्रसन्नमन ठेवुनी चरित ते तुझें घोकिती ॥
प्रभो ! तरिहि त्वत्पदीं सतत गुगते तन्मती ।
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ॥ १ ॥
क्षणैक प्रियदर्शनें तरि न राहवे त्या उगे ।
घडें स्तवन केवि तें जरि न त्वत्स्वरूपा बघे ॥
पदाग्निरज पाहता परत येति का मागुती ? ।
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ॥ २ ॥
स्फुरेल कविता जरी तरिहि शब्द ते बापुडे ।
अमूल्य असले तरी तदनुमानयोगें घडें ॥
स्तुतीहि नच सत्य ती मतिसही न जेथें गती ।
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ॥ ३ ॥
जरी कवनलालसा उदित होय शुद्धांतरीं ।
तवस्तवन रगवी करित शांत बाह्यांतरीं ॥
तुझे चरण ध्याति ते न मनिं स्वर्गही आणिती ।
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ॥ ४ ॥
स्वयेंच अपुल्या मुखें दुरित दैन्य जे सांगती ।
बळें भवभयामुळें भलतसेच भांबावती ॥
कशी तव घडे स्तुती सतत जे स्वयें स्फुदती ।
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ॥ ५ ॥

जरी भुलविते मनां विषयमूलकेच्छाततो ।
रुजें तरिच बीज तें जरि तसें मनीं योजिती ॥
तुझे भजक ते खरे त्वदितरां न जे पाहती ।
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ॥ ६ ॥
स्तुतिस्तवहि कल्पनामयचि मूर्ति ये एकदां ।
मिळेल सुख कां सुधा त्यजुनि शुष्कशब्दें कदा ? ॥
तरीच जगिं होइना खरि अशी कधीं त्वत्स्तुती ।
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ॥ ७ ॥
तवस्तवनलालसा धरुनि जे पुढें धांवले ।
तुला मिळविल्या क्षणीं श्रुतिहि शास्त्र मौनावलें ॥
म्हणोनि नच येत कीं कवनिं आनुकूल्य स्थिती ।
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ॥ ८ ॥

शालीबंदा हैद्राबाद दक्षिण }
सोमवार भा० शु० १ श० १८५० }



## २ रंगवल्लिका.

चाल--चंद्रकांत.

रम्य उषेची लाली खुलली ।
अंधुकता गेली ॥
तोंच तमिस्रा जाउनि कोठें ।
न कळे कां दडली ॥ १ ॥

हळुं हळुं सारित तिमिराच्छादन-- ।
सृष्टिमुखावरचें ॥
येत अनिल कीं निशिपट उघडित-- ।
विश्वमंदिराचें ॥ २ ॥

एकरंगि जी कृष्णा वसुधा-- ।
निशिकाळीं गमली ॥
विविध विभूषा अशी असतां ती ।
जननयनां दिसली ॥ ३ ॥

निसर्गदेवी जागी झाली ।
चोळित निज डोळे ॥
परि दिसले नभमंडप शोभित-- ।
हिरे हरपलेले ॥ ४ ॥

**रंगवल्लिका** कीं ही म्हणुनी ।
काढायां गेली ॥
कुणीं उधाळिलें नच तें कळलें ।
परि अशि गति दिसलीः--॥ ५ ॥

कुंकुम करिचें प्रथम सांडलें ।
        नीलमिश्र झालें ॥
गुलाबि रंगें गगन रंगलें ।
        गुलालमय गमलें ॥ ६ ॥
हस्तांतिल ती हळदहि सगळी ।
        कीं तिसऱ्या वेळीं- ॥
सांडलि तेथुनि इतस्ततः ती ।
        सगळी रांगोळी ॥ ७ ॥
कुणीं म्हणो " हा रवि उदयोन्मुख ।
        अरुणराज आला "
कोणां गमले **रंगवाल्लिका** ।
        काढित महिबाला ॥ ८ ॥

मुंबई,
शनिवार, चैत्र व० ९ श० १८५०



## ४ " खरा अमर कवि तो " चाल—चंद्रकांत.

कविराया ! गा कविराया ! गा— ।
गाशिल जरि कवनें ॥
काव्यरसाश्रयकोकिलकूजन ।
लाजविशी गानें ॥ १ ॥

गातां गाता भवप्रवासहि ।
संपे त्रासदहा ॥
स्वात्मानंदासाठीं गावे ।
जो कां चित्सद हा ॥ २ ॥

गातचि असता गमावलें जें— ।
अपुलें तें फिरुनी ॥
मिळवायाला पुनश्च गावें ।
गाणें फिरफिरुनी ॥३॥

उद्विग्नाचे संत्रस्ताचें—।
गाणें कसलें तें ! ॥
अभंगगायन जेव्हां चाले ।
तेंच सुखां देते ॥४॥

बाह्यस्थितकल्लोल—कवि जरी—।
बसेल लोकांती ॥
ताशांचा फडफडाट--तरि तो ।
आहे एकांतीं ॥५॥

अतस्थित तश्शांति न भंगे ।
 अभंग कवि असला ॥
तद्हृदभंगा यत्न करुनि जरि ।
 कुणीं किती केला ॥६॥
त्याचे म्हणुनी जरि नच आले ।
 ऐकूं लोकाला ॥
" रसिक तोषले " ही सद्वार्ता ।
 तोषविते त्याला ॥७॥
गात असे आर्धीच मरुनि जो— ।
 मृत्युहि ज्यास भितो ॥
त्याचें गाणें कधिं कां मरते ।
 **" खरा अमर कवि तो "** ॥८॥

**प्रमुदरबार शालीबंडा हैद्राबाद—दक्षिण**
**सोमवार–भा. व. १२ श. १८५१**

१ एक कर्कशवाद्य.

## ५ "एकचि तूं विश्वांत" चाल—आन परी दरबार.

एकचि तूं विश्वांत ॥ ईशा ! ॥
दिससि भिन्न वेषांत ॥ ईशा ! ॥ ध्रु० ॥
दैन्याविण दीनास कोण जो—।
देइल हात जगांत ॥ ईशा ! ॥
तेहि प्रभो ! गा ! तूंच दिले ना ? ।
दाता तूं अभिजात ॥ ईशा ! ॥१॥
अनंतपरिची तुझी देणगी— ।
निवडानिवड तयांत ॥ ईशा ! ॥
कुणीं करावी, काय, कशी ती ।
त्वदीय दातृत्वांत ? ॥ ईशा ! ॥२॥
योग्य योजना तूंच जाणशी ।
काय पडे पचनांत ॥ ईशा ! ॥
निमग्न राहूं त्यजुनि काळजी ।
नित्य तुझ्या भजनांत ॥ ईशा ! ॥३॥
पदर सदाचे पसरुनि आहों— ।
जें जें काय तयांत- ॥ ईशा ! ॥
पडतें, सारें सोनें समजूं ।
तरिच जगूं जगतात ॥ ईशा ! ॥४॥
अमितकोटि ब्रह्माडकाळजी ।
वसते त्वद्‌हृदयात ॥ ईशा० ! ॥

येतो अमुचा अम्हां सुखविण्या— ।
        जीवचि संपुष्टांत ॥ ईशा० ! ॥ ५ ॥
ऐकू येतो तुझा गवगवा— ।
        श्रुतींत उपनिषदात ॥ ईशा० ! ॥
सच्चित्सुख तूं कुठेंहि असशी—
        दु:ख नसेच जगात ॥ ईशा० ! ॥ ६ ॥
विश्वीं तूं वससीं विश्वेशा ।
        विश्व तुझ्याच पदात ॥ ईशा० ! ॥
पदोपदीं प्रभु यन्मनि पटतां— ।
        धन्यचि ती धन्यात ॥ ईशा० ॥ ७ ॥
एकचि तूं विश्वात ।॥ ईशा ! दिसाशि भिन्नवेशांत । ईशा०!

मु. शालीबंडा प्रभुदरबार हैद्राबाद दक्षिण }
सोमवार भा व १२ श १८५१.

## ६ निसर्गमधु हास्य

वृत्ती–पृथ्वी.

उषा उसळुनी अहा ! त्वरित घालि दिव्यांजनां ।
स्वयें हंसुनि हांसवी विगतनिद्रविद्वज्जनां ॥
कसाहि जड वृत्तिचा तरि लवेक लाचावतो ।
सुधासम अहा ! असा समय घालवी ! कोण तो ? ॥ १ ॥

निसर्गमधु हास्य तें बघुनि कल्पना धांवली ।
विहंगगणगायन श्रुतिमुखांत नादावली ॥
तदीय मधुरस्वरीं विकलवृत्ति सामवली ।
म्हणोनि प्रथमं क्षणीं कवनलालसा थांबली ॥ २ ॥

असे ध्वनिच, शब्दही मुळिंच अर्थही ना तरी– ।
विशुद्ध करि तोच कीं समरसोनि सर्वांतरीं ॥
निमग्न मति होय ती लवभरी जरी खंडिता ।
तरीहि करि तत्क्षणीं स्तिमित-चित्त वाक्पंडिता ॥ ३ ॥

मुके जरिहि वृक्ष हे, पवन, पर्ण, कीं, पाखरें ।
परंतु–"मधुगान तें" ! असत कीं म्हणा वा खरें ॥
तदीय अमृतोपमस्वनचि दावि जादू खरी ।
तशी न कधिं जन्मली जगतिं जादु, जादूगिरी ॥ ४ ॥

निसर्गमयगायनीं सतत वृक्ष मोदें डुलें ।
स्वरोल्लसित वृत्तिनें हृदय पूर्ण झालें खुलें ॥
कसें मुदित वृत्तिचे गमति हातवारे अहा ! ।
म्हणो कुणिहि " नाचरे दिसति पर्ण सारे पहा" ! ॥ ५ ॥

प्रमुग्ध असणें, बरें डुलत राहणें, वाटलें ।
परी स्फुरण राहिना क्षणभरीं, हृदीं दाटलें ॥
म्हणोनि कविता अशी उसळुनी पहा पातली:– ।
शिरोन्नत करोनियां बघत तों उषा हांसली ॥ ६ ॥

शालीबंडा हैद्राबाद दक्षिण
रविवार, अ. श्रा. [illegible] शके १[illegible]

स्थळ प्रत
नोंद नं.

## ७ होणार तें होउं दे.

वृत्त—शार्दूलविक्रीडित.

का बा खंति सदैव मानिशि मना ! कां दैन्यवाणा जगीं ? ।
प्राक्सिद्धा भवितव्यता न गणतां संत्रस्त होशी उगी ? ॥
गेलें, जाइल, त्यांत दुःख कसलें ? जाणार तें जाउं दे ॥
तूं राहोनि उगा सदा बघत जा होणार तें होउं दे ॥ १ ॥
दैन्याचें जग, येथ दैन्य पिकलें, दीनास तें पावतें ।
येथें नाहिंच कांहिं शाश्वत असें, दृष्टींत जें मावतें ॥
राही पोहत पूर्ण निश्चलमनें द्वंद्वप्रवाहीं मुदें ।
तूं राहोनि उगा सदा बघत जा होणार तें होउं दे ॥ २ ॥
आहे एकचि जन्मसिद्ध तव हें स्वानंदसाम्राज्य रे ।
जेथें नाहिंच मृत्यु होशिल कसा तू व्यास तेथें जरें ॥
कां रे व्यर्थचि वाहशीं भवभयां ? तत्कर्म त्या सारु दे ! ।
तूं राहोनि उगा सदा बघत जा होणार तें होउं दे ॥ ३ ॥
इच्छामूलक दैन्य दुःख सगळें दीनांमुळें जहालें ।
त्यातें स्वर्गिंहि तृप्ति शांति न मिळे आशालती जे खुळे ॥
नाहिं दुःखचि कीं, परंतु करिती हे मूर्ख त्याचा उदे ।
तूं राहोनि उगा सदा बघत जा होणार तें होउं दे ॥ ४ ॥
आहे एकचि मूलभूत असली ती कल्पना सौख्यदा ।
ध्यातां तत्कमनीयता त्वरित दे स्वर्गीय सौख्या सदा ॥
केल्यानें उपयोग योग्य न तिचा ती दैन्य दुःखास दे ।
तूं राहोनि उगा सदा बघत जा होणार तें होउं दे ॥५॥

खेदोल्हास युगांस साम्य गणुनी भोक्तृत्व तें जाणुनी ।
जेव्हां जें घडतें तदानुसरणीं निश्चित राही मनीं ॥
स्वानंदार्णव अंतरीं स्थिर, वरी लाटाहि हेलाउं दे ।
तूं राहोनि उगा सदा बघत जा होणार तें होउं दे ॥ ६ ॥
संत्रस्तस्थिति सोडुनी बसत जा साहित्यसिंहासनीं ।
आनंदोर्मि जिथें सदा उसळते काव्यौघसवर्धिनी ॥
आकाशांत ढगां सुखें विचरु दे, मोदें तयां गर्जु दे ।
तूं राहोनि उगा सदा बघत जा होणार तें होउं दे ॥ ७ ॥
पीयूषप्रतिभाधिका प्रतिपदीं अव्याहतस्रोत तो ।
जेथें स्फूर्तिसमीर शातसुमनोगंधासवें वाहतो ॥
काव्यक्षेत्र विशाल रम्य फुलतें हर्षें लता डोलु दे ।
तूं राहोनि उगा सदा बघत जा होणार तें होउ दे ॥ ८ ॥
प्रेमानें जरि कोणिं यद्यपि मिषें वाखाणणी केलिया ।
द्वेषानेंहि मना! तुला दुखविण्यां वित्तादि नेलें लया ॥
त्यांचा यत्न तयास लभ्य म्हणुनी त्यानाच कीं हर्षुं दे ।
तूं राहोनि उगा सदा बघत जा होणार तें होउ दे ॥ ९ ॥
केव्हांही नभ निर्विकार जरि तें अर्कोदयास्तां बघे ।
लाली पाहुनि हास्य कीं जरि कुणां भासे तरी तें उगें ॥
तैसे आगमनादि दृश्य सगळें कीं येउं दे जाउं दे ।
तूं राहोनि उगा सदा बघत जा होणार तें होउं दे ॥ १० ॥

---

१ जोडी.

शालीबंडा, हैद्राबाद दक्षिण.
गुरुवार, ज्ये० शु० १२, शके १८५०

## ८ स्वांतद्रष्टा कवी

वृत्त—स्रग्विणी.

**स्वांतद्रष्टा** असा एक आहे **कवि**
तो जधीं स्वानुभूती जनां ऐकवी ॥
हर्ष निभ्रांत ते होउनी ऐकती ।
बोल ज्याचे सदा ऐकुनी डोलती ॥ १ ॥

जो सदा राहतो कल्पनेच्या नभीं ।
आत्मविश्वासिं जो पूर्ण कोणां न भी ॥
आपुलें चालवी नित्य, कोठेंहि हा ।
सर्वदा तृप्त आनंद भोगी पहा ॥ २ ॥

चित्तिं जी उद्भवे कल्पना ज्या क्षणीं ।
तत्क्षणीं ती निमाल्या मनीच्या मनीं ॥
हेंच जो जाणतो, तोच होतो जनीं ।
**स्वांतद्रष्टा**, असा जाणती त्या कुणी ॥ ३ ॥

दिव्य सौंदर्य हा जेधवां पाहतो ।
तेथ तद्रूपता सेवुनी राहतो ॥
स्वात्मतत्त्वीं सदा मग्न हा राहुनी ।
भोगितो **स्वांतद्रष्टत्व** ही उन्मनी ॥ ४ ॥

अंबुदोद्भव असे होउनी बिंदु तो ।
घेत जेव्हां उड्या हर्षुनी गर्जतो ॥
धांवण्यां होतसे जीवनस्रोत तो ।
वीचिका-मालिका होउनी नाचतो ॥ ५ ॥

कोकिला पाहतां होत हा कूजित ।
आम्र पाहोनियां होतसे अमृत ॥
गंध होतो क्षणीं पुष्प जेथें दिसें ।
मुग्ध बिंबाधरीं मदहास्यें वसे ॥ ६ ॥

मेदिनीं राहतो स्वर्गींचें जाणतो ।
अंबरीं वागतो जीसवें धांवतो ॥
दृष्टिनें पाहतो जें मनीं लक्षितो ।
तेथिंचें तेंच तो होउनी राहतो ॥ ७ ॥

दुःखि भेटे कुणीं नीर ये लोचनीं ।
कीं सुखी पाहतां हर्षतो तत्क्षणीं ॥
आर्त आक्रंदनाकृष्ट हा होउनी ।
सोडवाया तया धांव घेई क्षणीं ॥ ८ ॥

दिव्य पीयूष ऐसें कधीं वर्षवी[1]— ।
दग्ध वृक्षा फुटे तत्क्षणीं पालवी ॥
दुःखदैन्यादिकां घालवी, मालवी ।
हर्ष, आनंद भाग्योदया दाखवी ॥ ९ ॥

प्रेम ठेवोनिया, गोड बोलोनिया ।
सर्व भूतीं दया, वागणूकीं नया- ॥
सर्वदा दाखवी लोक संतोषवी ।
नीववी, हासवी, डोलवी, नाचवी ॥ १० ॥

---

१ वांज.

सौरभ स्वागतां सेवुनीयां कवी ।
जाउनी गोड रुंजी अशी ऐकवी- ॥
तोषवी रंजवोनी लता डोलवी ।
दृश्य हें कोणती वृत्ति ना गुंगवी ! ॥ ११ ॥

साडणें माडणें काहिं लागे न त्या ।
मोडणें जोडणें हेंहि नाहीं तया ॥
क्षुद्र ऐसें जगत्सौख्य जो लेखितो ।
**स्वांतदृष्टत्व** आनंद तो भोगितो ॥ १२ ॥

काहिं नेणें अशा त्या भ्रमा त्यागुनी ।
ठेवि जो जाणण्याचीच इच्छा मनीं ।
लागतो सत्वेंर जाणण्याच्या पथीं ।
सत्यसंकल्पदाता असे श्रीपती ॥ १३ ॥

जाणता जाणता सर्व जाणे जसें ।
नेणतां नेणतां कांहिं नेणें तसें ॥
जाणणें नेणणें दोन्हि लोपे जिथें ।
**स्वांतदृष्टा** सदा राहि मोदें तिथें ॥ १४ ॥

नित्यश: स्वप्नसाम्राज्य जो निर्मुनी-- ।
सौख्य भोगी तरी सत्य तें ना गणी ॥
तेंवि पाहे जगीं वावरेही उगी ।
**स्वांतदृष्टा** असा तोच आहे जगीं ॥ १५ ॥

जाणतो जो जगा दीर्घस्वप्नापरीं ।
आत्मविश्वास जो ठेवितो अंतरीं ॥

ज्ञानरूपींच होउनी राहतो ।
**स्वांतदृष्टत्व** हें सौख्य तो भोगितो ।। १६ ।।
'जें न पाहे रवी' तेंहि पाहे कवी ।
या म्हणीतें जणूं हा असें चालवी ।।
सच्चिदानंद तत्वेंच हा सत्वर ।
पृच्छका नीववी देउनी उत्तर ।। १७ ।।
जें न जाणें विधी गुप्त ऐसा निधी ।
जी न लाभे कधीं स्वातदृष्टत्व धी ।।
तीव्र जिज्ञासु जो स्वरूपें त्यास हा ।
निर्विकल्पीं सदा मग्न ठेवी पहा ।। १८ ।।
सांत सादी अशा ध्वांत माया भ्रमां ।
लोपवी अद्वयांनतदीप्तीं तमां ।।
स्वानुभूतित्व ही ज्या स्थलीं लोपते ।
हेंच कीं **स्वांतदृष्टत्व** कैवल्य तें ।। १९ ।।
कल्पना तींत हे बोल जो ऐकवी ।
'ब्रह्म हस्तांतरीं' तेंहि कीं दाखवी ।।
स्वानुभूतित्व या अमृता चाखवी ।
एक आहे असा "**स्वांतदृष्टा कवी**" ।। २० ।।

पुणें.
भा. व. १ श. १८७९ }

---

## ९ सामर्थ्य सप्तक

वृत्त—मंदारमाला.

‘ व्याघ्रास ज्याचा दरारा असा हा महाशूर सिंहासही ना गणी ।
अश्वास हा लोळवी मुष्टिघातें महा मत्त मातंगही पाडुनी ॥
एकाच हातें कबंधें रणीं हा पहा नाचवीतो शताचीं शतें ।
**सामर्थ्य माझें मला पूर्ण ठावें म्हणा जें मनां काय मानेल तें १**
‘ बुध्यादिकत्वे बलाच्याहि योगें महाहिंस्त्र पश्वादिकां शीणवी ।
निःशंक व्याघ्रासवें कीं अजातें पहा एक पात्रीं पया पाजवी, ॥
घेती किती कार्य यन्त्राकडोनी कशी गोड ही मंजुषा बोलते ।
सामर्थ्य माझें मला पूर्ण ठावें म्हणा जें मनां काय मानेल तें ॥ २ ॥
स्फुलिंगही मत्प्रकाशाग्निच्या हे सहस्राश ना चन्द्रमा तो रवी ।
प्रत्यक्ष शून्यासही पाहतो मी, नसें अंतरिक्षाचिही थोरवी ॥
माझ्या स्वरूपाब्धिच्या साम्यतेनें गणावें महासागरा थेंब ते ।
सामर्थ्य माझें मला पूर्ण ठावें म्हणा जें मनां काय मानेल तें ॥ ३ ॥
होतो जगद्रूप तेव्हा जगातें मनीं जाणतो सांगतोही मुखें ।
जाणों जरी मी मला निश्चयानें मदीयत्व मी मात्र सांगू शके ॥
माझ्या स्वरूपा न कोणीच जाणें असें अद्वयाचिंत्य अदृष्ट तें ।
सामर्थ्य माझें मला पूर्ण ठावें म्हणा जें मना काय मानेल तें ॥ ४ ॥
लीलें महाकाशही डावलोनी अनंतांत मी वावरोनी क्षणीं ।
मायाज्ञतेच्या तमा घालवोनी वसे माझिया स्वप्रकाशांत मी ॥
स्वस्थान साडी परंतू न केव्हां अपूर्वत्व त्यांतील जें हेंच तें ।
**सामर्थ्य माझें मला पूर्ण ठावें म्हणा जें मनां काय मानेल तें ५**

सूर्यादि वस्तूस मी मत्प्रकाशें, तमालागिंही मीच पाहे जसें— ।
तैसें महाहूनही मीच मोठा, अणूहूनही सान मी होतसे ॥
माझ्यांत आहे अभावप्रमाही, जगधंतदध्ध्वही राहते ।
सामर्थ्य माझें मला पूर्ण ठावें, म्हणा जें मना काय मानेल तें॥६॥
विश्वाचिया बुद्बुदामाजि माझ्या, स्वरूपास बिंबास मी बिंबवी ।
सद्रूप होतो जगाच्याहि पूर्वी, असद्रूप ऐशा जगा भासवी ॥
राहीन माझाच मी एकटा, हें अनेकत्वही एक मद्रूप तें ।
सामर्थ्य माझें मला पूर्ण ठावें, म्हणा जें मना काय मानेल तें॥७॥

पुणें,
मा. व १ श. १८४९

[library stamp]

## १० स्वहित-सप्तक*

वृत्त—द्रुतविलंबित.

जनहितास्तव जो स्वहिताहुनी—झटतसे अधिकाधिक जाणुनी ॥
प्रभुहि तोषुनि तो करितो क्षणीं। निज दयाच तयावरि तत्क्षणीं ॥१॥
सकल भूतदया न जया मनीं। नर निरर्थक व्यर्थचि जन्मुनी।
क्षितितलावरि लाभलिया तया। विफल तें धन येइ न जें व्यया ॥२॥
जनचि जो जगिं जाणि जनार्दन। जनहि जाणति त्या निज जीवन ॥
करित जाइल जो जन पूजन। तरिच भोगिल सौख्य चिरंतन ॥ ३ ॥
घडलिया जनताहित तत्क्षणीं। लवहि तत्स्मृति ठेवि न जो मनीं ॥
करित कर्म तसें जरि सतत। तरिच त्यास मिळें सुख शाश्वत॥ ४ ॥
क्षणिक कर्महि तेंच तया क्षणीं। फलद होय, मदीय जया गणीं ॥
जरि करी लिखितावरती सही। तरिच जाचक होय तयास ही॥५॥
जन दुजे न जनार्दन अल्पही। गणत देवहि, देशहि, देहही, ॥
कृति किती जरि वृत्तिविणें घडे। फिरुनि ती न कधींहि गळा पडे ॥६॥
भुलवि ज्यास न कीर्ति निज स्तुती। सतत ठेवि समान मन:स्थिती ॥
**स्वहित** तेंच जगद्धित साधिल्या। उमगलेच अहेतुक कर्म त्या ॥ ७ ॥

पुणें,
रविवार, फा० शु० ६ शके १८४९

---

*मासिक मनोरंजनातून ही कविता आली आहे.

## २१ "सुखस्वरूप"*

वृत्त–द्रुतविलंबित.

सुखविती नच कोणि कधी कुणा
सुखद होय खरी निज कल्पना ।
स्मृति अशी निज वस्तुच वासना
सुखवि दाउनि आपुली आपणा ॥ १ ॥

सुखविण्या सकला कलिका किती–
लुटविती मधुगंध जगाप्रती ! ।
तरिहि होइ न ती सुखदा कृती–
मनुजवृत्ति जरी नच जाय ती ॥ २ ॥

अमित दृश्यहि दृष्टित मावतें
स्मृतिनिधीतळिं संतत राहतें ।
फिरुनि येत असें मनि तेंच तें
म्हणुनि आवडतें अपुलेंच तें ॥ ३ ॥

हरवलें अपुलें पहिलें नवें
गवसलें तसलें--तरि तें नव्हे-- ।
मिळविलें दुसरें म्हणती खुळे
परि जुनेंच मिळे नच त्या कळे ॥ ४ ॥

क्षणिक या विषया मनिं चिंतुनी
उगिच कां स्वसुखा मुकशी ज्ञणी ।

---

* ही कविता विविधज्ञानविस्तार जाने० १९२९च्या अंकांतून आली आहे.

क्षण तरी अवरी अपुल्या मना
करित जा मनुजा ! प्रभुचिंतना ॥ ५ ॥

विषयसंगति रगति जे जन
त्वरित खंगनि भंगुनि ते मन ।
नच असे हिरवा बरवा पहा
करिल भंग मनोरथ रंग हा ॥ ६ ॥

अतुल शूर, भले, कसले बली
विषयबर्फजलें भिजले जरी ।
तरिहि काकडले पडले जलीं
त्वरित ते बुडले दडले तळीं ॥ ७ ॥

दगड जे पडले बुडले जसे
कुणिं न ऐकियलें तरले तसे— ।
विषयिं जे रतले फिरले न ते
जन कसे भ्रमले रमले तिथें !॥ ८ ॥

प्रभुपदास सदा हृदयातरीं
वसविल्यासचि तो विजया वरी ।
अतुल होईल हो सुखि सत्वरी
सदनिं वा वनिं वावरला तरी ॥ ९ ॥

सकलसाक्षि असा प्रभु जो खरा
विषय हाच पहा अपुला करा ।
सहज होइल हो प्रभुच्या दयें
त्वरित सर्व निसर्गचि तो स्वयें ॥ १० ॥

अमित पुण्य जरी पदरीं असे
तरिच शांति खरी हृदयीं वसे ।
अतुल दिव्य असा **सुखरूप** तो
म्हणुनि ती सहजस्थिति भोगितो ॥ ११ ॥

पुणे
गुरुवार फा० शु० २ शके १८४९

## १२ कीं वेडे सगळे मिळोनि जगतीं बाजार हा मांडिती*

वृत्त—शा०वि०

वाटे कीं प्रियशोधनीं फिरतसे ही सृष्टिदेवी सदा ।
दुर्दैवी विरहातुरा भ्रमतसे तैसें न कोणी कदा ॥
स्वच्छदें विहरे असें जरि म्हणूं कष्टे अविश्रांत का ? ।
केव्हांही निजभोंवतींच मगही धात्री नव्हे भ्रांत का ॥ १ ॥
सोत्कंठा जणुं नित्य सस्मित अशी भानूदयीं भू दिसे ।
हर्षोल्हास तसाच अस्तसमयीं, हें वेड का हो नसे ! ॥
खेदें अश्रुज—निर्झरोद्गम कुठें शोकापगा भासवी ।
संतापें हृदया विदारुनि कुठें ज्वालामुखी दाखवी ॥ २ ॥
कोठें कोमलपुष्प धारण करी कोठें शिळे ते धरी ।
कीं कोठें विलसे सुहास्यलहरी दुःखाश्रु कोठें तरी ॥
केव्हां रुक्ष कधीं सुरम्य मग हें वैचित्र्य कीं क्रांतिचें ।
खेदोल्हास तसें प्रियाप्रिय गमे वैषम्य कीं भ्रांतिचें ॥ ३ ॥
आनदें जरि ही अलकृत अशी भासे जगातें दिनीं ।
शोकें तीच तमीं कचा विखरुनी तद्रूप घे मेदनीं ॥
त्यागोनी निजरूप कीटक धरी भृंगस्वरूपी जसें ।
भूदेवीपति विष्णु चिंतनिं जणूं कृष्ण स्वयें होतसें ॥ ४ ॥
हर्म्योद्यान सुरम्य कोमल अशा पुष्पा फला त्यागुनी ।
कांतारीं विरही वसे म्हणुनि तो भ्रांतिष्ट होई जनीं ॥

---

* मासिक मनोरजन एप्रील १९२३च्या अकांतून ही कविता प्रसिद्ध झाली आहे.

वेडया या वनदेविनेंहि अपुल्या वेडात की हो असे— ।
कांटे साठविले समस्त अपुल्या ओटींत भ्रातिष्टसे ! ॥ ५ ॥
खेदें ओरडती घनव्रुज, जसे वप्राद्रि आक्रंदती ।
वृक्षव्रातहि वारिवाहसम त्या दु खाश्रु कां गाळिती ! ।
का हो साठवि कूप पल्वल तथा ओढे नद्या वाहती ।
**कीं वेडे सगळे मिळोनि जगतीं बाजार हा मांडिती ॥६॥**
होती क्षारतरग अर्णविं नद्या त्यागोनि स्वादिष्टता ।
सोडी तो न परंतु अल्पहि कधीं क्षारत्व काषायता ॥
त्या वेडया—असुनी सुधा परिसुखें होतात सिंधु स्वयें ।
तोही पूर्ण खुळा तया मधुरता ससर्गयोगें न ये ॥ ७ ॥
वाटे धन्य कवीस जीं विलसनें हास्योपमा योजुनी ।
नक्षत्रां बघुनी जसें म्हणति 'ही हासे जणूं यामिनी' ॥
येई हास्य न कां बघोनि असली हास्यास्पदायोग्य ती ।
कीं दु खी हृदया जसे गमतसे तैसेंच ते कल्पिती ॥ ८ ॥
शोकावेग न साहवे म्हणुनिया जैशा स्त्रिया भाबडया ।
बाधोनी कटिला शिला झडकरी कूपात घेती उडया ॥
तैसी घेई जणूं उडी घनतमीं सौदामिनी भूवरी ।
रात्रीं नित्य किती तरीहि अवनीं नक्षत्रही त्यापरी ॥ ९ ॥
आकाशांत शशाक शात दिसतो तैशा तयाच्या कला ।
हर्षे पूर्ण परा प्रसन्न परि तो दुःखीच भासे मला ॥
आशा वा जगण्यास साधन खरें काहींच जेव्हा नुरे ।
कीं आता मरणें बरें म्हणुनिया हा कृष्णपक्षीं झुरे ॥ १० ॥

---

वीज.

जेव्हा भास्कर अंबरीं उगवतो का हा पडे पादरा ।
तारा सर्वहि लोपल्या म्हणुनि कां झाला असा घाबरा ॥
ज्याचें दु:ख तयास ठाउक जरी, हा मात्र भीरू खरा ।
तैसा भ्रातहि शोकमग्न विधु कीं राखी न धैर्या जरा ॥ ११ ॥

ऐकोनी वच हें 'उषा हसतसे' ऐसें हंसें येतसे ।
आतां संशय येइ सत्यचि मला लागेल हास्यें पिसे ॥
हास्याश्रू गळती—परंतु किति ते?—अत्यल्प—ऐसें कसें? ।
अश्रूनेंच सबंध भूमि भिजते—हासे कुणी का असें? ॥१२॥

नीहाराश्रु बघोनि कोणिहि म्हणे "खेदें रडे ही उषा" ।
वाटे ही उपमा कधीं नच—खऱ्या, न्यायी, रसज्ञा, मृषा ॥
या साक्षीस समस्त पंकज जलीं—हें वृक्ष हस्तातलीं ।
किंवा अश्रु अनेक घेउनि उभे प्रत्येक पर्णांगुलीं ॥ १३ ॥

प्रात:कालिं गमे सहस्रकर कीं आलिंगनोत्सुकसा ।
ये बाहू पसरोनि, कोणिं म्हणती आरक्त का हो असा? ॥
कीं कामांध अधीर होउनि वळें कीं धुद झाला मुदें? ।
पृथ्वीच्या इतुक्या समीप जणु कीं संलग्न झाला मुदें? ॥१४॥

माध्यान्हीं मग उच्च जाइ इतुका संतप्त का होउनी? ।
कीं कोणी विरहभ्रमात स्वजना त्यागोनि जाइ वनीं ॥
येई खालति सत्वरें पुनरपी गेला जसा तो नभीं ।
घेई शेवटीं अर्णवीं रवि उडी, मृत्युस दु:खी न भी! ॥१५॥

प्राणत्याग करावया म्हणुनियां प्राणी अकालीं जरी ।
मृत्यूचा अपमानही करुनियां देती पराच्या करीं ॥

सत्तेचा उपयोग काळ न करी संतप्त जीवा वरी।
तोही दु:खि म्हणोनि कोप अवरी, ठेवी दया अंतरीं ॥१६॥

किंवा भ्रांत तयास कां म्हणु नये–मृत्यूस जे इच्छिती।
त्यातें मागुनि–सत्वरें प्रियजना सौख्यांत जे नांदती॥
नेतो क्रूरपणें विभक्त करुनी पाही न दु:खी सुखी।
योग्यायोग्य अबालवृद्ध न गणीं, सर्वांस टाकी मुखीं ॥१७॥

पाहोनी नभिं **मेघ** वृत्त कथणें की **दूत** त्या कल्पणें।
**रानामाजिं न काय कोण** बघणें वृक्षादि आलिंगिणें॥
**काया दंडविणें बहुत परिनें**, किंवा शवा रक्षिणें।
दु:खानें विरहीच धारण करी–ही भ्रांतिचीं लक्षणें॥ १८॥

उत्पत्ति स्थिति नाश हे त्रिविधही जीवां उपाधी जसे।
ईशा विश्व–म्हणोनि विश्वविरहीं ऐक्यत्व आत्मीं वसे॥
प्राणत्याग परिस्थितींतहि वसे जो मुक्तताहीन तो–।
प्राप्तेच्छा प्रियवस्तुची धरुनिया प्राणी पुन्हां जन्मतो॥ १९॥

हैद्राबाद, दक्षिण
गुरुवार, मार्ग० कृ० ८ शके १८४३

## १३ चंपकमाला

वृत्त—चंपकमाला.

चपकमला जी नयनाला, लुब्धवि देई हर्ष मनाला
गुगवि वृत्ती हाय अशी ती, अंगणि एक्या लोळत होती ॥१॥
ती पडलेली ती मळलेली, विस्कटलेली ती तुटलेली
कुस्करलेली कीं सुकलेली, तीव्र उन्हानें जी जळलेली ॥ २ ॥
सौरभपाशा घालुनि पायी, जी पथिकाला ओढुनि नेई
पाउल काहीं टाकु न देई, संतत जी का गुंगुनि ठेवी ॥ ३ ॥
हाय अशी ती चंपकमाला, साहत होती दैन्यदशेला
दिन जनाच्या तीव्र छलाला, दुष्ट मनाच्या क्रूरपणाला ॥ ४ ॥
भोगित होती हाल अपेष्टा, वानर किंवा राक्षसचेष्टा—
का न गणावे या असल्याला, कोण म्हणावे मानुषलीला? ॥५॥
का उगि द्यावा दोष कुणाला, व्यर्थ कशाला दु ख मनाला
का दुसऱ्याला कीं अपुल्याला, मानहि द्यावा दैवबलाला ॥६॥
काहिं म्हणा ती चपकमाला, दीन मुखानें दृश्य जगाला
दावित होती कीं सुहृदाला, मागतसे ती न्याय जगाला ॥७॥
काय परीक्षा ही रसिकाची, घेत असे, कीं न्याय नयाची
कीं सुहृदाच्या सज्जनतेची, भूतदयेची, माणुसकीची ? ॥८॥
पाहुनि माला भान उडालें, चित्त कवीचें आर्द्र जहालें
शाति तयाची भगुनि गेली, दु·खित झाला शुद्धि निमाली ॥९॥
सत्वर ऐशा हाक निघाली, धाउनि येईं गा वनमाली
याच निनादें गुगुनि गेला, सतत वाहे धीर न ज्याला ॥१०॥
धांवत गेला धाउनि आला, बावरलेला घाबरलेला
उच्चरवानें तो सकलाला, मारित हांका कीं भ्रमराला ॥११॥

पुष्प पाहुनी धांउनि येई, सतत तेथें गुंगुनि राही
जो सुमगंधा नित्य भुकेला, हाय! कसा हो तोहि न आला? ॥ १२ ॥
अंतरिं बाहे त्वरि धावे, उत्सुकतेनें तत्क्षणिं पाहे
जो निजधांवा ऐकुनि धावे, त्या असल्याला काय म्हणावें? ॥ १३ ॥
सर्व सुमांना तोषवुं जाणे, एकुण एका गाइल गाणें
येइल येथें भृंग कधीं का? व्यर्थचि साऱ्या होतिल हांका ॥ १४ ॥
चंपकपुष्पा सन्निध येणें, होइ जयाला लाजिरवाणें
काय न ठावें त्या मधुपाला, येथ असे ही **चंपकमाला** ॥ १५ ॥

पुणें, सदाशिव
सोमवार, फा० शु० १५ शके १८५०

## १४ कवीचें जग

चाल—श्यामाराणी.

शब्द सृष्टि जी धांवत शून्यीं
नव्योज्जीवन तींत घालुनी
तमस रसातल स्वर्ग करोनी
अचलवासि जनाला दावी ऐसा एक असे कवि तो ॥ १ ॥
बघत सदा दिव्यप्रभ कांती
हर्ष शांति तद्धृदय प्राप्तीं
ती पसराया जगदभ्यंतरिं खपत अहर्निश जो असतो ॥ २ ॥
मनोलोभनीया वसुधा ही
उरुनि भरें दिग्प्रांतहि दाही
तरिही जागा अपुरी होई
म्हणुनि कल्पानानभ निर्मुनियां स्वैरपणें तेथें वसतो ॥ ३ ॥
दिव्य कल्पलतिकेला सुमनें
निर्मुनि त्यावरि रचितो कवनें
दिव्यप्रेम निबंधन घालुनि, प्रबंध, अपुले ऐकवितो ॥ ४ ॥
विशुष्कतरु मधुमास नसे तरि
कोमल नवपल्लव शोभित करि
कलिकान्वित ही करोनि सत्वरि
सौरभशालि सुमें निवडोनी, प्रेमानें गुंफित बसतो ॥ ५ ॥
अपुल्यातच गुणगुणत बसे
कधीं लकेरी फेंकितसे
दिव्य भावमय उत्सुकतेनें, अवाङ्मनोगोचर गातो ॥ ६ ॥

निज गायन जंव तो ऐकवितो
दुर्भग सृष्टी थरारवीतो
चराचरात्मक विश्वगोल तो
लहरि–विलासावरी तरगत, अहा ! कसा संतत झुलतो ॥ ७ ॥

द्राक्षासवपानमत्त दिसतो
कधिं नदन काननीं विहरतो
तेथिल अद्भुत गोष्टी सांगुनि, चकितचि लोकाना करितो ॥ ७ ॥

चित्त सदाचें ज्याचें उघडे
गौप्य वाच्य भेदीं जो न पडे
शुद्ध मोकळेपणा आवडे
ब्रह्मांडातिल अणुरेणूंशीं, प्रेमभरें बोलत बसतो ॥ ९ ॥

कधिं हर्षाचें उकली गूढ
तीव्र दु:ख गरल व्यामूढ—
जरी असे तो स्वयें परतू, स्वमुखें पीयूषा स्रवतो ॥ १० ॥

त्याचा एक विषय आवडता
कविता अथवा रसिक श्रोता
भाग्यें अवचित गाठीं पडता
निज काव्यां ऐकवीत असता, विश्वाशीं हितगुज करितो ॥११॥

कुणास कधिं सुखदु:ख सागतो
हृदय भावना व्यक्तहि करितो
मनोयोजना ही कधिं सांगे, जेव्हां कां अगदीं खुलतो ॥ १२ ॥

" व्योमाच्छादन जीर्ण जाहलें
किती दिसाचें बुरसटलेलें

शाकारावें म्हणतों—अपुलें
जें जें जेव्हा घडें खरें परि, उगींच अपुलें "हें" म्हणतों" ॥१३॥
बोलत असतां मधेंच गुगे—
"का ईशानें असलीं व्यगें
अजुनि ठेविलीं—सहज गोष्ट ही,—परि न मनावरि तो घेतो"॥१४॥
मनात येता धीर न त्यातें
लवेक ही पण युगसम गमते
शंका कशि ती—कधीं न शिवते
लगेंच अपुल्या कल्पित जगतीं, साधुं लागतो यत्नहि तो॥१५॥
हिमकणिका मृदुकमलदलावरि
चिरस्थायि करि त्या मौक्तिकपरि
अद्भुतचारा प्रेमें स्वकरें, हंसाला कीं चारवितो? ॥ १६ ॥
परभृत, शुक, षट्पद मधमाशी,
क्रौंच, हंस, चक्रवाक, दंशी
मयूर, सारस, बकादिकाशीं
गोड बोलके करोनि संतत, गप्पा हाकितही बसतो ॥ १७ ॥
चंपक नव पुष्पांवरि बसवी
भृगतती—गुंजारव करवी
मधुपानहि मनसोक्त करवुनी, तृप्तमनें आपण हंसतो॥ १८ ॥
पुष्पान्वित चंदन औदुंबर
बकुल पारिजातकादि तरुवर
क्षणोक्षणीं वाढवीत झरझर
पुष्पवत फलसतति त्यांची, विविधपणें सवर्धवितो ॥ १९ ॥

स्वातंत्र्याचा अविरुद्धानिल
स्वैरपणानें--आनंदोत्पल
विकसवोनि--काचन--कस्तूरी--पराग सतत उधळवितो ॥ २० ॥
कंटकविहिन केतकीपर्णें
तत्सम संशोभनीय सुमनें
त्यावरि निर्मुनिया हर्षानें
स्वोद्यानातिल पुष्परसाची--सुगंधसरिता वाहवितो ॥ २१ ॥
**कविचें जग**--फल कल्पतरूचें
त्रैकालिक सत्यत्व तयाचें
"स्वर्ग, मृत्यु, पाताल काल्पनिक" हेंच खरें पटवित असतो ॥२२॥
चिरमंगलमय उषाच जेथें
रम्योद्याना हसवित असते
आनंदाचें अंबर तेथें
सुषुप्ति जागृति जड जाणोनी, तैजसविश्वामधिं वसतो ॥ २३ ॥
म्हणे 'धन्यकवि' जरि जो तो
धन्य खरा जो तोच जाणतो--
अनुपम '**कविचें जग**' ती जागा, सदैव जागा जो असतो ॥२४॥

हैद्राबाद दक्षिण,
रविवार, श्रा० कृ० ३ शके १८५०

## १५ निसर्गदेवींची भूपाळी

चाल—केशवकरणी

ऊठ पहा रे मन्या लाडक्या माझ्या एकुलत्या
लाडक्या, माझ्या एकुलत्या !
दिशा उजळल्या रात्रभरीं ज्या होत्या व्याकुल त्या ॥ ध्रु० ॥

नक्षत्राचा केर नभींचा झाडुनिया ही उषा
उजळवी बघ या दाही दिशा ॥ १ ॥

पक्षांची ही रुंजी ऐकुनि वृक्ष पहा डुलती
पाकळ्या कलिकांच्या खुलती ॥ २ ॥

व्योमींच्या निजसदनीं खग बघ उंच किती उडती
बघुनिया तरुवर आनंदती ॥ ३ ॥

दुर्वांकुरही निज शिर उन्नत वरचेवर करिती
बालिश लीलें उडूं बघती ॥ ४ ॥

हंसरि उषा ही आनदानें बघ स्वागत करिते
धन्य रे भाग्य जागृताचें ॥ ५ ॥

निद्रित जग पाहुनि कुणि नेलीं कुसुमें गगनींचीं
शोभा जी का त्रिभुवनिंची ॥ ६ ॥

फुलें एकसर गेलीं वरचीं वरच्या वरि उडूनी
परंतू फुलति विविध भुवनीं ॥ ७ ॥

उपवन फुललें, सदनहि फुललें, अपुलें मन फुलले
सौरभ दरवळुनी गेलें ॥ ८ ॥

पीतवर्ण तें सुवर्ण झळके गिरिशिखरावरती
रुप्याचे झरे वाहताती ॥ ८ ॥

निज पितयाच्या अकावरि या खेळति गिरिकुमरी
आपगा चपलगामि सुदरी ॥ १० ॥
पतिसदनीं जावयास बघ ह्या अधिर कशा दिसती
घेउनी उड्या त्वरें पळती ॥ ११ ॥
बघ हा वट एकाग्र मनानें उग्र तपा बसला
तपस्वी असा न कधिं दिसला ॥ १२ ॥
जटा, स्मश्रु, नख, इतुकें ज्याचें वाढुनिया गेलें
भूमींमध्यें ते शिरलें ॥ १३ ॥
श्रीप्रभुसाक्षात्कारभाग्य हा सतत अनुभवितो
म्हणुनि कीं प्रेमअश्रु ढाळितो ॥ १४ ॥
रक्तपीतवर्णाचा कसला तेजोमय बघ हा !
झळकतो राजमुकुट किति अहा ! ॥ १५ ॥
ठेवुनिया दिक्पाल मुकुट हा नगराजाच्या शिरीं
वारित रश्मिचामरें वरी ॥ १६ ॥
अर्पण करण्या पुष्पगुच्छ ते, मधुर फळें बघ तीं
घेउनी वृक्ष उभें असती ॥ १७ ॥
धेनु निघाल्या उत्सुकतेनें वना जावयाला
कामिनी लागति कामाला ॥ १८ ॥
बघ जग सारें जागें झालें सोडि बिछान्याला
आळशी असला तू कसला? ॥ १९ ॥
**" जो सोया नर वोहि गमाया, जागा सो पाया "**
हाच रे उन्नतिचा पाया ॥ २० ॥

जागा जो नर तोच मिळवितो विश्वहृदयिं जागा
मिळवि रे ! नित्य नवी जागा ॥ २१ ॥
भक्त गाति यश प्रभुमहाद्वारीं तूंहि ऊठ जा, गा,
ऊठ रे ऊठ होइ जागा ॥ २२ ॥

संस्थान श्रीमाणिकनगर
सोमवार, श्रा० व० १० शके १८४९

* * * *

## १६ मनुजा ! ( वृत्त–पृथ्वी )

" कशास बसशीं " ? असा सतत खिन्न का होउनी ? ।
तुला सुखविण्या पहा झटत विश्व रात्रंदिनीं ॥
म्हणोनि तुज आयुही बघ तसें पुरेसें मिळे ।
वृथाच **मनुजा** ! तया करिशि ज्यास ईशें दिलें ॥ १ ॥
उगेंच नभ कां खुलें ? रवि न चंद्र – आमानिशीं ॥
विरक्त विधवा जशी – शशिविहीन ही का तशी ?
वृथाच मग काय या चमकती नभीं तारका ? ।
स्वयत्नबल पाहुनी करित कार्य नाहींत का ? ॥ २ ॥
" कशास जगशीं " ? तुझा उगिच भार विश्वास ना ? ।
अतृप्त तरि भाळशीं विषयसौख्यआश्वासना ॥
क्षणात किति कीट ते उपजले व मेले उगीं ।
" कशास मरशीं " ? तसा जरि न काहीं केलें जगीं ॥ ३ ॥
वजाच करिशीं, अहा ! वय, तुझें पिसें हें कसें ? ।
विभागशि दुज्या जगीं, जगत हें सदाचें नसे ॥
म्हणोनि करि बेरिजा, मिळवि कल्पना कीं नवी ।
गुणोनि तव सद्गुणें शतगुणें तया वाढवी ॥ ४ ॥
सदैव बघ पाजळे तव करीं स्फुरद्दीपिका ।
तिचा सदुपयोग बा ! करुनि धन्य होशी न का ? ॥
असोनि सुरधेनु ही पुरवि नित्य साहित्य जी ।
किमर्थ दवडोनि ती करिशि हाय सेवा दुजी ॥ ५ ॥
महत्कृति अशी करी स्मृति तुझी जगीं राहुं दे ।
सकौतुक विलोकनें सतत विश्व डोले मुदें ॥

अशाश्वतचि सर्व तें जगतिं वस्तु व्यक्तित्व ही ।
नकोच मन गुतवू चुकुनि पुत्र पौत्रादिकीं ॥ ६ ॥
अताच — जरि का म्हणू — " अशुभ ह कशाला वदा " ।—
कृतांतहितकांक्षिणी टपतसे जरा सर्वदा ॥
सदैव तुजभोंवती मरणही तुझें कीं फिरे ।
तुझें व्यसन पाहुनी पडति सन्मनाला घरे ! ॥ ७ ॥
कसेंहि उधळावया नसतिं आयुरत्नें अहा ।
तव स्मृति कलत्र हे उलट घालवीती पहा—॥
नवें सदन बांधिती निज चरित्र वर्धावया
तयास सुखवावया उगिच घालवीशीं वया ॥८ ॥
नसोनि जगतीं जसें शशिमिषें वसे भास्कर ।
असेंच करि कार्य जें जगति होय श्रेयस्कर ॥
तशीच जगिं ठेविं तूं कृति तुझी चिरजीविनी ॥
जिवंत असता जशी तुजशि होय आल्हादिनी ॥ ९ ॥
सदैव जरि राहशी जनहितास तू जागुन ।
तरीच जग या जगीं, सफलही तुझें जीवन ॥
जनास्तवचि कीं तुला अतुळ जन्म हा लाभला ।
जगद्धित न साधल्या जगुनि व्यर्थ धिक् धिक् तुला ॥ १० ॥
निरिच्छ जगिं धन्य, तो उलट भोंववीतो भवा ! ।
जगास मग तो हवा तरि, सदैव होतो नवा ।
जगज्जननि—जीव जे जगतिं जीवत्री जी धरा ।
म्हणेल कधिं का कुणा? " पडत मी, मला कीं धरा" ? ॥ ११ ॥

शालीबंडा, हैद्राबाद दक्षिण
मंगळवार, श्रा० शु० ६ शके १८५०

## १७ स्फुरदेवते ! ( वृत्त–पृथ्वी )

मलाच मुळिं ना कळे हरवलें असें काय तें
कुणास मग आकळे – नच कधीं खरें वाटतें ।
मदीय यशवर्धिनी जननि काव्यदेवी तिला–
असें सकल ठाउके करिल ही कृपा इच्छिल्या ॥ १ ॥
नकोच कधिं अल्प ती कसलिही मला काळजी
मदीय हितसाधनीं सतत घालवी काळ जी–
तिच्या पदिं निमग्न कीं सतत राहणें त्यागुनी
कशास डबकीं बघू सुगम सोडुनी स्वर्धुनी ? ॥ २ ॥
अशी न जगतातली कुणिं न पाहिली ऐकिली
वसोनि जगतातलीं विहरते नभीं एकली
मुकी असुनि बोलते डुलविते शिरांदोलिका
प्रगूढतर दाविते सहज ही स्फुरदीपिका ॥ ३ ॥
कुणी तरि म्हणे असें " कितिक आज राष्ट्रें जगीं
सभाग्य–तरि आजही म्हणवि हें **महाराष्ट्र** कीं
तिथेंच तव जन्मही–असुनि मातृभाषा तुझी
जिला विबुध वानिती म्हणविते **महाराष्ट्र** जी ॥ ४ ॥
अमूल्य बघ हे हिरे दवडतोसि निश्वास जे
करी हरण ती जरा तुजशि न्यावया जी सजे
त्रिकोश करण्या तुला टपत काल हा तस्कर
तुझें असुनि होतसे परि दुजास श्रेयस्कर ॥ ५ ॥
तुझ्यावरि–गमे कृपा स्फुरणदेवतेची–जनीं
तदीय यश गाइ रे सतत तें स्वभाषेंतुनी

त्वरेंच विसरीं कसा गतकृती अतांपासुनी ?
असें वचन ऐकुनी चरकलों तदा मी मनीं ॥ ६ ॥
तपें उगिच दोन कीं दवडिलीं असें वाटलें
प्रसून परकीय जे तवपदीं वलें वाहिलें
जरी कवनमालिका तशि न लावली फारशी
परतु उरदूंतुनी–म्हणति हीन जी फारशी ॥ ७ ॥
अशी धरिलि लालसा लिहिन एक दीवानं[1] मी
जरी तपयुगीं श्रमे तरि न कांहिं मानीन मी
असोत बहु कटकें नच कधींहि त्या मी नमी
तदाब्धिगत जाहलों सवयिनें तसा मीन मी ॥ ८ ॥
तदर्ध अधिका अशी गणति झालि प्रत्यक्षरी
त्वरेंच परिपूर्तता सहज होत होती–तरी
बघेन नच त्या पुन चुकुनिही न कीं पाहिलें
त्वदीयपदिं एकदां मम सुचित्त जें वेंधलें ॥ ९ ॥
अशा करपल्या फुलां कधि सुगंध कां येइल ?
विशुष्कमनवृक्ष हा नच गमें फलें देइल
जरी न मनिं वाटलें मज मिळेल उद्धातृता
परी तव कृपाच कीं करित शक्यही सर्वथा ॥ १० ॥
प्रदग्ध हृदयास कीं करिशि तू क्षमा तत्क्षणीं
कृपामृततुषारही त्वरित त्यावरी सिंचुनी

---

१ पर्शियन वर्णाक्षर प्रासांतून क्रमानें लिहिलेल्या अनेक कवितांचा संग्रह.

नवीन मृदुपल्लवा, मधुर, रम्य पुष्पा, झणीं
सुनिश्चयफळा उभविलेंस तू मन्मनीं ॥ ११ ॥

गतस्मरण जाहलें न कधिं, एकदा जें त्यजी
म्हणोनि घडली पहा अशी दशाब्द सेवा तुझी
प्रभुस्तवन ही कवीं, स्वमनभावसूक्तावली,
निसर्गमयवर्णनें—तरिहि तीं तुला अर्पिलीं ॥ १२ ॥

अनेकविषयातुनी—सकल चाळिली ही मही
सुतत्त्वमधुसार तें म्हणुनि कांहिं अध्यात्मही—
जसें मजशि प्रेरिलें लिहित मी, न गर्वाकुल
असें सकल काव्य हें तुझिच दिव्यता उज्ज्वल ॥ १३ ॥

तवस्फुरण तें अहा! लव न हालता डोलता
कसें कवन निर्मितें त्वरित चालता बोलता!
स्वयें सतत जागवी हळु हळू मला टोंचुनी
अशक्तवच, होति त्या गुदगुल्या कशा आतुनी! ॥ १४ ॥

कधीं स्फुरणशक्ति ती मजशि सांगते कीं पहा—
"कशी मधुरकल्पना! सरस शब्द कैसे अहा!
असाच जरि राखिशीं बसुनि वृत्तिसातत्य कीं
कितीक कवनोत्पलां बघशिं रम्य काव्योदकीं ॥ १५ ॥

समीरगत गंधही दरवळेल दाही दिशा
अनेक दिसतील ही तुज परागराशी तशा
नको तुजशिं वाचणें कधिंहि पाणिनीयावली
परी बघ दिसेल ती कशिहि काव्यरत्नावली"! ॥ १६ ॥

नितांत मनिं हर्षलों, गणुं शके न मी धन्यता
अशक्यतर वाटलें कलन दिव्यवात्सल्यता
समानहृदि कोणि ना गवसलाच, मी एकला
गमे तरिहि लागते, अहह, दुष्ट माझी मला ॥ १७ ॥
कधींहि नच **फारशी, अरबि**ही न अभ्यासिली
न **संस्कृत** हि त्यापरी कधींहि शास्त्ररीती मुळीं
तरी **स्फुरणदेवते !** करिशि सव्यसाची मला
सदोषतहि दों करें नमन हें असो गे तुला ॥ १८ ॥
निमग्नमयवृत्तिनें कवन फक्त तें वाचलें
" भवाब्धितलिं राहिले तरिहि तेच कीं वाचले—"
असें मजशिं वाटलें स्तवन तें तुझें वाचता
न मृत्युवश—भक्तो—तरि सदैव कीं वाचता ॥ १९ ॥
निमग्न तुझिया पदीं मन जधीं असें त्या क्षणीं
तव स्मरणमग्नता स्फुरण देववीते झणीं
विशुद्ध मन नाचतें विसरुनी जगद्भावना
स्ववृत्तिरत जाहल्या मग तुझीच आलोचना ॥ २० ॥
तुला लपवु काय तें सकलभावनासाक्षिणी ?
नर्मेंदुनयनोत्सवे, ममनाब्धिसवर्धिनी !
मदीय कवितेस ही बघुनि मीच कीं हर्षतों
अवर्ण्य सुख भोगतों हंसित वृत्तिनें डोलतों ॥ २१ ॥
मदीय हितकांक्षिणी नतकृपासुधावर्षिणी !
मदीय हृदिवासिनी सतत चित्तसमोहिनी !

मदीयसुखवर्धिनी सुफलदा यशोकारिणी !
मदीयअघहारिणी सकल सिद्धिदा स्वर्धुनी ! ॥ २२ ॥
तुला सकल ठाउके–मत न अल्प आत्मस्तुती
त्वदीय यशवर्णनीं स्वमत सत्यवस्तुस्थिती
तुझें भजन गायिलें सुमन तें तुला वाहिलें
तुझ्याजवळिं राहिलें तंव तुझेंच तें जाहलें ॥ २३ ॥
जुनेंच जगिं सर्व तें बघति लोकही तेंच तें
नवीन यदि जें–तुझें सकल तें **स्फुरदेवते**
तरीच तंव चिंतितों चरणयुग्म चेतोहरे !
असाच मज राहु दे सदयचित्तरत्नाकरे ! ॥ २४ ॥
अनादि असुनीहि कीं वससिं नित्य तूं नूतन
तुला स्तविति वेदही करिति शास्त्र कीं वदन
स्तुतीच तव ती–परी म्हणति "कोकिलाकूजन"
स्वरूप तव मंत्र ते करिति देवतापूजन ॥ २५ ॥
कुणास जरि आळवी तरि तुझीच सेवा घडे
जुळे तरिच शब्द ही कवन जें तुला आवडे
स्वरूपमयमूर्ति ही पटवि साक्ष साक्षात जी
अशी हि कविताच, का हुडकण्यास जावे दुजी ॥ २६ ॥
कुणाहि मज टाकलं उचलुनी कुठेंही जरी
तुझ्याच चरणावरी शिर मदीय आहे तरी
बघें यदि कुठेंहि मी तरि तुलाच आलक्षितों
द्वितीय अवनीवरी नच तुझ्याविणें पाहतों ॥ २७ ॥

त्वदीय भजनांत, ही मम गिरा सदा राहते
म्हणोनि मनिं मानतो स्फुरण जें—तवोद्दिष्ट तें
सरस्वतिच कीं स्वयें कविमिषें जणूं बोलते
कसेंहि तरि वाटतें—मधुर, बोबडे बोल ते ॥ २८ ॥
कशीहि मग ती असो-सरस, हीन—काव्यकृती ।
चमत्कृति तुझीच ना ? **स्फुरणदेवते** ! सर्व ती
तरीच म्हणती "अती महति कीं कवीची जनीं
तयास बुध आदरें बघति वागवीती मनीं" ॥ २९ ॥
परंतु खरि तृप्ति कीं मज गमें अनिर्वाच्यता
तशाच समयीं मला अतुल वाटतें धन्यता
यदा करिशि वर्णनीं मजशि शक्त ज्या ज्या क्षणीं
रसें सुगुणगायनीं, सुखदकालसंवर्धिनी ! ॥ ३० ॥
'मदीय कविता' असें म्हणुं तरी कसें काय तें !
सुशब्द मधुवाक्य जे, सकलही स्वयंसिद्धते
मदीय म्हणुं योजना तरिहि वृत्त वा छंद ते
अधींच ठरले असे नियम सर्व सर्वां मतें ॥ ३१ ॥
तुझ्यास्तव नसेच हें स्तवन कीं, स्तवांतर्गत—
शुचिप्रभवता मिळे—स्तुतिहि होत दिव्यामृत
पुढें जगतिं होय ही कविमुखीं सुधा सिंचुनी
'म्हणोत "कविता" कुणी—' अमृतदायि संजीवनी ॥ ३२ ॥
'अनुग्रह तुझा असो मम शिरीं' जरी हें म्हणूं
बळेंच तुज सारुनी मज विभक्त मी का गणूं ?

सुनिश्चितपणें असे तव कृपाहि आधींच ती
तवस्तवनिं सज्ज ती म्हणुनि जाहली मन्मती ॥ ३३ ॥

कधीं न रणगर्जना श्रवणिं ती कशी ऐकिली
अजूनि रणभूमि ना जननि गे ! कधीं पाहिली
गर्भे—तुजाशिं आवडे म्हणुनि नाव तें ठेविलें
अधींच **यशवंत** कीं, करुनि मागुती निर्मिलें ॥ ३४ ॥

मु• शालीबंडा, हैद्राबाद द०
गुरुवार, श्रा० शु ८ श. १८५०

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल
स.

## १८ रजनीची रात्र

( वृत्त—उद्धवा० )

झालि गे निशी तव आतां । **झोप गे लाडके रजनी !**॥ध्रु०॥
ही उषा अवदसा कसली ? । संतापें उसळुनि आली ।
नक्षत्र भूषणें तूझी । ऐश्वर्य सकल ही हरुनी ॥
तुज लोटित पश्चिम भागीं— । चालली गेलिगे गेली ।
किरणास पुढें पाठवुनी
तव अभाव ऐकुनि कानीं
उगवेल सूर्य मग गगनीं
अवरील सकल ही अवनी । **झोप गे लाडके रजनी !** ॥१॥
रविनें कां केला अगदीं । तव मुखावलोकनत्याग ।
कां द्वेष असा तुजवरती । पाखडतो कां गे आग ? ॥
तव नाथावरिही दिसतो । सारखाच याचा राग ।
हाय ! हा निशापति भ्याला
का असा पाढरा पडला ?
पडला कीं कोठें दडला—
या अवनीं कीं त्या गगनीं ? । **झोप गे लाडके रजनी !** ॥२॥
कालाचें फिरतें चक्र । तुजवरि तें झालें वक्र ।
तव उदय काल येइल तों । अवगुंठित असुं दे वक्र ॥
उखडतें तुझ्या साम्राज्यीं । जें दिव्य कृष्णघन छत्र ।
तो रक्त, पीत वर्णाचा
दाडाच तयाचा बघतां
तोषतो तरणि जो आता
मग पळेल मुख लपवोनी । **झोप गे लाडके रजनी !** ॥३॥

ऐश्वर्य तुझ्या राज्याचे । दागिने हिऱ्यामोत्याचे ।
कुणि म्हणेल सुंदर कुसुमें । कीं कुणीं तेज रत्नाचें ॥
नक्षत्र, तारका, उल्का । सारेच अनन्वय साचे ।
चकचकाट नक्षत्राचा,
लखलखाट तो तारांचा,
परिवार तुझा, तव पतिचा–
कीं भरला अंबर सदनीं । **झोप गे लाडके रजनी !** ॥ ४ ॥
हा एकलकोंडा असला । पोरका भिकारी दिसतो ।
परिवारहि कांहिं तयाचा । तामस कीं तापसि गमतो ॥
डोकींत राख घालोनी । या व्योमवनीं कीं फिरतो ।
ऐश्वर्य तुझें तें तसलें–
या दीन दिनकरां कुठलें ?
पाहिलें न कधिं ऐकियलें
कल्पना न त्याच्या स्वप्नीं । **झोप गे लाडके रजनी!** ॥ ५ ॥
चंडोल गातसे गगनीं । धबधबा उंच गर्जोनी ।
गिरि दऱ्या हाक फोडोनी । कुणि रडुनि कोणि हासोनी–॥
सुचविति जे एकवटोनी । अर्थ हाचि येतो ध्यानीं–।
किलकिलाट कीं पक्षाचा
गोंगाट म्हणा वृक्षाचा
दगडासहि फुटोनि वाचा
ध्वनि हाचि येतसे कानीं । **झोप गे लाडके रजनी !** ॥६॥

मु० पुणें, सदाशिव [आळंदी मोटारींत]
सोमवार का व ११ श. १८४९

## १९ उषानिशा! (चाल—चंद्रकांत—)

मंदानिल कीं मद पाउलीं
आला भूजवळीं ॥
जाणवला तत्स्पर्श थंड तिज
म्हणुनि जाग आली ॥ १ ॥
सृष्टिदेविची दृष्टि सहज जी
गगनांगणिं गेली ॥
उषा निशेची झोंबाझोंबी
दृष्टिस कीं पडली ॥ २ ॥
संतापानें लाल जाहली
पहात कीं रागें ॥
नाजुक निशि, क्रव्याद उषा, तिज
हटवितसे मागें ॥ ३ ॥
तिचीं भूषणें कितीक तुटलीं
हिरे सर्व गळले ॥
हुडकावे तरि रत्नदीपही-
विझलेले दिसले ॥ ४ ॥
निजमाळेंतिल मोती म्हणुनी
दीन मुखें मागें ॥
एकहि वच ऐके नच, ढकलित
परि—मागें मागें ॥ ५ ॥
घाइघाइनें कशी तरी मग
—रत्नें पडलेलीं—॥

गतवैभव ती वेंचु लागली
व्यर्थ हाय ! श्रमली ॥ ६ ॥
परी उषेनें सर्व पळविले
काहीं न कीं दिधले ।।
पश्चिमभागीं परभारें तिज–
बळें घालवीलें ॥ ७ ॥
यशस्विता जरि उषा तीहि पण
गेली जशि तूर्ण ॥
कालचक्रगति दावित जणुं " जगिं
नसे कोणि पूर्ण " ॥ ८ ॥

मुंबई ते पुणें
चै० व० १० श० १८५० रविवार

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

## २० आशा.

वृत्त – मध्यक्षामा.

आशेचें का नियम न कधिं कोणा झाले ? ।
दुःखाचे कीं दिवस सरत वाटे आले ॥
आनंदाचा क्षणहि कधिंच आला नाहीं ।
जन्मोजन्मीं परि चकवित लोकाना ही ॥ १ ॥
कोणाचेंही दुरित बघुनि धांवे वेगें ।
वाटे आशा सतत वसत मागें मागें ॥
भावाथोनी जरि न मदत कोणीं मागे ।
दुःखज्वाला परि विझवित चालू लागे ॥ २ ॥
विद्युद्वेगें पथिक घनतमीं मार्गाला— ।
लावी, किंवा जगवित जशि जन्मांधाला ॥
आधाराला तृण जणु बुडत्याला जैसे ।
आशा देवी सुखवित सकलाला तैसे ॥ ३ ॥
नादी लावी वरिवरि वचना देवोनी ।
तृप्तानदें परि न वसति लोकीं कोणीं ॥
सौख्याचा का, कणहि गवसला कोणाला ? ।
'आशा, आशा' म्हणवित जगवी मर्त्याला ॥ ४ ॥
वाया गेले दिन हि सरुनि आयुष्याचे ।
वाटे चित्तां परि सुख पुढल्या जन्मींचें ।
सौख्याची कीं थुइ थुइ उडते कारंजी ।
आशावादी मधुकरसम घाली रुंजी ॥ ५ ॥

मु० पुणें, सदाशिव
चै० व० ४ श० १८५० सोमवार

२१ वेणुस्वन.* (चाल—रामकरे कहिं नेहा न उलझे....)

वेणु फिरुनि तव ऐकवि कान्हा ॥
एक वेळ तरी ऐकशि का ना ? ॥ ॥ ध्रु० ॥
ओझरती ती एक लकेरी—।
ऐकुनि झालीं किति शतकें तरि ।
तधिंपासुनि कीं इच्छा नारी—।
बसलि आजवरि हलवित माना ॥
वेणु फिरुनी० ॥ १ ॥
एक वेळ जी ऐकिलि मुरली ।
श्रवणातुनि ती हृदयीं मुरली ॥
फिरुनि कशाचिहि आशा नुरली ।
उन्मनि भोगिति गोप—अंगना ॥
वेणु फिरुनि० ॥ २ ॥
कितिक आजवरि विनवित आले ।
आल्या पायीं सदा परतले ॥
परि न फिरुनि जन्मण्यात शिणले ।
चकविशि अजुनि कितिक लोकाना ? ॥
वेणु फिरुनि० ॥ ३ ॥
कितीक वेळां जीव जन्मला ! ।
पुन. पुनः मातित जरि गेला ॥
परि आशांकुर अजुनि न मेला ।

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ ता

---

*ही कविता " अरुण " नोव्हेंबर १९२८च्या अंकात प्रसिद्ध झाली आहे.

काढित अजि फिरुनी निज माना ॥
वेणु फिरुनि० ॥ ४ ॥

हृदयवाटिका रुक्ष जाहली ।
सुमनाची मग माला कुठली ? ॥
अजुनि न एकहि कलिका खुलली ।
शुष्क लतेवरि फुलवि फुलाना ॥
वेणु फिरुनि० ॥ ५ ॥

नयन तटाकीं वाहवलेले ।
पूर किती अश्रूंचे कसले ॥
चार बिंदुही आज न उरले ।
हाय ! कशी दुर्दशा पहाना ॥
वेणु फिरुनि० ॥ ६ ॥

पूर असो सेचन तरि कुठलें ।
थेंब जरि म्हणूं तेही सरले ॥
नेत्र कोरडे असे जाहले, ।
मरु भूमीवर फुलवि उपवना ॥
वेणु फिरुनि० ॥ ७ ॥

तरी आजवरि तृषार्त डोळे ।
दर्शनार्थ जे हपापलेले ॥
तव मार्गावरि पसरुनि बसले ।
मरुं दे डोळे, जगवी काना ॥
वेणु फिरुनि० ॥ ८ ॥

अशी वेणुची चटक लागली—।
मन मेलें परि इच्छा उरली ॥
चिरंजीविनी होउनि बसली ।
मेल्यावरिही खोड जाइना ॥
वेणु फिरुनि० ॥ ९ ॥

नैराश्येची चवीच तुरली ।
तिथेंच वरिवरि ठेंच लागली ॥
सदा कर्मकटकट जरि तसली ।
लवहि लालसा हटचि सोडिना ॥
वेणु फिरुनि० ॥ १० ॥

वेणु विलसनें जंव तंव अधरीं ।
विशुद्ध करि मधु समीर लहरी ॥
करवितसे पवनस्तंभन हरी ।
सत्यचि का हे, विश्वमोहना ? ॥
वेणु फिरुनी० ॥ ११ ॥

ऐकुनियां तव वेणुस्तवना ।
कितीक कविनीं केलें कवना ॥
ऐकविलिस का कधिं तरि कवणा !
घालवि तरि मग तशी कल्पना ॥
वेणु फिरुनी० ॥ १२ ॥

विश्वविमोहन **वेणुस्वन** जरि—।
येइ न कानीं अमित कल्पवरि ॥

जन्ममरण सातत्य तोंवरी–।
चालवु विनवित वेणुश्रवणा ॥
वेणु फिरुनी० ॥ १३ ॥

वेणुस्वन **यश** प्रमुदितकारी !
श्रवत सतत तव कीर्तितुतारी ॥
अजुनि निनादित अवनिहि सारी ।
चाळवण्या दाविशि कितिकांना ॥
वेणु फिरुनि तव ऐकवि कान्हा ॥ १४ ॥

मु॰ पुणें, सदाशिव.
चै. शु. १० श १८५० शुकवार.



## २२ मनांदोलिका.

वृत्त—भुजंगप्रयात.

मनांदोलिका हीच **आशा निराशा** ।
विरोधी दिशा दाउनी देइ क्लेशा ॥
परी दुर्दशा चित्तिं वाटे क्षणाची ।
सुखाश्वासनें वृत्ति मोहे जनाची ॥ १ ॥
कुठें सापडेनाच जीवा हवें तें ।
परी नित्य आशा तया धीर देते ॥
मनोल्हासदायी सुधा पाजवीते ।
यशाचींच गीतें सदा ऐकवीते ॥ २ ॥
समीरांगभूतस्तरंगावली ती ।
असें गुणवी चित्त संपूर्ण गीती—॥
गमे ती करी पर्वतप्रायरेणू ।
वसे जी करी शांत निर्वात—वेणू ॥ ३ ॥
मनःकल्पनोद्भूतपूर्वस्थिती ती ।
नरा देववी निर्विकल्पप्रतीती ।
वसे अद्वयाचिंत्य आनंद तेथें ॥
परी कल्पना द्वंद्वभोगास देते ॥ ४ ॥
सुखस्वप्न निर्मोनि जो सौख्यभोगी ॥
तदाभावही तोच पाही वियोगीं ।
मनःकल्पनेतें स्वयें जो निवारी ॥
तया संकटा कोण येवोनि वारी ? ॥ ५ ॥
नवें आजचें जें जुनें तें उद्याचें ।
उदासीनता त्यामुळें प्राप्त होते ॥

नसे ध्येय वस्तूच ती निश्चयाची ।
क्षणीं पांच पंधा तऱ्हा ज्या मनाची ॥ ६ ॥

मनाच्याच मात्रोदरीं जन्मुनीया ।
मनोहारिका तत्क्षणीं निर्मुनीया ॥
म्हणे ' वाकड्या भोंवया भोंवल्या, या–।
विषारी सुया बोंचल्या खोल गेल्या' ॥ ७ ॥

मनाचे मनोरे मनाचाच पाया ।
मनोमदिरामाजि जें सिद्ध जाया–॥
गवाक्षातुनी पुत्रपौत्रादिकांतें ।
बघाया त्वरें दर्शनोत्सुक होते ॥ ८ ॥

मनोनिर्झराचा असा पूर वाहे ॥
तया स्तभना कोणि का शक्त आहे ? ॥
मनोदृष्टि ही मूलत' मुख्य हानी ।
खरी एक ती उन्मनी शांतिदानी ॥ ९ ॥


नरा नित्य आशा जशी जीववीते ।
निराशा गमे दु'खशोकास बीते ॥
परी हीच होई अशी साह्यकारी–।
मनस्तापदाह्या मनालाच मारी ॥ १० ॥

जया जें हवें तीच इच्छा धरावी ।
सदा तीच ती एक चित्तीं वसावी ॥
असें ध्यान ज्या साधलें तत्क्षणीं तो–॥
स्वयें ध्येयरूपी खरा तृप्त होतो ॥ ११ ॥

न ठावेच खोटें खरें कल्पनेते ।
म्हणोनीच सुप्राप्तही सौख्य नेते ॥
सदाशा मनाची, निराशा कुणाची ? ।
नव्हे का तयाचीच, जो सौख्य याची ? ॥ १२ ॥
असोनी स्वयें सच्चिदानंदराणा ।
नसें साध्य जें सार्वभौमादिकाना ॥
असे नित्य सिद्धस्थिती ही जयाची ।
परी व्यर्थ हा क्षुद्र सौख्यास याची ॥ १३ ॥
मदीय प्रयोगें मनालाहि जाणे ।
जरी वाच्यतेनें म्हणे ' यास नेणें ' ॥
परी " ज्ञान " तें नेणण्यातेहि जाणे ।
असा पूर्ण जो त्यास येणें न जाणें ॥ १४ ॥

मु० पुणें, सदाशिव.
गुरुवार पौष शु० १२ श० १८४९

मराठी ग्रंथ संग्रहालय
स. न.
ता.



## २३ विषय-वासना

वृत्त—पृथ्वी.

सुखाब्धि नर हा परी बुडत शोककूपीं कसें
असेल जगिं दुःख तें विषयवासना वीतसे।
स्वतत्र सहजें सुखें सतत सौख्यरूपें असें—
स्वये असुनिया कसें विषयपारतंत्र्यीं वसे ? ॥ १ ॥
तुम्हीं अचल मेरु या विषयवस्तु छायेपरी
स्वयें पळत कीं तुम्हां भ्रमवितील हे अंतरीं।
अनेक परिच्या जशा दिसति ह्या अनेकाकृती
तसेंच करतील हे सुखमिषें तुम्हा दुर्गती ॥ २ ॥
अनित्य परि ती गमे सतत सौख्यदा वासना
दुज्या क्षणिं तिथें तिचा लवहि आढळे वास ना।
क्षणैक अपुलें तुम्हा करिति तत्क्षणीं पारखे
सर्वेच अपुल्यासवें फिरवितील हे सारखे ॥ ३ ॥
बघाल जरि ताडुनी विषयभोगदृष्ट्या मनीं
कुरूप मलिना जशी अमरदेशिची स्वामिनी।
स्वतंत्र, परतत्र हे नच इथें धनी, चाकर
स्वभोगसुखसारखें, समचि शक्र वा सूकर ॥ ४ ॥
नटून फलरूप जी रडवि जन्मजन्मीं पहा
क्षणैक सुखलालसा अतुल गोड वाटे अहा!।
गमेल मधुराकृती सरळही जरी रीतशी
करी विषयवासना अपकृती न वैरी तशी ॥ ५ ॥
त्यजा विषय हे असे विषाचि यास सेवू नका
भुजग समजोनिया करवितां पयःपान का ?।

गमें नवल पांच कीं असुनि येइ निद्रा कशी
**करी विषयवासना अपकृती न शत्रू तशी ॥ ६ ॥**
कळोनि मनिं त्याज्य हें परि पुन: कसे सेविता ?
समग्र विषपात्र हें समजुनी सुखें जेविता ! ।
अजूनि नच हो कशी गमत ही पुरेशी अशी
**करी विषयवासना अपकृती न शत्रू तशी ॥ ७ ॥**
प्रभूभजन नावडें विषयिं चित्त मोर्दे जडें
न तृप्ति कधिंही घडे उलट तद्वियोगें रडे ।
कधींहि नच नाव कीं तरवि कागदाची जशी
**करी विषयवासना अपकृती न शत्रू तशी ॥ ८ ॥**
अहेतुकपणें घडे सुकृतभोग देहा जरी ।
कसें फलद त्या वदा – जरिन वृत्ति त्यातें वरी ॥
म्हणोनि बुध सारिती सकलभोग–शिक्षा जशी ।
**करी विषयवासना अपकृती न शत्रू तशी ॥ ९ ॥**
करी ज्ञाणिं विमुक्त तो गुरुपदेश शिष्यां असें
अनेकगत जान्मिच्या फलद पापपुण्या जसें ।
अशा गुरुकृपेस कीं उपकृती न होई जशी
**करी विषयवासना अपकृती न शत्रू तशी ॥ १० ॥**

मु० श्रीक्षेत्र पंढरपूर }
गुरवार का० कृ० ६–१८४८ }

## २४ सद्गुरुकरुणाष्टक

वृत्त—मालिनी.

निशिदिनिं मन माझें मग्न संसारिं झालें
नच कधिं मज वाटे अल्पही तें निवालें ।
अजुनि न भवतापें चित्त तेथोनि धालें
गुरुपदघनछाया शोधण्यातें निघालें ॥ १ ॥
अविरत जप नाहीं, सन्मुखीं काय यावें ?
खडतर तप नाहीं, मागणें काय व्हावें ? ।
नच कधिं मज ठावें ध्यान वा धारणाही
गुरुपदिं दृढभक्ती तीहि माहीत नाहीं ॥ २ ॥
गुरुविण जगिं नाहीं कोणिही तारणारा
त्रिभुवनिं नच दीनाकारणें धांवणारा ।
जरि नतजनधर्मा पातकी मी न लक्षीं
सदयकरुण सिंधो ! सद्गुरो ! तूंच रक्षीं ॥ ३ ॥
मम मन अवेलाकीं व्योम, राहोनि लोकीं
गुरुवरकरुणेच्या अबुदातें विलोकीं ।
सलिल निजकृपेचें केधवां वर्षवीशी ?
चरणनत अशा या चातका नीववीशीं ॥ ४ ॥
निवळुनि मम दृष्टी केधवां स्वास्थ्य येतें ?
अविकृत मन माझें केधवा शांति देतें ? ।
विसरुनि भवसौख्या तुच्छ मानोनि त्यातें
तवपदिं गुरु केव्हा लीन मच्चित्त होतें ? ॥ ५ ॥
नतजनमनकामा ! पूरका पूर्णकामा !
अजर, अज, अनामा ! स्वामि कैवल्यधामा !

नियतिहत विरामा ! सच्चिदानंद भूमा !
परमकरुणसीमा सद्गुरो सार्वभौमा ! ॥ ६ ॥
झडकरि करुणेची आर्द्र दृष्टी करावी
अवनतिकर वृत्ती अज्ञतेची हरावी !
स्मृति नच जगताची चित्तिं माझ्या असावी
तवपदरज लाभो ! हीच इच्छा वसावी ॥ ७ ॥
अविरत मम चित्तीं ध्यास तूझाच राहो
तनमनधन माझें त्वत्पदीं नित्य राहो ।
क्षिति नच मुळिं आता देह संसारिं राबो
परि मज गुरुराया वृत्तिराहित्य लाभो ॥ ८ ॥

मु॰ शालीबंडा, हैद्राबाद
गुरवार, का॰ शु॰ २ शके १८४९



## २५ ध्येयानुसंधान

वृत्त—अश्वधाटी.

स्वातंत्र्य, वा श्रेष्ठता मानवी पूर्णता मोक्षही पाहिजेना म्हणीं ? ।
केल्याविना कष्ट, साधेल का इष्ट, होईल का श्रेष्ठ कोणीं जनीं ? ॥
झाले जरी देशसक्ता अती क्लेश चित्तीं न, जो लेश लागूं करी—।
ठेवी सदा लक्ष, कार्यांत जो दक्ष, त्यातें करी मक्षिकेच्यापरी ॥१॥
ध्येयाविणें पायही हालती काय ? हट्टें जरी जाय, कोठें तरी ।
कांहीं नसे सोय, ऐसें तया होय वायाच कीं जाय तो जें करी ॥
ज्यातें मुळीं ध्येय नाहीं, तयां ज्ञेय होई न कीं कार्य काहींच ही ।
जन्मोनि तो मर्त्य काहीं न जो अर्थ साधे, तया व्यर्थ सारी मही ॥२॥
ध्येयस्थला एकदा दाविल्या तेथ गेल्याविना ना मरे अश्व तो ।
खाई जरी अग्नि—गोळ्या तरी स्वार पाठीवरी घेउनी धावतो ॥
सोडी न ती अश्वधाटी कधीं, जी चिकाटी धरी निश्चयें साधितो ।
**ध्येयास** जो कां सदा लक्षितो सत्य संपूर्ण तो कार्य संपादितो ॥३॥
पारतंत्र्य कीं हीन जाती अती दीन मानीतसे कोणिही या जनीं ।
मानव्य हें श्रेष्ठ कीं जाणती सर्व कर्तव्य ना कोणि आणी मनीं ॥
लाधे जया ही नरश्रेष्ठता, चित्तिं ठेवोनिया ध्येय काहीं तरी ।
कोणीं कधीं केलि नाहींच कीं साध्य अत्यल्पही - पूर्ण नाहीं जरी ॥४॥
नाहीं जय[1] भान लक्ष्याविणें आन, संधान कीं त्या न साधे जरी ।
स्वाभीक साम्राज्य, सत्यत्वही त्याज्य माना खरें आज ही वैखरी ॥
यातें म्हणा भक्त सांडोनिया रक्त मेला तरी नित्य जीवंत जो—।
**ध्येयीं** असे सक्त, संकल्पही सत्य साधावया शक्त होतोच तो ॥५॥

मु० पुणें, सदाशिव }
मार्ग व. २ श १८४९ शनिवार }

---

१ हत्ती.

## २६ समाधानसप्तक

वृत्त—उपेंद्रवज्रा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणें.

कसोनि कर्तव्य करीत जावें
फलाकडे लक्ष कधीं नसावें ।
असा असावा नर लीन लक्ष्यीं
स्वयंवरीं अर्जुन मीन लक्षी ॥ १ ॥

समाज—कार्यास सदा झटावें
मनात कर्तव्याचि एक यावें ।
तया समाधान असें मिळे कीं—
सुखास कीर्तीसहि तुच्छ लेखी ॥ २ ॥

जनांत सन्मान जरी मिळो कीं
तसेंच लेखी अपमान लोकीं !
समान जो द्वंद्व सदा विलोकी
अगाध आनंदचि भोगितो कीं ॥ ३ ॥

सहेतुकर्मे अभिमान दाटे
असाध्य झाल्यास विषाद वाटे ।
सुसाध्य होतां फल सौख्यदायी—
श्रमाभिमानें नच त्यास होई ॥ ४ ॥

अहेतु कर्मांतील मुख्य वर्म
असें असे—योग्य अयोग्य कर्म—
हस्तें तयाच्या घडल्या अधर्म
समस्त होई अनवद्य कर्म ॥ ५ ॥

---

१ निर्दोषी.

अहेतु कर्मांत अनेक सावे
खरें समाधान सदैव लाभे।
तयापदीं शांति पडोनि राही
असें न योग्यासहि साध्य होई ॥ ६ ॥

ऐशा नराचें मन रंजवाया
सदैव त्या सान्निध राहि तूर्या।
अनाहताची मिळवोनि साथ
अपूर्व त्याचें यश-गीत गात ॥ ७ ॥

मु॰ पुणें, सदाशिव.
सोमवार, मार्ग॰ व॰ ४ श. १८४९



## २७ उत्क्रांति

वृत्त–इंद्रवज्रा

उत्क्राति स्वत्सिद्ध निसर्ग धर्म ॥ आहेच केल्यास यथार्थ कर्म
या जन्मि जें कार्य अपूर्ण राही ॥ जन्मांतरी निश्चित पूर्ण होई॥ १ ॥
पूर्णाधिकत्वास्तव जन्म येतो ॥ उत्क्रातिनें मानव पूर्ण होतो
मृत्यू सदा उन्नति मार्ग दावी ॥ अपूर्ण तें पूर्ण करीत राही ॥ २॥
निष्कामकर्मे पुरुषार्थ लाधे ॥ पूर्णत्वही सत्वर त्यास साधे
कर्तव्यपूर्तीस्तव जन्म येई ॥ उत्क्रांतिनें मानव पूर्ण होई ॥ ३ ॥
परोपकारास्तव वृक्षजाती ॥ रानाबगीचातुनि कष्टताती
सेवा जरी ती नच कोणि घेती ॥ मरोनिया होति शताधिकें तीं॥४॥
केल्या न त्यातें प्रतिकार कोणीं ॥ प्रत्येक जन्मीं फिरुनी मरोनी
एकेक ते पाउल वाढवोनी ॥ येतीलही मानव सन्निधानीं ॥ ५ ॥
काहीं न जन्में जगिं व्यर्थ व्हाया ॥ जाई न वृक्षच्युत काहिं वाया
पर्णें कुजोनी तरु वाढवीती ॥ सरक्षिती उन्नतिकार्य रीती ॥६॥
हें जरी मोडि निसर्ग आज्ञा ॥ स्वत्सिद्ध तो घालवि व्यर्थ प्रज्ञा
मानव्य जावोनि पशुत्व येते ॥ लागू न होई परि हें बुधातें ॥ ७ ॥
मत्स्यावतारीं जगिं एक पाणी ॥ कूर्मावतारीं जल - भूमि, दोन्ही
उत्क्रातिनें वाढलि भूमि जेव्हा ॥ झाला प्रभू तोहि वराह तेव्हा ॥ ८ ॥
अर्धोन्नतित्वार्थ **नृसिंह** होई ॥ पाशव्य मानव्य समान सेवी
तैशीच केली अवतारकर्मे ॥ कीं उन्नत्ति दावि समानधर्मे ॥ ९ ॥
जेव्हां प्रभू **वामन**रूप घेई ॥ पूर्णेंद्रियाचें मनुजत्व दावी
पाताल लोकींच परंतु राही ॥ भूलोक पाया परिपूर्ण होई ॥ १० ॥
केली तशी शक्तिबलाधिकत्वें ॥ उत्क्रांतिमार्गे अवतार कृत्यें
वैपुल्य देवोनि समृद्ध भूते ॥ घेई प्रभू **भार्गव**भूमिकेतें ॥ ११ ॥

उत्क्रांति तैशींच अधोगती ही ॥ संपूर्ण वा शाश्वत एक नाहीं
संधिस्थिती हीच समर्थ आहे ॥ हें तत्त्व श्रीरामचि दावितांहे ॥ १२ ॥
उत्क्रांति झाली नच पूर्ण जेव्हा ॥ घेई स्वयें वानरसाह्य तेव्हां
मध्यें वसे तो प्रभु एक पूर्ण ॥ स्वीकारिला त्याग म्हणोनि तूर्ण ॥ १३ ॥
रामावतारीं यश कीर्ति शांती ॥ ऱ्हासस्थितीसूचक पूर्णता ती
झाला पुढें कृष्ण तसाच, जेंवी ॥ सातत्य नीचोन्नति चक्र दावी ॥ १४ ॥

मु० शालीबंडा, हैद्राबाद
रविवार, कार्तिक शु० १२ श० १८४९



## २८ मुमुक्षुबाळाचा पाळणा

चाल—पाळणा

बाळा जो जो रे, अविकारा !! मायिक जगदाधारा
श्रुति माउलिच्या लेंकरा ! ॥ उपनिषदाच्या पुत्रा ! ॥ ध्रु० ॥
बाळा जो जो रे०

कारे ! घेसि असा अनिवाळा ॥ खेळाचाच चाळा
बाळा ! खेळु नको वेल्हाळा ॥ दृश्याच्या या खेळा ॥ १ ॥

खेळ खेळुनिया दमलाशीं ॥ कितीकदा भ्रमलाशीं
दृश्य डोहीं या बुडलाशीं । व्यर्थ किरे श्रमलाशीं ॥ २

बाळा खेळाया का जाशीं । पडशी का भवपाशीं ?
गम्मत मौज तुझी तुजपाशीं । नाहीं अन्यापाशीं ॥ ३ ॥

**तत् त्वं** असि **तत्त्वमसि** । **साम** गाइ रे तुजशीं
तेथिल तेंच रे तूं असशीं । सौख्य जिथें तू बघशीं ॥ ४ ॥

**ऋग् हा प्रज्ञान ब्रह्म** असें ! सांगे मम छकुल्याला
बाळा ! **अयमात्मा ब्रह्म** असें । **अथर्व** दावी तुजला ॥ ५ ॥

**अहंब्रह्मास्मि—अहमस्मि** । **यजु** सांगे एकचि मी
नाहीं कोणिच कीं माझा मी । मीच असें तो तूं मी ॥ ६ ॥

सागू काय तुझा तो महिमा । नसें त्रिभुवनीं उपमा
ऐसा समर्थ रे तू बाळा । खाउनि जिरविशि काळा ॥ ७ ॥

नाहीं सौख्य बरें कोठें ही । तूंच सौख्यनिधि पाही
माझी शपथ तुला, भिऊ नको । नाहीं, भीती नाहीं । ८ ॥

बागुलबोवा तो दृश्याचा । गेला मेला लुच्चा
बाळा रडूं नको, हास्याच्या ! । माझा बाळ गुणाचा ॥९॥
पाठीं भूत वसें भिन्याच्या । गोष्टी त्या मूर्खांच्या
आहे तूंच बरें सर्वांचा । दृष्टा एकचि साचा ॥ १० ॥
माझ्या बाळाला दृष्ट कुणीं । लावियली मेल्यानीं
छकुल्या ! उगी उगी का रडशीं । दु:खचि नाहीं तुजशीं ॥ ११ ॥
दृश्य मीठ करीं घेउनिया । ब्रह्मांडाच्या मोहऱ्या—
बाळा दृष्ट तुझी काढाया । टाकिन ओवाळुनियां ॥ १२ ॥
बाळा जो जो रे०

मु० शालीबंडा, हैद्राबाद द०
शनिवार, ज्ये० कृ० ११ श० १८४९



## २९ तत्वपंचक

वृत्त—स्रग्धरा.

आहे भासें असें जें सतत वसतसे तोच आत्मा खरा हो !
नाहीं काहीं कुठेंही तदितर जगतीं का न मिथ्याहि राहो ! ।
जाणोनी त्यास तैसें जरि अम्हि अपुल्या रजावाया मनातें
खेळूं स्वेच्छें तयाशीं सुखमय मग तें सर्व संसारनातें ॥ १ ॥
इच्छा साधीच आधीं परि सुख म्हणतो आनुकूल्य प्रयोगें
नोहे ती साध्य तेव्हा मनुज मनिं म्हणे 'दुःख दुर्दैवयोगें'
नाहीं व्याख्याच काहीं नियमित असली सौख्य वा दु ख याची
ज्या ज्या वेळीं जयाची गरज गमतसे तेधवा तेंच याची ॥ २ ॥
"धावा ऐकोनि ध्यावा वरदकर हवा, तो शिरीं पूर्ण ठेवा,
दासातें घाल देवा ! चढवुनि विभवां केधवा सौख्य ठेवा !" ।
जावा हा लोभ जेव्हा निपटुनि बरवा, मानवा मुक्ति तेव्हां
किंवा ठेवा असावा अमित सुकृत वा भोग निःशेष व्हावा ॥३॥
लाभावा लाभ जेव्हां श्रवण मनन वा मूळ संकल्प जावा
तत्त्वाचा बोध व्हावा मजशिच बरवा, लोभ हाही नसावा ।
ठेवा अद्वैत भावा, निज मनिं ठसवा, तो सदा वापरावा
जावा हा भेद तेव्हां जिव शिव अथवा आपुला वा परावा ॥४॥
जेव्हा जेव्हा जगातें मनुज विसरतो सौख्य वा शोकवेगें
तेव्हां तेव्हा खरें तो सुख अनुभवतो वृत्तिराहित्ययोगें ।
ब्रम्हानदास भोगी अविरत हृदयीं ठेवि सातत्य याचें
संसारीं तो जरी हो व्यवहरत तरी कष्ट गेले तयाचे ॥ ५ ॥

मु० शालीबंडा, हैद्राबाद द०
गुरुवार पौष्य व० ३ श० १८४८

## ३० निश्चय-पंचक

वृत्त—शा० वि०

होतें निश्चल शांतरूप अपुलें सर्वत्र जें सचलें ॥
गेलें तें पहिलें शिवत्व तसलें प्राक्सिद्ध जें का भलें
आलें हें नसलेंच कोठुनि बळें जीवत्व जें व्यापिलें
कैसें हें घडलें मुळीं नच कळे आश्चर्य कीं जाहलें ॥ १ ॥
आहे संतत निर्विशेष अपुलें जें सत्य तें एकलें
कैसें हें सविशेष बोलति खुळे जे का भ्रमें भासलें
मिथ्या हें जग नाम, रूप, असलें नाहींच कीं जाहलें
तेव्हां कार्यहि काय कर्म कसलें कर्तृत्वही कोठलें ? ॥ २ ॥
कोठेंही त्रिगुणास वाव न मिळे विश्वीं जरी वाटलें
नाहीं दोनहि एक एकवटलें सर्वत्र तें दाटलें
कोठें कां जळ वाहिलें मृगजळें कोणास तें पातलें
तैसें या जगिं जीव मीन जगले, खोटें असें मातलें ! ॥ ३ ॥
वृत्तीवाचुनि वृत्त काय घडलें कोणांस हो हें कळे
नेत्रांवांचुनि दृश्य केंवि दिसलें जावें कसें मानलें
जीवोपाधिमुळेंच सौख्य सगळें सांसारिकां लाभलें
अज्ञानें जग भासलें प्रगटलें वाटे जनाला भलें ॥ ४ ॥
गेले वाहवले भये भवजलें जे का विकल्पें बळें
स्वाधीना सहजस्थितीस मुकले दिङ्मूढ ते जाहले
जेव्हा एक अखंड रूप अपुलें हें निश्चयें बाणलें
तेव्हां कार्य अकार्य सर्व सरलें संकल्पही राहिले ॥ ५ ॥

मु० शालीबंडा, हैद्राबाद दक्षिण
गुरुवार पौष कृ० २ श० १८४८

## ३१ मालिन्यास शुचित्व.

वृत्त—शा० वि०

कल्पीं एक विशाल दर्पण असें आहे तुझ्या सन्मुख
बिंबोद्ग्राह गुणास धूलिपटलें झालें असें विन्मुख
औत्सुक्यें प्रतिबिंब दर्शन तुझ्या चित्तीं जरी वाटलें
**मालिन्यास शुचित्व देउं म्हणशी तूं कज्जलें कीं जलें ? ॥१॥**

चित्रेच्छा मनिं वागवोनि जरि कां घेशी पटातें करीं
कार्यारंभ करावयास सजशीं जैसा चितारी करी
झाल्या प्राप्त मलीन साधन तदा त्वच्चित्त जें भगलें
**मालिन्यास शुचित्व देउं म्हणशी तूं कज्जलें कीं जलें ? ॥२॥**

वस्तुत्वें नवनीत कोमल, परी सतप्त तें झालिया
शीतोपाय तयास काय करिशी पूर्वस्थिती यावया
एखादा जलबिंदुही क्षम न त्या त्यातें न तें आकळे
**मालिन्यास शुचित्व देउं म्हणशी तूं कज्जलें कीं जलें ? ॥३॥**

क्षारत्वें कटुरूप कीं जल असें क्षारार्णवी जें वसें
तू आणू म्हणशील त्यांत मधुता, येऊ नये का हंसें ?
तेथें टाकिशि शर्करानग किती क्षारापकर्षा बलें
**मालिन्यास शुचित्व देउं म्हणशी तूं कज्जलें कीं जलें ? ॥४॥**

मालिन्यास्पद वस्तुजात अवघें जे क्षारकूपीं दिसे
तेही गाळिशि—गोड केवि करिशीं—व्हावें कसें रे असें ?
कार्याकारण भाव सोडुनि उगा भ्रांतिष्ट का त्यामुळें
**मालिन्यास शुचित्व देउं म्हणशी तूं कज्जलें कीं जलें ? ॥५॥**

चित्तैकाग्र्य तयास शक्य करि जो द्वद्वासनोन्मूलन
केल्यातें नच यत्न लभ्य न तया वाक्पाटवोद्घाटन
आधीं मानसभूमि शुद्ध करि तूं तेव्हां तुला हें कळे–
**मालिन्यास शुचित्व देउं म्हणशी तूं कज्जलें कीं जळें ? ॥६॥**

वाणी आठवि साव चित्त हृदयें ही अमृतस्यंदिनी
कीं–द्वंद्वानुसरावयास शिकुनी तेथूनि आणी मनीं–
" उत्पत्ति स्थिति नाश ज्यास असलें हें विश्व का जाहलें ?"
**मालिन्यास शुचित्व देउं म्हणशी तूं कज्जलें कीं जळें ? ॥७॥**

मु० शालीबंडा, इंद्रा० द०
गुरुवार ज्ये० व० ११ श० १८५०



स्थळ प्रत
सं. न
ता.



## ३२ लोभूं नको

वृत्त—शा. वि.

पापाचें कटुबीज लोभ असतो स्वार्थी न आणी मनीं ।
इच्छापूर्ति करावयास्तव तदुद्यानास योजी जनीं ॥
चेतोहारि फळें तरी सविष तीं जाणोनि लोभूं नको ।
**स्वार्थोन्मीलित सौहृदीं बुधजनीं (?) स्वप्नींहि राहूं नको ॥१॥**

कोटी काहिं तरी तशी लढवुनी कोट्याधिकोन्मूलन ।
खोटी साक्षहि देउनी करवि जो कोटीश आक्रंदन ॥
त्याच्या आत्मविनाशनक्षम अशा वाऱ्यासही तू नको ।
**स्वार्थोन्मीलित सौहृदीं बुधजनीं (?) स्वप्नींहि राहूं नको ॥२॥**

लोभें चार कपर्दिका मिळविण्यां चांडाल मारेकरी ।
घ्याया प्राणहि नाहिं कीं कचरती खड्गास घेती करीं ॥
ऐशांना उपदेश साहत नसें कां ? हें विचारूं नको ।
**स्वार्थोन्मीलित सौहृदीं बुधजनीं (?) स्वप्नींहि राहूं नको ॥३॥**

लोभाच्या पटलें पटे न नयनां बंधू, पिता, नंदन, ।
त्यांचे दुष्ट विचार त्यांस गमती आप्तेष्ट सारे जन ॥
दुष्टां दुष्टचि मित्र, सज्जन रिपू ऐशास भेटूं नको ।
**स्वार्थोन्मीलित सौहृदीं बुधजनीं (?) स्वप्नींहि राहूं नको ॥४॥**

सत्यान्वेषक सर्व मान्य असले मोठे महात्मे किती ।
त्यानाही स्वमत प्रसार करण्या निःशंक जे निंदिती ॥
त्यांची वाङ्मधु मोहवील म्हणुनी तूं त्यात गुतूं नको ।
**स्वार्थोन्मीलित सौहृदीं बुधजनीं (?) स्वप्नींहि राहूं नको ॥५॥**

योग्यायोग्य विचारही क्षणभरीं येतो न चित्तीं जया ।
केंव्हाही दिसतो स्वभोगचि तयां लोभाधिका ना दया ॥
धर्म्याधर्म्य विवेकहीन मनुजा केंव्हाहि भेटूं नको ।
**स्वार्थोन्मीलित सौहृदीं बुधजनीं (?) स्वभींहि राहूं नको ॥६॥**

स्वार्थी जे असती तया न पुरते ही सागराता मही ।
कर्माकर्म विकर्मजात चुकुनी येइ न तत्वमिंही ॥
त्यांच्या दर्शनवागुरेंत पडुनी स्वत्वा हिराऊं नको ।
**स्वार्थोन्मीलित सौहृदीं बुधजनीं (?) स्वभींहि राहूं नको ॥७॥**

मु॰ मलकाजगिरी द॰ हैद्रा॰
शनिवार, ज्ये॰ शु॰ १४ श॰ १८५०



## ३३ स्थानभ्रष्ट पुष्पास * चतुर्दशिका.

एकाएकि मदीय दृष्टि चकली दिव्यांगना पाहिली
कीं वाटें क्षणएक जी विलसुनी गेली परी त्या स्थलीं
अवाड्यातिल मोगरा गवसला जो भूषवी वीथिका
त्याते मी झणिं तेथुनी उचलिलें, वाटे विचारूंच का ? ॥१॥
मोठा मोहक मोगरा म्हणविशीं माने न माझें मन,
तोऱ्यानें म्हणशीं ' मला किति तरी हे गौरवीती जन '
काहीं तथ्य असेल त्यात जरि तें खोटें असो वा खरें
ऐशा त्या मग गौरवां त्यजुनिया घेशी उडी का बरें ? ॥ २ ॥
झोकें घेत, मुदें यथेच्छ डुलता तूझी मदोन्मत्तता--
दृष्टोत्पत्तिस आलि कीं दुखविता लत्ताप्रहारें लता
लावण्याधिक ही सुहास्य लतिका भाग्यें जरी लाभली
ती ही घालविलीस रे अरसिका ? मूर्खा ? सुसंधी भली '॥ ३ ॥
येतो प्रश्न अशा फुला बघुनिया तेथें पुन: येथुनी
स्थानापन्न करूं शकेल कधि कां वृक्षफुलातें कुणी ?

मु० पुणें सदाशिव,
का० व० १२ श० १८४९

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.
नं.
ता.

---

* ही कविता चित्रमयजगत् वर्ष १९ च्या फेब्रुवारी सन १९२८ च्या अंकातून आली आहे.
१ वीज

## ३४ रडवाया कीं हंसवाया ? (चाल–पोवाडा)

हालती डोलती लता ॥ खुलवि जी अता जगां डुलवाया ॥
जनहृदयां विद्ध कराया ॥ कीं रमवाया ? ॥ १ ॥
या पहा सुयांच्या तती । धाउनी येति कशा बोचाया
मृदुहृदयीं खोल रुजाया ॥ कीं खुलवाया ? ॥ २ ॥
कल्पना–रिझविण्या मना । वाटते कुणां–हीच कवि जाया
तद्हृदयां विद्ध कराया ॥ कीं वधाया ? ॥ ३ ॥
ही हंसे–तरिच हो तसें उषा ही हंसे जगां हसवाया
दुःखाची रात्र सराया ॥ कीं सुख व्हाया ? ॥ ४ ॥
जरि न ही–मनाची कळी । खुलवि तोंवरी श्रमहि तें वाया
नच शक्तचि कवि रडवाया ॥ कीं हंसवाया ? ॥ ५ ॥
ही रुसे–तरिहि देतसे । स्फुरण मधु कसें राग म्हणु कैसें !
तन्महति न ये वर्णाया ॥ कीं सांगाया ! ॥ ६ ॥
जग असें–सुखाचें दिसें । परि न तें तसें दोन दिवसांचें
जग म्हणजे मूळ मराया । कीं जन्माया ! ॥ ७ ॥
देवही–जन्म दे जनीं । गोड बोलुनी प्रेम वधाया
सुलभ नाहिं मानव काया ॥ कीं मिळवाया ॥ ८ ॥
पालवी–फुटलियां नवी । कळिहि लव दिसे देंठ जव येतें
सुम फुलल्यां होते वाया ॥ तैशी काया ॥ ९ ॥

मु॰ शालीबडा हैद्रा॰ द॰
श्रा॰ कृ॰ ८ श॰ १८५॰ शुक्रवार

## ३५ मोठें ध्येय

वृत्त—शा. वि.

राही काहिं तरी करीत सखया आलस्य टाकोनिया ।
**पात्रापात्र विचारपूर्वक करी आधींच पाहोनिया ॥**
येणें येइल पात्रता मग पुढें तें कार्य सोडू नको ।
**मोठें ध्येय शिरीं धरोनि हृदया तूं शीण देऊं नको ॥ १ ॥**
होई अल्पचि कार्य का न अपुल्या हस्तें त्वरें दूजिया ।
स्वीकारीं पहिल्याहुनी झटुनिया तीजास साधावया ॥
सर्वाधिक्य असेंच कार्य करण्या आतांच धाऊं नको ।
**मोठें ध्येय शिरीं धरोनि हृदया तूं शीण देऊं नको ॥२॥**
हर्षोद्भूत मुखें प्रसन्नहृदयें औत्सुक्य दावोनिया ।
सागावें दुजियास अल्प यशही प्रोत्साहनें धावया ॥
"तूंही पूण यशस्वि होशिल बरें शकाच येऊ नको ।"
**माठ ध्येय शिरीं धरोनि हृदया तूं शीण देऊं नको ॥ ३ ॥**
कस्तूरी मृगयूथ वायुसम जो धांवे तया पाहुनी ।
काढी गोगलगाय काय न कधीं शिंगेंहि शिंपींतुनी ? ।
पायीं चाल परी मनीं चुकुनिया मोटार आणू नको ।
**मोठें ध्येय शिरीं धरोनि हृदया तूं शीण देऊं नको ॥ ४ ॥**
देशासाठिं मरेन कार्य करितां आयुष्य कीं संपल्या ।
दीनांसाठिं जगेन दैन्य हरण्या ऐश्वर्य संपादिल्या ॥
यावज्जीव जगद्धिता झटुनियां साधेन कांहीं तरी ।
पचप्राण मदीय बाधव पदीं अर्पीन नाहीं तरी ॥ ५ ॥

या योगें पुढिलास देइन धडा कीं हा निदानीं असा—।
"झालें काहिं न कार्य हो म्हणुनिया हा व्यर्थ मेला जसा— "॥
तैसें जीवन तूं निरर्थक कधीं कालास अर्पू नको ' ।
**मोठें ध्येय शिरीं धरोनि हृदया तूं शीण देऊं नको ॥ ६ ॥**
थोडे का जगिं थोर थोर थकले थोडेच ते थांबले ? ।
ध्येयापासुनि अल्पही न चळले सर्वस्वही वेंचिलें ॥
काहीं स्वीकृत अल्प कार्य करण्या प्राणातिंही धावले ।
ऐसे साधक वीर साध्य तसलें नाहींच कीं साधलें ॥ ७ ॥
तेथें काय मदीय अल्प मति कीं विद्या कमी त्याहुनी ।
नाहीं बुद्धि तशी दरिद्रि दुबळा मी हीन दीनाहुनी ॥
ऐसें दाऊनि दैन्य कीं रडकथा केंव्हाहि गाऊं नको ।
**मोठें ध्येय शिरीं धरोनि हृदया तूं शीण देऊं नको ॥ ८ ॥**
आशा गेलि जरी धरोनि हृदयीं पाशा प्रपंचाचिया ।
माशा भारत काय कोणि बसती तोषार्थ दुष्टाचिया ॥
त्वेषानें अथवा स्वदेश त्यजुनी गाशाच गुडाळुनी ।
वैशी पाळटुनी मुखा लपविती देशांतरीं जाउनी ॥ ९ ॥
पैशाचा अभिलाष पोटिं धरुनी पैशाच वृत्तिस्वयें ।
देशा सोडुनि सिद्ध होईल कसा नाशा छळाच्या भयें ॥
आशा पाश शताधिकां भुलु नको, क्लेशां जुमानूं नको ।
**मोठें ध्येय शिरीं धरोनि हृदया तूं शीण देऊं नको ॥ १० ॥**
नाहीं एकहि ज्यास बंधन मुळीं सद्बंधु तो एकला ।
मानी जो कटिमाजि मायिक अशा त्या शृंखला मेखला ॥

बारावंदिसमान बांधुनि सुखें जो तीव्रशा बंधना ।
साहोनी डुलतो सुखासनिं जणूं दुःखास मानीच ना ॥ ११ ॥
बांधोनी जणु बंध मोक्ष उभया खुंटीवरी टांगतो ।
निंदा वंदन दोन्हि साम्य गणतो तेव्हां जनां सांगतो ॥
ऐसें साधनकष्ट पाहुनि भयें तू धीर सोडूं नको ।
**मोठें ध्येय शिरीं धरोनि हृदया तूं शीण देऊं नको ॥१२॥**
स्वात्मानंद सदा स्वराज्य सहजीं साधोनिया साधकें ।
सर्वांना सहकारिता करित कीं आयुष्य कंठी सुखें ॥
जाडें वस्त्र जयास भूषण गमे साधीच खादी बरी ।
देशाला जणुं तो स्वदेह गणतो ती देशभक्ती खरी ॥ १३ ॥
कीं जो ब्रह्मचि देव देश असल्या द्वैतास जो ना गणी ।
सांगे तो **"सहजांत मौज असते, साधुत्व साधेपणीं"**
ऐसा हा उपदेश बिंबवि मनीं श्वासा विसबूं नको ।
**मोठें ध्येय शिरीं धरोनि हृदया तूं शीण देऊं नको ॥१४॥**

सु० शाळीबंडा, इंद्रा० द० गुरुवार
गुरुप्रतिपदा ( माघ व० १ श० १८८५ }

## ३६ मलाच मी हंसलों

( चाल—मेनका. )

विश्वीं—वृत्तिविहिन वसलों
तो मी सुखदु:खस्थित बघुनी **मलाच मी हंसलों**
विकसोद्भव कलिका बघुनी
कधिं कोकिलरव ऐकोनी
तन्मय होउनियां गानीं
विसरुनि प्रदग्ध मच्चित्तातें सुखमय मी गमलों ॥ १ ॥
दग्ध कुसुम कोठें बघतां
जळली सौख्याची वार्ता
वसुधा दिसली शोकार्ता
पश्चात्तापानें मज गमलें उगाच कीं हंसलों ॥ २ ॥
हाय करावें काय अता
असह होई ही व्याकुलता
उपाय आठविता चित्तां
उद्यानीं समसमान गमलों असलों वा नसलों ॥ ३ ॥
केव्हांही सम असलेला
प्रेमरसानें भरलेला
गुंजारव ऐकूं आला
परि गायन अप्रासंगिक हें गणोनि मी हंसलों ॥ ४ ॥
क्लेशभरें जड हृदयानें
विलोकिलीं कांहीं सुमनें

त्याच लतेवरि, रागानें—
बघत होतिं जीं टवकारुनि मज सर्वेच घाबरलों ॥ ५ ॥

कटकमय तरुही फुलती
पंकांतचि अंबुज हसती
काय निसर्गाची रीती ?
प्रासस्थिति सुखमय गणती त्या बघुनि चकित झालों ॥ ६ ॥

स्वैर विहारिणि तडिल्लता
चंचलवीचीमय सरिता
दावितसे चिरनूतनता
पदोपदीं नूतन गति त्याची उगा बघत बसलों ॥ ७ ॥

निर्झरगायनिं गुगुनिया
सदैव वाहवि वायु जया
मोहनमंत्रा ऐकुनि या
चराचरातिल उत्सुकतेला बघुनि दंग झालों ॥ ८ ॥

कासारोत्थित सरिताच्या
अखंड लहरि विलासांच्या
तुषारमय कारंजाच्या-
लीला, मौजा बघतां बघता विशुद्ध मी बनलों ॥ ९ ॥

अनिल पुष्पमुख कुरवाळी
आम्राश्रित लतिका हंसली
गाढालिंगनिं जरि दिसली
तरीहि दृढतर बिलगे बघुनी उगाच नच हंसलों ॥ १० ॥

शाखा लवोनिया खालीं
कुसुममधुमुखें चुंबियली
परि कांहीं पुष्पें गळलीं
हर्षज्वाला हृदय जाळिता हृदयीं हळहळलों ॥ ११ ॥

भृंगानें जंव चुंबियली
मदस्मित कमलिनि गाली
लज्जेची लाली आली
मदमुग्ध हास्यावलोकनें खदखद मी हंसलों ॥ १२ ॥

गुलाब, शेवती, जाई,
निशिगंधा जास्वदीही
कण्हेर ज्या गंधचि नाहीं
सौगंधिक वा गधविहिन परि सौंदर्यां भुललों ॥ १३ ॥

बकुल, जाइ, दवना, मरवा,
गालीचा खालीं हिरवा
सौंदर्याचा देखावा
नित्यनूतना वसुधा बघुनी स्तंभित मी झालों ॥ १४ ॥

उद्यानांतिल शोभा ती
बघुनि वृक्षराजी डुलती
स्वर्गसुखस्पृहजन भुलती
आनंदाश्रुपय.कणरूपें नेत्रीं मी वसलों ॥ १५ ॥

गधविहिन पुष्पें फुलतीं
रानफुलें रानीं खुलतीं

सौंदर्यें मन लुब्धवितीं
उच्चनीचपण भेदभाव ह्या विसरुनिया गेलों ॥ १६ ॥
स्वर्गंगा अंबरिं दिसता
स्वर्गच्युत तिजला बघता
खेद वाटला जो चित्तां
भूगत परि सानदें दिसता शातचित्त बनलों ॥१७॥
वृक्षच्युत पर्णें बघता
दग्धपुष्पकलिका गळतां
वृक्षाहुनि पडता पडता—
अतःप्रेरणवशें सहज नि शक तदा झालों ॥ १८ ॥
गाउनी तयानीं गाणीं
फेंकिली जणू ही अवनी
आदोलीं डोळे अजुनी
चराचरातिल नाविन्याच्या मुळात मी शिरलों ॥ १९ ॥
मोहकता सर्वांस हवे
पुष्प कालचें आज नव्हे
जें जें उगवें नवें नवें
नित्य नव्या उद्यानांतिल मी भृंग नवा बनलों ॥ २० ॥
मनोभृंग जो स्वैरपणें
मलाच कीं कांहीं न गणे
गाउं लागला नवगाणें
स्थिरास्थिरातील सौंदर्याच्या हृदयीं मी शिरलों ॥ २१ ॥

जगदुद्यानीं वावरता
सद्गुणसौरभ कीं येता
तिथें जाइ गाता गाता
गुंगुनिया गुंगवीत सकलां, विश्वीं मी फिरलों ॥ २२ ॥

समानहृदि यदि मज भेटे
स्वर्ग तोच मजला वाटे
उत्सुकता हृदयीं दाटे
गाणीं ऐकुनि कवन ऐकवुनि तिथेंच मी रमलों ॥ २३ ॥

अनुपमप्रेमामृतपानें
तृप्तमनें गाई गानें
गमलीं तीं साधीं सदनें
मरकतमणिमयनयनमनोहर मंदिरिं मी बसलों ॥ २४ ॥

विश्वविमोहन मंत्रकला—
'कोण असा शिकवी सकला?'
प्रश्न दिशांनीं विचारिला
"स्थिरचर व्यापुनि दशांगुळीं जो उरला" हें वदलों ॥२५॥

मु० शालिबंडा, हैद्रा० द
गुरवार मि० श्रा० शु० १४ श० १८५० }

## ३७ षट्पदगायन

(वृत्त—वधू वल्ली.)

गंधहीन का कुसुमें दिसलीं ?
भृंगपंक्ति जी अतृप्त गमली
उत्कंठेनें धाव घेतली—
गुंगत गेली-परि तैशी परतहि आली ॥ १ ॥

प्रसूनचौरेंतें ऐकविण्याला
भृंग जगीं जो जन्मा आला
" मधुरसपानें गुंग जाहल्या
मधुगुण वाणी—ऐकवी जगाला गाणीं " ॥ २ ॥

जातां येता गाणें गातो
मधु न मिळे तरि गुंजारव तो
समान सतत ऐकूं येतो
कां मग गातो ? नच उमजे—वेडा का तो ? ॥ ३ ॥

गंधहीन जे म्हणती वाया
विनिमय करिति वयाचा वाया
कलिका डुलते जग डुलवाया
हृदयिं धराया—नच मृदु तशि मानव काया ॥ ४ ॥

लतिका फुलती व्यर्थचि का या ?
जगतिं रसिकता कीं शिकवाया
फूल उमलतें जग हसवाया
एक दिसाचें—आयुष्य जरी कीं त्याचें ॥ ५ ॥

पान कराया मधु न मिळे जरि
हृदयोद्दीपनकौतुकलहरी–
फेंकित राही तरि अवनीवरि
सौंदर्याचें-गायन कीं गातां नाचे ॥ ६ ॥

भृंग असे जव पंकजसदनीं
षट्पदगायन येइ न श्रवणीं
तन्मय जणु तेथें होवोनी
शब्दमधुपानीं–सांठवी रचाया गाणीं॥ ७ ॥

तृषा न शमली मधुपानाची
क्षुधा शमवितो कधिं नेत्राची
तद्दिव्यामलरम्यकांतिची
गाउनी गाणीं-फिरतसे सदा उद्यानीं ॥ ८ ॥

उपवनलतिकाकुसुमसौरभीं
कंटकमय तरी अल्पही न भीं
गुंगत राही किती वेळ नभीं
कंटक त्यागी–नेमका बसे सुमभागी ॥ ९ ॥

ते इवलेसे पंख तयाचे
अननुभूत आनंद नाचे
भाग्य नसे असलें कोणाचें
गुंगतो गाता–अंबोरुहसन्निध असता ॥ १० ॥

स्वैरालाप तयाचा नच तो
बव्हर्थी गायन अलि गातो

नव्योज्जीवन सदा ओतितो
समजे गाणें जो त्याची भाषा जाणे ॥ ११ ॥
लवहि न होतो कधिं संत्रस्त
भूवरि लोळे नच बेशिस्त
ठेवुनि युगपक्षावरि भिस्त
सतत गातो—विश्वाला विसरुनि जातो ॥१२॥
रजवि ऐशी रुजी त्याची
हृदयें आकर्षिल रसिकाचीं
स्तंभित होइल सरितावीची
समजे गाणें—जो त्याचें हृद्गत जाणें ॥ १३ ॥
सुमहृदयाशीं समरस होतां
ध्वनिही नच कंठांतुन निघतां
तन्मयतेनें गुंगुनि असता—
पक्षयुग गाती—विश्वाला ते गुंगविती ॥ १४॥
पक्षविहिन कविभृंगहि गातो
पक्षपात नच अलिचा करितो
रसिक सुमनिं वसतो साठवितो
हृदयस्पर्शी—शब्दाच्या परागराशी ॥ १५ ॥

मु॰ शालिबंडा, हैद्राबाद द॰
मि॰ श्रा॰ शु॰ १५ शुक्रवार. श॰ १८५०

## ३८ कवींची बैठक

वृत्त–शार्दूलविक्रीडित.

होती एक अशीच बैठक जियें सारेच होते कवी ।
होते कांहिं तयात योग्यहि जरी जो तो कवी भासवी ॥
होता वाद तयात 'काव्य अथवा कैसा कवी जाणता– ।
होतो, श्रेष्ठ कशामुळें समजली जावी खरी योग्यता' ! ॥ १ ॥

जो तो बुद्धिबलें समर्थन करी काव्यासही दाखवी ।
किंवा वाचुनि आपुलीच कविता सर्वांपुढें नाचवी ॥
कीं कोणी म्हणतो ' स्वकल्पित नवी जो कल्पना दाखवी ।
कीं प्रासादिक शब्दसौष्टव करी त्यातें म्हणावें कवी ' ॥ २ ॥

जैशी उत्तम मध्यमाधम दशा आहे अवस्थात्रयीं ।
तैशी या कविमाजिंही अनुभवा येते जनां प्रत्ययीं ॥
कोणी सात्त्विक कोणि राजस, तसे आहेतही तामसी ।
ज्यांची वृत्ति जशी असेल निघती काव्याक्षरेंही तशी ॥ ३ ॥

होता एक तयांत सात्त्विक तसा आचार संपन्नही ।
त्यानें काढिलि वाचण्यास आपुली ती सोवळ्याची वही ॥
आधी **शंकर, राम, कृष्ण,** असलीं नांवें जियेच्या शिरीं ।
त्याखालीं लिहिली असे स्वकविता प्रत्येक पृष्ठावरी ॥ ४ ॥

' योगी तापसि, साधुसंत सम जो सर्वांहुनी वेगळा ।
एकांतप्रिय शांत, दांत म्हणवी सर्वांमुखीं आगळा ॥
वाणी प्रेमळ शुद्ध सात्त्विक अशा काव्यां लिही तो कवी ।
भक्तप्रेमकथा कथोनि प्रभुची भक्तीच जो वाढवी ॥ ५ ॥

कष्टें आपण कीं अहर्निश अती सोसोनिया त्रास जो ।
प्रेमें, हर्षभरें, विशाल हृदयें अर्पी रसज्ञास तो ॥
दु:खी, आर्त, सुखी, विरक्त, विरही, राजासही तोषवी ।
ऐसा धन्य परोपकारक दुजा नाहींच जैसा कवी ! ॥ ६ ॥

जीर्ण क्षुद्र अशा मलीन घरच्या कोन्यात बैसोनिया ।
त्रैलोक्यीं मनसोक्त कीं विहरतो सामर्थ्य याचें पहा ॥
पाताळीं अथवा महेंद्रभुवनीं जीवंत कीं राहुनी ।
आकाशांतचि जास्त काल रमतो स्वर्गादि भूमीहुनी ॥ ७ ॥

केव्हां हा खुलुनी प्रसन्नहृदयें चंद्रासवें धावतो ।
आनदें मनरजनार्थ कधिहा तारासवें खेळतो ॥
ऐसा पूर्ण समर्थ कोण जगिं हो मेघासवें बोलतो ।
विद्युद्वेगसमान ये परतुनी " "आहे कवी एक तो ?" ॥ ८ ॥

काहीं राजसवृत्तिच्याहि कविनीं स्वस्वप्रतिष्ठार्थ कीं ।
कोणी स्वकृत दाखवीत कविता लावावया सार्थकीं ॥
कोणा श्लोकमिषें निरीक्षण करी 'श्रोता कसा ऐकतो ।
कोणा नावडते मदीय कृति ही कीं कोण संतोषतो' ॥ ९ ॥

"कोणा एकचि गोडशी सुकविता ऐके कवीच्या मुखें ।
अर्धोन्मीलित नेत्र होउनि तया लागावि तद्री सुखें ॥
वाटावें क्षणिं गोडगोड कविचें ऐकोनियां बोल ते ।
शब्दालंकृत काव्यदेवि सुषमा साक्षात कीं बोलते ॥ १० ॥

ज्ञानाचाच अखंड दीप कविला देतो प्रकाशां तमीं ।
राजातें जरि साध्यमान सुखही यालाहि नाहीं कमी ॥

वाटे कीं जर्धि योग्य शब्द जुळला ‘ आहें विमानात मी ’ ।
ती उच्चस्थिति यास भासत जणूं ‘ हें विश्व मातें नमी ’ ॥ ११ ॥
योजोनी उपमा, प्रमेयरस वा क्लृप्ती अलंकार हा ।
तैसे रूपक वा प्रसाद यमकां प्रासादि योजी अहा ! ॥
ज्याची सुंदर, गोड, रम्य कविता आल्हाद देई मना ।
सौंदर्यें रसिकास थक्क करुनी जी लुब्धवी सज्जनां ॥ १२ ॥
अज्ञानां गमतो दरिद्रि न तसा श्रीमंत आहे खरा ।
ऐश्वर्यें धनमानयुक्त न असा आहे जगीं दूसरा ॥
लक्ष्मी शब्द तशी अपत्य कविता संपत्ति वा संतती ।
या योगें कविची जगांत महती वर्णावि कोणीं किती ॥ १३ ॥
याचा भूप कितीहि मित्र असला हा ज्या कवित्वा लिही ।
आल्या संकट त्यात कांहीं कविला साम्राज्य सर्वस्वही– ॥
कीं अर्पी अधिकार, शक्ति, परि तें सामर्थ्य कामा न ये ॥
कोशापासुनि याचना करुनिया हा तृप्त होई स्वयें ॥ १४ ॥
श्रोता याचक तृप्त कीं करितसे साहित्यसम्राट हा ।
देतो दान पहा अमोलिक अशीं हीं शब्दरत्नें अहा ! ॥
तेजःपुंज अशा अनेक परिचें श्लोकादि माला जनां ।
दाता कर्णचि कीं समर्पित असे सत्पात्रही पाहिना ॥ १५ ॥
जे वाग्मौक्तिक निर्मितो निजमुखें शब्दाब्धिमध्यें कवी ।
श्रोता आदर हेमततुमधुनी ओवोनिया भूषवी ॥
कर्णीं कुंडलयुग्मभूषणमिषें अत्यादरें वागवी ।
या योगें जणुं आपुली रसिकता कीं हा जगा दाखवी ॥ १६ ॥

कीं हे याचक एकमेक बनती श्रोता तसा तो कवी।
दाता, याचक, दान हे विसरुनी तल्लीनता लाघवी–॥
पाहोनी प्रगटे प्रसन्न कविता माधुर्य मूर्ती नवी।
कीं झाल्यावर यांचिया तपबळें ब्रह्मांडही तोषवी॥ १७॥

कीं हा कोणि कुबेर काव्यनिधिचा श्रीमंत बाह्यांतरीं।
ऋद्धीसिद्धि समस्त वाहति जणू डोकीवरी घागरी।
पाणी जोडुनि कोणि निश्चिल उभे कीं कोणि पाणी भरी।
गाणीं गाउनि कोणि रंजवि परी त्याची न पर्वा करी॥ १८॥

पर्वा शब्दचि नाठवे जणु असा संतुष्ट श्रीमंत हा।
इच्छा एकहि कीं अपूर्ण असली आजन्म नाहीं पहा॥
जाणे कीं चरणीं अनेक वसती लक्ष्मीच प्रत्यक्षरीं।
मानी देविसमान एक कविता कीं शारदा अंतरीं॥ १९॥

कीं हा इंद्र दुजा तयाहुनि बळी काव्यांबरीं राहतो।
सुश्रोते सुरवृंद याजकडुनी सन्मान ही सेवितो॥
उत्प्रेक्षा उपमाद्यलंकृति अशा त्या कामधेनू किती।
खिल्लारें मनसोक्त कीं कविगृहीं काव्यामृता दोहती॥ २०॥

येथें ही जणु कल्पवृक्ष फलती कीं कल्पनेच्या वनीं।
वाहे तेवि अहर्निशीं नवरसें माधुर्यमंदाकिनी॥
धो धो वाहत कीं दुजी तिजसवें भावार्थ भागीरथी।
तैसे कुंडहि मार्मिकार्थ वसती श्लेषामृताचें किती॥ २१॥
येथेंही कवि वर्षवीत अवनीं या पद्यधारा पहा।
बैसे स्फूर्ति बृहस्पतीसह मही सिंहासनीं शक्र हा॥

थाटे तेवि सभा परी नवल कीं सारेच येथें नवे।
गंधर्वादिक गाति नाचति पहा वृत्ताप्सरांचे थवे ॥ २२ ॥
कांहीं तामसवृत्तिच्याहि कविनीं ते श्लोक कीं ऐकिले।
सामोरे सरसावले ढकलुनी त्या राजसांना बलें ॥
हांसे आवरुनी तयास म्हणती 'अद्याप कां हो कुणीं।
नाहीं ऐकविलाच हास्यरस कीं ऐका वरें येथुनीं' ॥ २३ ॥
"कोणी एक कवी सदैव कविता वाची करी वा लिही।
राही हा निज कल्पनावरि, जणूं याची वही ती मही ॥
पद्यावांचुनि एक अक्षर दुजा बोलूं न देई पहा।
काव्यें सृष्टि जणूं स्वतंत्र बसवी तेथील कीं भूप हा ॥ २४ ॥
प्रेमी मित्र व आप्त, इष्ट कविता मातापिता वा सुता।
कांता भ्रातृ कुटुंब वा सदनहीं कीं वस्तुही तत्त्वता ॥
कीं ज्याचें हतरूण पांघरुणही तैसें शिरस्त्राणही ॥
जो सर्वस्वहि काव्यपूर्ण समजे देहासवें प्राणही ॥ २५ ॥
उच्चारी कवितेशिवाय न कधीं तोंडातुनी वाक्यही।
जाणे जो जणुं काय **तत्त्वमसि** जें ती एक त्याची वही ॥
वेदांत्यासम सर्व ब्रह्म समजे ब्रह्मांडबद्धामही।
सर्व काव्यमयं जगज्जननि वा ही काव्यदेवी मही ॥ २६ ॥
श्लोकामाजिच नित्य बोलत घरीं कीं कामही सांगतो।
आज्ञा आणि विनति यातचि करी शिष्यांवरिष्ठांस तो ॥
वृत्तातूनच पूर्ण वृत्त अपुलें पत्रोत्तरीं पाठवी।
झाल्या भेट समक्ष भाव मनिंचा गावोनिया दाखवी ॥ २७ ॥

जेव्हा हा खुलतो **पिलू** अळवतो **दुर्गांत** रागावतो ।
दु:खानें कधिं **भैरवींत** रडतो **भूपांत** संतापतो ॥
स्वप्राणां-करुणाच भाकुनि जणू-**तोडींत** तोडीतसे ।
**झिंजोटी**पद गाउनी फिरुनिया प्रेमास जोडीतसे ॥ २८ ॥

कीं जेव्हां झगडे तधीं **ध्रुवपदा, धम्माल, झंपा,** म्हणे ।
**तल्लाना** जधिं कीं म्हणेल समजा तें सौम्य रागावणें ॥
घाईनें जणु **दादऱ्यांत** वदण्यां हा वाजवी ताम्हणें ।
सांगें कीं जणुं सोवळ्यांत तबला स्पर्शूं नये ब्राह्मणें ॥ २९ ॥

श्लोकें श्लोक दुजासवें लढवितो धाटीवरी धावतो ।
गद्यामाजि विचारल्यास मग तो पद्यातुनी सांगतो ॥
स्वप्नामाजि पहा कधीं बडबडे " चंद्रास तारा वहा ।
माना वा समरा जनास समरा तारापतारापहा ॥ ३० ॥

वृत्तांचें व्रत आठआठ दिवशीं एकेक जो आचरी ।
एक्या आठवड्यात जेंवि **हरिणी,** दूजात **पृथ्वी** धरी ॥
केव्हा **चामर, मालती, ललित** वा **मंदारमाला** कदा ॥
**हंसी, तोटक, भद्रिका, शिखरिणी, मत्ता, उमा, कामदा** ३१

केव्हा आचरतो **वसंततिलका, वंशस्थ** वा **मालिनी** ।
किंवा **दोधक, अमृतध्वनि** कधीं कीं **स्रग्विणी, शालिनी** ॥
केव्हा हा **दुसरी सवाइ, मदिरा** किंवा **सवाई** करी ।
प्रेमानें **विबुधप्रिया** व्रत करी कीं **स्वागता** आचरी ॥ ३२ ॥

संतोषें व्रत **पंचचामर** करी कीं **वैश्वदेवी** धरी ।
केव्हा हा **मणिबंध, माणवक** घे कीं **इंद्रवंशा** करीं ॥

सपे कीं '**समवृत्त**' '**अर्धसम**' घे, कीं **माल्यभारा** तदा।
स्वीकारी **हरिणीप्लुता** मग पुढें घे **पुष्पिताग्रा** कदा॥ ३३॥
तो '**मात्रागण**वृत्त' तेथुनि धरी **आर्यादि उद्गीति** कीं।
झाल्या **प्राकृतवृत्त** शेवट करी **ओवी, अभंगा**दिकीं॥
**साकी** तेंवि **घनाक्षरी** मग करी **दिंडीं**त कीं पारणें॥
कष्टें वागतसे अहर्निश अशा "वृत्तव्रता" कारणें॥ ३४॥
एकामागुनि एक वृत्त सगळें साधत किं संपतां।
मौजेनें कधिं **लावण्या**हि करितो हा चालता बोलता॥
चातुर्मास पदोपदीं पदरची ऐसी समाप्ति करी।
तेथोनि व्रत सपवोनि फिरुनी "वृत्तव्रता" आचरी॥ ३५॥
आम्हें एक असेंच पत्र लिहुनी याच्याकडें धाडिलें।
'काहो वृत्त अलीकडे न अपुलें काहींच आम्हा कळे,॥
चिंता लागलि फार ऐकुनि अम्हा रोगें तुम्ही पीडित'।
त्याचें उत्तर हा लगेच कळवी.—"शार्दूल विक्रीडित"॥ ३६॥
गद्यें प्रश्न विचारिल्यास कविला हांसोनिया तो वदे।
'मात्रावृत्त गमे जरि कठिण कीं त्यानीं करावीं पदें॥
ओढाताण तिथें कशीहि खपते र्‍हस्वादि वाटेल ती।
ऐसी सोय असोनि कां कवि खुळे गद्यांतुनी बोलती?॥ ३७॥
तो डोकें खुपसोनि त्यांतचि बसे केव्हांहि रात्रदिसा।
ज्याला माहित त्यास हा कवि कळे अन्यास भासे असा—
कीं वेडा अथवा मुका व बहिरा कोणांस खासा पिसा।
याला दाखवुनी पुसे जरि कुणी—'आहे कवी हा कसा?'॥ ३८॥

चेष्टेनें म्हणतील यास जन कीं, "ऐसा कवि श्रेष्ठ हा–
कन्या एक न शारदाच विधिची बंधू तिचा कीं पहा ! ||
शोभे एकचि पूर्ण आज मितिला आहे जगीं जो कुणीं |
कीं झाला जणु प्राप्त सिंधुमथनीं तो हाच चिंतामणी || ३९ ||
एकानें अगदीं नवीन असली ही टूम कीं काढिली |
प्रासा दावि परंतु एकचि तऱ्हा अंत्याक्षरीं ठेविली ||
'याला प्रासउपांत्य कां नच म्हणा का तो कुणा चावतो |
जोडी सुंदर शोभते कशि बघा'? ऐसें पुसे धीट तो || ४० ||
जेव्हा साधित राहातो यमक वा जेव्हा अनुप्रास हा |
तेव्हा ये जरि आप्तइष्ट कुणिही भेटावया यास हा ||
त्रासानें म्हणतो जणू कवि तदा 'केव्हा चुके त्रास हा'
किंवा वाटत त्यास 'प्राण अपुला घेईल कीं खास हा' ||४१||
तेव्हां कोणि म्हणे "सदैव यमका जो साधितो तो कवी |
किंवा प्रासहि साधल्यास मग तो कोणासही तोषवी" ||
कोणीं एक तशाच तीन कविता तत्काल त्या ऐकवी |
श्लोकानें जणू चार चार यमका एकांत कीं भासवी || ४२ ||
'ओढा वाहुनि आपुल्या मधुजला गंगेंत टाकीतसे |
वाळू सांठवि मूर्ख हा स्वउदरीं गंगातटाकीं जसें ||
टाकी वाळू समस्त घेउनि जलां गंगातटाकीं तसें ||
कीं अव्यंग गुणज्ञ घेउनि गुणा व्यंगास टाकीतसे || ४३ ||
मानापा सम राज नात समरा अंत्याक्षरां आठवा |
राजा रंक तयांत अंतर जरा रानात हो दाखवा ||

पाणी पाणि म्हणे तशात वणवा कीं लागल्या तेधवा ।
वाणी वाळुनि बोलतां उभयतां तीं अक्षरें ऐकवा ॥ ४४ ॥
जन्माची जणु हानि मानित कवी कीं व्यर्थ गेल्या क्षणा ।
रस्त्यानें जुळवीत जात असतां प्रत्यक्षरीं लक्षणा ॥
मानावा समरा जनास समरा तारापताराप हा ।
कीं धक्का म्हणतो निचेष्ट पडता तारापताराप हा ॥ ४५ ॥
तेव्हां एक म्हणे ' अनेकपरिनें पत्रात संक्षेपिती ।
आधीं सा०न० जसें तसेंच लिहिती अतीं न का हो क०ती० '॥
ऐकोनी मग कोणि दीड कविता तत्काल त्या ऐकवी ।
सांगे हासुनि " लक्षपूर्वक पहा संक्षेपनाविन्यही " ॥ ४६ ॥
होतो जागरलों अतीशय जरी थोडाच कीं झोपलों ।
नाहीं आळसलों, प्रभातसमयीं मी आज जागावलों ॥
सारोनी मुखमार्जनादि विधिते तत्काल आघोळलों ।
संध्या संपलि सावचित्त मग मी तेथोनि मंडायलों ॥ ४७ ॥
जेव्हां ध्यक्षचि ' कोणता कवि कसा ' हें प्रश्नल्या वादलों ।
तेव्हा तेथ परिक्षकांत सगळ्या मी एकटा चांगलों[1] " ॥
एकानें हंसुनी लगेच म्हटलें ' जेव्हा तुम्ही हास्यलों[2] ।
आला खूप मजा तसाच समजा ऐका दुजा मासला ' ॥ ४८ ॥
काका, कोकिल, सारिका, सकलिका एका कपाटींच का ।
कोंडोनी स्वकरेंच कापति कसे ते कोरडे आइका ॥

---

१ चांगला गणला गेलों.

२ हास्यरस आणला.

काका काय कठोर कृत्य करिती, कृष्णा कसा हो मुका ।
कीं कोन्यातहि कोकले नच, कसे कोणी म्हणेना नका ? ॥४९॥

बायाहो करिती कवी सुकविता श्रोत्यास त्रासावयां ।
प्रासावाचुनि तेवि काव्य-नगरा प्रासाद नाहीं जया ॥
जैसा प्रास पती अपत्य गमती तैसे अनुप्रास ते ।
दोन्हेही नसल्यास खास विधवा, वंध्याच कीं भासते ॥ ५० ॥

आलें अक्षर एक वेळ चरणीं दूजे न कोणां दिसें ।
अंधारातिल खोल कूप समजा पाणी न जेथें वसे ॥
ते श्लेषादिक शब्द--सौष्ठव असे यावेत काव्योदकीं--
लोटे स्फूर्ति--समीर सुंदर जणूं लाटावरी लाट कीं ॥ ५१ ॥

कोणीं एक म्हणे ' नव्हेच कवि तो नाहीं प्रतिष्ठा जरी ।
माघारी स्तुति झालियास मग ती कैसी म्हणावी खरी' ॥
कीं अन्योक्तिमिषें विरुद्ध मत हीं जी वृत्ति ज्याची जशी ।
तैसी आवड, योग्यता निजमुखें सांगीतली ती अशी.--॥ ५२ ॥

जाणावा कविराज गद्य कधिंही वाची न जो लेखि तो ।
मानावा कवि तोच तुच्छ इतरां काव्यास जो लेखितो ॥
माना वाकवितो प्रसन्न हृदयें काव्यास ऐकोनियां ।
कोठें का जगिं मूढ याहुनि दुजा आहे जगीं कोणि या ? ॥५३॥

आहे यातचि मान, सत्त्व, कविचें श्रेष्ठत्व यानेंच ये ।
गेला प्राण जरी कधींहि कविनें हें तत्त्व सोडूं नये--॥
वाटे कीं जरि **गोड, रम्य** कविता एखादि कोठें तरी ।
आठ्या घालुनि, भोंवया चढवुनी वाचावि ती अंतरीं ॥ ५४ ॥

हर्षोद्गार न राहवे जरि मनीं कीं काढिल्यावाचुनी ।
एकांतीं बसुनी परंतु जपुनी पाही न ऐके कुणी ॥
काव्याच्या स्तवनीं सुसंधि बघुनी मुद्दाम ती साधुनी ।
घ्यावी हौस खुशाल ती पुरवुनी निःशब्द ओष्ठातुनीं ' ॥ ५५ ॥
एव जी सहजीच मौज कविच्या त्या बैठकीं जाहली ।
केली सादर सूज्ञ वाचकवरा जी जी जशी ऐकिली ॥
जावें कीं फिरुनी निकाल बघण्यां होईल तो जेधवा ।
कोणातें यश मानपत्र मिळतें साधेल हें तेधवा ॥ ५६ ॥

मु० शाळीबडा हैद्रा. द.
मिती वसंतपंचमी श. १८४५
रविवार.



## ३९ भ्रमसंभ्रम. वृत्त–हरिणी.

फसवि हरिणी जेव्हां तेव्हा मरुस्थलिं ही धरा ।
झुळझुळ असे वाहे आहे खरेंच इथें झरा ॥
म्हणुनि पळती सैरावैरा भ्रमेंच अनेकदा ' ।
म्हणति जन जे ऐसें, तैसें स्वतः फसती सदा ॥ १ ॥
" हरितवसना गौरा, कृष्णा, सुगात्रि वसुंधरा ।
सुरभि सुमना हेमा, रत्ना विभूषवि सुदरा "
कथन नच का आम्हीं तूम्हीं असे किती वाचिले ।
कविहि भ्रमले मोठे मोठे बुधादि कसे भले ! ॥ २ ॥
भ्रमचि नयनां होतो जातो तरी मतिसंभ्रम ।
करिति कुतुका जेव्हा तेव्हा परी न कधीं दम ॥
प्रियतर अशा गेहा, देहा उदासमनें यदा–।
बघत विरही कारागारा–समान गमें तदा ॥ ३ ॥
विचरि जरि कां आरामीं वा जनीं, घनकाननीं ।
अखिल भुवनीं सौख्याबाहे अशास प्रतिध्वनी–॥
म्हणत असतो ' खेहोल्हासा न देउ शके कुणी ।
मिळत असतें ज्याचें त्याला जसें वसतें मनीं ॥ ४ ॥
अचल, अज तो येई जाई ? असभवनीय ते ! ।
भ्रममति वदे कांहींबाही जसे आपुल्या मतें ॥
सतत जगतां मिथ्याज्ञाता तयास मिळे शम ।
सुखद गमते ज्याना, माना **भ्रमांतिल संभ्रम** ॥ ५ ॥

मु. पुणें-सदाशिव }
मार्ग० व० ९ श. १८४९ शनिवार }

## ४० म्हणुं कसें 'प्रियंवदा' वृत्त—प्रियंवदा

'नित "शुभं" म्हणत जा "प्रियं"वदा'।
शिशुपणीं शिकविलें अम्हा सदा ॥
सुखकुठें? क्षणभरी उसंत न!।
असति कां कुणिं तरी चिरंतन?॥ १ ॥
अवनिचा शशि पहा क्षयें झुरे।
लवभरी रविपुढें प्रभा नुरे॥
उगवलो रविहि तो बुडावया।
नच कुणीं जगतिं ये जगावया॥ २ ॥
कुसुम जें मृदु परी सकंटकें।
गमतसें नवल कीं-कसें टिकें॥
खुलवितें मुकुल जें प्रफुल्ल तें—।
करुनियां सुकविते लता जियें॥ ३ ॥
वरिवरीं बदलते वसुंधरा।
म्हणुनि कीं म्हणविते मनोहरा॥
नगर जें वन तिथें वसें उद्या।
उलट ही दिसतसे कितीकदा॥ ४ ॥
वसतसे नच तसें पराक्रमी।
अजि कसें दिन असें धरा क्रमी॥
अमृत कीं बहुवसे जिथें असें।
अमृत—हें विष कसें तिथें वसे!॥ ५ ॥

नच जरी जग तसें-कसें बसें ।
तरीहि कीं जगतसें जसें जसें-॥
उगवते दिन दिसे तसे तसे ।
कुणि कसें कुणि कसे वसे दिसे ॥ ६ ॥
वचहि कीं मधु तसें खरें नसें ।
असत हें जग पहा असें असे ॥
मुळिच जें प्रिय नसे तसें सदा—
मिळतसे 'म्हणुं कसें "प्रियंवदा" ॥ ७ ॥

मु० पुणें सदाशिव
गुरुवार फाल्गुन शु. १० शके १८४९

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.
6234

## ४१ व्यर्थ जगत नाशिवंत एकचि सत्यप्रभु अमुचा.

चाल·—चंद्रकात राजाची कन्या.. . )

व्यर्थचि अभ्राच्छादित रवि जो दर्शन नच देई ।
व्यर्थ चद्रमा घनपटलें जरि मुख अपुलें लपवी ॥ १ ॥

व्यर्थ नभः प्रागणीं तारका पौर्णिमेसि वसती ।
व्यर्थ चमकणें ल्काकणेंही निस्तेजा गमती ॥ २ ॥

व्यर्थ नभाचें विशालत्व तें जरी नच शशि उगवे
व्यर्थ निशापति सुधाशु म्हणवी नच कमलिनि विकसे ॥३॥

व्यर्थ सरोवर शुभ्र, स्वच्छ परी एकहि कमळ नसे ।
व्यर्थ कमल तें भृंग जयावरि पलभर ही न बसे ॥ ४ ॥

व्यर्थ गाइलें गुणगुणले हो व्यर्थचि मधुपानें ।
व्यर्थ गान तें मनोल्हास नच झाला मधुपानें ॥ ५ ॥

व्यर्थ कुसुम तें अतिसुंदर परी सुगध नच देई ॥
व्यर्थ सुगधित पुष्प जरी तें व्यर्थचि कीं जाई ॥ ६ ॥

व्यर्थ सुगंधित सुंदरही पण आहे सुकलेलें ।
व्यर्थ गध सौंदर्य व्यर्थ तें व्यर्थ पुष्प बनलें ! ॥ ७ ॥

व्यर्थ तरू जरी मार्गावरि नच पर्णाच्छादित जो ।
व्यर्थ मार्ग जरि निकट पोंचवी कंटकपूरित तो ॥ ८ ॥

व्यर्थ लता घनपल्लवयुक्तहि परि पंखीं वसतें ।
व्यर्थ घनच्छाया पथिकश्रम लवहि न जी हरिते ॥ ९ ॥

व्यर्थचि कानन निर्जन हरिगर्जना न कानिं पडे ।
व्यर्थ न का तें वन्यपशूचें दर्शनही न घडें ॥ १० ॥
व्यर्थ गुहा ती तापसि योगी एकहि मुळीं न वसे ।
व्यर्थ दऱ्या खोऱ्या त्या जेथें सरिता नच गवसे ॥ ११ ॥
व्यर्थचि उपवन वृक्ष न जेथें फलभारें लवती ।
व्यर्थ कोरड्या पुष्पवाटिका सुरम्य नच दिसती ॥ १२ ॥
व्यर्थ सदन तें निर्जन वनसम मनुज न एक जिथें ।
व्यर्थ तयाचा भव्यपणा जे उग्र रुक्ष गमतें ॥ १३ ॥
व्यर्थचि तें लावण्य सुरम्यहि विनयहीन स्त्रीचें ।
व्यर्थ जन्मली कोमल गात्री कठिण हृदय जीचें ॥ १४ ॥
व्यर्थ अंगना निजपतिविषयीं लवहि न प्रेम मनीं ।
व्यर्थचि कटुभाषिणी जरी ती गमे हास्यवदनी ॥ १५ ॥
व्यर्थ सुरूपी सुगुणी माता हृदयीं नच ममता ।
व्यर्थ प्रसवली अपत्य बहु नच ठेवि दृष्टि समता ॥ १६ ॥
व्यर्थ पुत्र जननीजनकाची भक्ति न ज्या ठावे ।
व्यर्थ जन्म जरि पद न वंदिले अत्यादरभावें ॥ १७ ॥
व्यर्थ पिता जो विद्यार्जन नच पुत्राकरि करवी ।
व्यर्थ तयाचा अनुभव त्यातें व्यवहार न शिकवी ॥ १८ ॥
व्यर्थचि कन्या निजपितयाची आज्ञा अवमानी ।
व्यर्थ अशा कन्यापुत्रांतें जन्म दिधलि जननी ॥ १९ ॥
व्यर्थ असा संसार ज्या गृहीं कलहाचि नित्य असे ।
व्यर्थ सदन तें कारागृहसम सुख तिळभर न वसे ॥ २० ॥

व्यर्थचि जाणा कुलांगना जी निर्लज्जा जगतीं ।
व्यर्थ जन्मली उच्च कुळीं जरि ती नच विनयवती ॥२१॥
व्यर्थ सलज्जा गणिका तीचा अभिनय व्यर्थचि कीं
व्यर्थचि गायन मधुर तानही व्यर्थ रूप लोकीं ॥ २२ ॥
व्यर्थ नेत्र ते पाणिदार हरिणाक्षी जरि गमते
व्यर्थ तिचें लावण्य, रूप मग व्यर्थचि कीं गुण ते ॥२३॥
व्यर्थ गानिं अभिनयीं कुशल जी कुरुप कृष्णवर्णी ।
व्यर्थ तिचें क्षणभरही दर्शन आठवि वैतरणी ॥ २४ ॥
व्यर्थ तयाला अमित साधनें अनुपम सौख्यांचीं ।
व्यर्थचि कीं मग स्वर्गसुखहि उद्विग्न स्थिति ज्याची ॥ २५ ॥
व्यर्थचि सुंदर बागबगीचा, माड्या, तळमजला
व्यर्थचि वाडा धनि नच त्याचा किती जरी सजला ॥२६॥
व्यर्थचि मग तें सुरम्यमंदिर पत्निविहिन विधुरा ।
व्यर्थ तया भार्या सुंदर जो मत्त पिउनि मदिरा ॥ २७ ॥

व्यर्थ तियेचें नटणें मुसमुसणें जी विगतधवा ।
व्यर्थ जरि नवयौवन, सुंदर, कोमलतनु अथवा–॥ २८ ॥
व्यर्थचि ती नखशिखांत कनकालंकारें नटली ।
व्यर्थ हिरा, मौक्तिक जरि कुंकुम तिलक न त्या भाळीं॥२९॥

व्यर्थ तयाचें ज्ञान गायकी ताल न स्वर जाणें ।
व्यर्थ पुस्तकी घोकपट्टी अपस्वरचि गाणें ॥ ३० ॥
व्यर्थचि सुस्वर वाद्यें नाना, वादन नच ठावें ।
व्यर्थ तयानें सतार तबला बीन वाजवावे ॥ ३१ ॥

स्थळ पत
स.
ता



व्यर्थ कासया पेटी मंजुळ वेणू वा वीणा।
व्यर्थचि इंधनकाष्ठपरि, तालज्ञानकलाहीना ॥ ३२ ॥
व्यर्थ कोकिला मधुरगिरा नच समयीं गाय जरी।
व्यर्थ मधुर तो घनशब्दें नच हर्षें नृत्य करी ॥ ३३ ॥
व्यर्थ तया कीं अनुपम वारू आरोहण नेणें।
व्यर्थ कोट पॅटलून बूट मग व्यर्थ सर्व नटणें ॥ ३४ ॥
व्यर्थ तयाचें अध्यापन जो चतुर्वेदि म्हणवी—
व्यर्थ जरी नच साधारणही वाक्यान्वय लावी ॥ ३५ ॥
व्यर्थचि शास्त्रज्ञान इतर बहु परि त्या समजावें।
व्यर्थचि साधारण जनतेसम द्वैत जया ठावें ॥ ३६ ॥
व्यर्थ महावस्त्रें शिर भूषित केलें शास्त्र्यानें।
व्यर्थचि ते घटपटादि लटपट अध्यात्म न जाणे ॥ ३७ ॥
व्यर्थचि शड्शास्त्री, नच अवगत एकहि वेद ऋचा।
व्यर्थ म्हणावा ब्रह्मकुलोद्भव शुद्ध न जरि वाचा ॥ ३८ ॥
व्यर्थचि शास्त्री वैदिक तो संतोष न ज्या चित्तीं।
व्यर्थचि वाक्पाटव कीं ज्याची अति द्रव्यासक्ती ॥ ३९ ॥
व्यर्थचि तें ज्योतिष्य ज्ञान जरि गणित न सत्य निघे।
व्यर्थचि पंचांगाविण वैदिक शास्त्री हे तीघे ॥ ४० ॥
व्यर्थचि तो कर्मनिष्ठ ब्राह्मण कोपे शीघ्र अती।
व्यर्थचि संध्यादिक अन्हिक तें दावि जनां कुमती ॥ ४१ ॥
व्यर्थचि समजावें त्या शवसम शिव शिव जरि न म्हणे।
व्यर्थचि ब्राह्मण केशव नारायणही जरि न म्हणे ॥ ४२ ॥

व्यर्थ वैद्य मग रोग सत्य जो नेणें जरि मात्रा
व्यर्थ तयाचे उपाय नूतन योजीं क्षणिं सतरा ॥ ४३ ॥
व्यर्थ मुखोद्गत निघंट वाग्भट अनुभव नच तिळही
व्यर्थ चिकित्सा, नाडिपरिक्षा जरि नच गुरु शिकवी ॥४४॥
व्यर्थ नाव त्या भिषग्वर्य नच रोग बरा केला
व्यर्थ तयाचें अरोग्य मंदिर गेला तो मेला ॥ ४५ ॥
व्यर्थ जरी आयुष्यचि सरलें अमृत काय करी
व्यर्थ विषादिक घात तयावरिं प्रभुवर ज्या तारी ॥ ४६ ॥
व्यर्थचि डाक्टर फिजीशियन् नच संतोषित राही
व्यर्थ काहिंतरि प्रिस्क्रिप्शन दे खरी करी निज फी ॥ ४७ ॥
व्यर्थ तयाची ती श्रीमती अलोट संपत्ती
व्यर्थ जरी गरिबांचे सकट क्लेश लव न हरती ॥ ४८ ॥
व्यर्थचि सत्ताधीश म्हणवि दुर्बला न धीर जरी
व्यर्थ शक्ति पिळदार तनूही म्हणवी वीर जरी ॥ ४९ ॥
व्यर्थचि तो बलवान म्हणावा क्षमा न चित्तिं वसे
व्यर्थ हृदय पाषाणासम तें दया मुळिं न गवसे ॥ ५० ॥
व्यर्थ तयाचें बहू शौर्य तें वारि न दुष्टांते
व्यर्थ मत्तमातगपरी जो छळितो सुष्टाते ॥ ५१ ॥
व्यर्थ कीर्तिलक्षणीं जया नच पूर्णताचि आधीं
व्यर्थ बाह्य स्वार्थत्यागी जो अर्थ विपुल साधी ॥ ५२ ॥
व्यर्थ जरी अनुभविक वृद्ध तो विचार आंगीं नसे
व्यर्थ तरुण तो निरुत्साह ज्या हृदयीं नित्य वसे ॥ ५३ ॥

व्यर्थ स्वे स्वे कर्मनिरत नच जे नर जगिं वसती
व्यर्थ कां न ते जीवहि जे निज धर्म न आचरती ॥५४॥
व्यर्थचि तो बटु विद्यार्जन जरी सद्भावें न करी
व्यर्थ तयाचें द्विजत्व नच जो ब्रह्मचर्य अचरी ॥ ५५ ॥
व्यर्थ गृहस्थाश्रम त्याचा जरि अतिथि न पूजि कदा
व्यर्थ दक्ष ससारीं जो निज कुटुंब दुखवि सदा ॥ ५६ ॥
व्यर्थ धान्यगृहिं विपुल, न खर्ची भिक्षेस्तव दाणा
व्यर्थ तयाचा थाटमाट तो म्हणतो " मी शहाणा " ॥५७॥
व्यर्थ यतीश्वर स्त्रीसौंदर्यें ज्याचें मन चळतें
व्यर्थ तयाचें रसनेंद्रिय ही रसलोलुप बनतें ॥ ५८ ॥
व्यर्थचि चाकर निज धनिआज्ञा मर्जि न जो राखी
व्यर्थ कष्टकाबाड कसें तरि सारुनि जरि टाकी ॥ ५९ ॥
व्यर्थ धनी जो वेतन सारें वेळीं नच देई
व्यर्थ दुरुत्तर सदा ऐकवी सेवक मन दुखवी ॥ ६० ॥
व्यर्थचि तो अधिकारी संतत हस्तक जो छळितो
व्यर्थचि ते श्रम गरीबाचे जो चदनसम झिजतो ॥ ६१ ॥
व्यर्थ व्यर्थ नरजन्म अशा त्या दुष्ट पातक्याचा
व्यर्थ छळावें घातपात हा व्यवसायचि ज्याचा ॥ ६२ ॥
व्यर्थ बाह्य गभीर, शांत, उच्छृंखलचित्त जरी
व्यर्थ तयाचें मौन क्षणहि जो कोप मनिं न अवरी ॥६३॥
व्यर्थ शेकडो मित्र संकटीं एक न ये कामीं
व्यर्थ वल्गना प्रत्येकाच्या " जिवलग एकचि मी " ॥६४॥

व्यर्थचि आशा इतराची जरि प्रभू पुरवि आस
व्यर्थचि कीं मग खटपट सारे व्यर्थचि सायास ॥ ६५ ॥
व्यर्थ भक्त तो प्रभुचा म्हणवी भक्ति न दृढ हृदयीं
व्यर्थ नाम संकटीं प्रभूचें विसरे सुखसमयीं ॥ ६६ ॥
व्यर्थ जरी विश्वास न चित्तीं हरिभजनीं नाचे
व्यर्थचि कीं मग उच्च रवानें नामघोष वाचें ॥ ६७ ॥
व्यर्थचि तें पूजन आपण कीं द्विजाकरवि करवी
व्यर्थ जाप्यजपही दाक्षिण्यें व्यर्थ माळ झिजवी ॥ ६८ ॥
व्यर्थ दोन छिद्रांतिल दोन्ही गोटे, नच डोळे
व्यर्थ जन्म नच प्रभु दर्शन घे विषयिं सदा लोळे ॥ ६९ ॥
व्यर्थ मुमुक्षू श्रीगुरुवचनीं जरि न सावधान
व्यर्थ तया प्रभुनें श्रवणास्तव दिल्हे दोन कान ॥ ७० ॥
व्यर्थचि तो मग जसा जन्मला तसा का न मेला !
व्यर्थ मनुज, विश्वासघात जरि गुरुकार्यीं केला ॥ ७१ ॥
व्यर्थ जगातिल प्रभूकृपेविण सर्व प्राप्त सुख तें
व्यर्थ सकल तनु बहु सुंदर परि नासिकाहिन मुख तें॥७२॥
व्यर्थचि कवि तो प्रभुयश गाउनि धन्यता न मिळवी
व्यर्थचि मनुजस्तुतिलेखनिं जो अपुलें यश मळवी ॥७३॥
**व्यर्थ जगत नाशिवंत, एकचि सत्य प्रभु अमुचा**
सत्य तयाची कृपादृष्टि जी मूका दे वाचा ॥ ७४ ॥
**भक्तकामकल्पद्रुम**, भक्ता भक्ति खरी देवो !
वंदुनि पद **यशवंत** भक्तिनें धन्य जगतिं होवो! ॥ ७५ ॥

मु. शालीबंडा, हैद्रा. द०
गुरुवार का. व. ८ श. १८३९

## ४२ अधिकार-अष्टक.

वृत्त—उपजाति

आधीं करी आणि तसाच वागे ॥ जनांस तेव्हां उपदेश सांगे
आहे जयाला अनुभूति, त्याचा-॥ जगात जाणा **अधिकार** साचा ॥१
जो क्षुद्र ऐसें विषयास लेखी ॥ समान तो सर्व जगां विलोकी
मानापमानास समान मानी ॥ सुखास दुःखास मनीं न आणि ॥२॥
इच्छा नसे तृप्त कधीं जयाची ॥ मनें सदा जो विषयांस याची
सावत वेदात जनात सांगे ॥ तया म्हणावे 'अनुमान योगें' ॥ ३ ॥
एका क्षणाच्या स्वसुखा भुलोनी ॥ अनेक जन्मार्जित घालवोनी-
घ्यावें कशाला मनुजत्व ऐसें ॥ 'अलभ्य लाभ' तरी कार्य नासें ! ॥४॥
जो शिष्य आहे अनुयुक्त[1] ऐसा ॥ गुरु जयाचा अनुयोक्तृ[2] तैसा
विद्याविरोधी जड होय जैसा ॥ समान दोषी गुरु, शिष्य, पैसा ॥५॥
ज्ञानामृताच्या उपदेशकांचा ॥ स्वघातक्यातें अधिकार कैचा
पीयूषदाना नच योग्य होतो ॥ स्वयेंच अन्नाविण जो मरे तो ॥ ६ ॥
ज्वाला जरी जाळु शके जगाला ॥ परतु जाळी नच कीं स्वत:ला
संसर्गयोगें निजरूप देई ॥ सुवर्ण लोहाग्नि समान होई ॥ ७ ॥
सामर्थ्य ऐसें जगिं सद्गुरूचें ॥ क्षणात जाळी अघ पातक्याचें
जे देति सायुज्यपदंही[3] स्वतःचें ॥ सदैव गावें **यश** एक त्यांचें ॥ ८ ॥

मु० पुणे-सदाशिव
गुरुवार मार्ग. शु. ७ श. १८४९

---

१ पैसे देऊन शिकणारा २ पगारीशिक्षक ३ एकरूपता.

## ४२ चार चांदण्याच्या रात्री

वृत्त—मंदाक्रांता

" घाई घाई असलीं कसली लागली आज तुम्हा
हातीं ही हो! कसलि छबडी घेउनी जात धामा " ?
औत्सुक्यानें तुम्हि मम पित्यां ज्या दिनीं प्रश्न केला
होता माझा **प्रथम** दिन तो या जागीं जो उदेला ॥१॥
तातानें हो मजशि मधुचें बोट कीं चाटवीलें
पेढे सारे सुहृदसदनीं सत्वरें पाठवीलें
जन्माचे हो ! सुखद, शुभ हें वृत्त ऐकोनि तूम्हीं
आलां तेंव्हा मजशि बघण्या शीघ्र मत्तात--धामीं ॥२॥
केला मोठा बहुत परिनें थाट तो बारशाचा
माझ्या चित्तीं मुळि न शिरला लेशही त्या सुखाचा
रामा, कृष्णा, हरि, हर, सदू, ठेविलें पंचनामा
प्रेमें बाळ्या म्हणति मज त्या जन्मतः जो अनामा ॥३॥
याचा झाला परिचय जधीं तेंच तें आयकोनी
" बाबा, आई " मजशि म्हणण्या सांगती ओरडोनी
**कोहं, सोहं,** नच शिकवितां येत होतें मला जें
" गेलों सारें विसरुनि " असें सांगण्या चित्त लाजे ॥४॥
शब्दाची कीं गरज नव्हती, तृप्त मी स्तन्यपानें
माता शिक्षा करुनि शिकवी, खावबी षड्रसानें
ॐ नादाची स्मृति हरपली व्यर्थ या वाच्यतेनें
जिव्हेचीही रुचि बिघडली तिक्त आम्लादिकानें ॥५॥

केलें माझें उपनयन हो ! ज्या दिनीं मातपित्यानें
माझी माता शिकवि जणुं हें " केवि भिक्षेस जाणें "
" आलें तूंतें द्विजपण बरें " सांगती सर्व प्रेमी
तेव्हां माझा दिवस **दुसरा** मन्मनीं मोजिला मीं ॥ ६ ॥

झालों जेव्हां पदवीधर मी शिक्षणा संपवोनी
केलें तेव्हा वधुसह मला बद्ध मातापित्यांनीं
माझा मी हो ! **तृतिय** दिन तों चित्तिं मोजीत होतों
संसाराच्या रणिं कधि तरी कोणि का जीत होतो ! ॥७॥

थोड्या काळें सदनिं मजसा पुत्र जन्मास आला
तेव्हा माझा प्रथम दिन मी मन्मनीं आठवीला
वाटे लोका सुख जरि अती लेश मातें न झालें
माझ्या चित्ता सतत गमलें क्लेश मातेस झाले ॥८॥

आला हाही मजसम बरें व्यर्थ कीं हो मराया !
माझा जैसा अतुल असला जन्म गेलाच वाया
अज्ञानाच्या सुखद असल्या **चारही चांदण्याच्या**-
रात्रीं गेल्या निपटुनि तशा व्यर्थ चत्वारिवाचा ॥९॥

आलों होतों जननमरणा टाळुनी मुक्त व्हायां
संसाराची फिरुनि अपुरी वासना घेउनीयां--
जाण्याचेही दिवस जवळीं येत गेले जसे ते
छाती फाटे बघुनि अपुल्या शोचनीय स्थितीतें ! ॥१०॥

मु० माणिकनगर
श्राव. व॥ १३ श० १८४९ गुरुवार

## ४४ सुपर्णा ! (चाल—पांखरा)

॥ सुपर्णा ! जाशिं कसा विसरून ? ॥
॥ इतक्यांत असा उलटून ? ॥ ध्रु० ॥
(पाखरा !)

नवरत्नाचा सर्वस्वाचा ॥
पंजर व्यर्थ करून ॥१॥

चंचुस्पर्शें पुलकित केलें-॥
जें फल तेंहि त्यजून ? ॥२॥

लोभ जगाचा उपभोगाचा-
लाभहि लाथाडून ॥३॥

एकाएकीं ऐन मजेचा
खेळ कसा उधळून ? ॥४॥

हितगुज सारें विसरून कां रे-
जाशिं मधेंच उठून ! ॥५॥

जिवापाड जरि तुज रिझविलें
जिवाचें रान करून ॥६॥

जिवापलिकडे जपलों तुजला
जिवांत जीव नसून ॥७॥

अळवित जरि नच जीव ठिकाणीं
जीव मुठींत धरून ॥८॥

तुज न दया तरि तुजवरि मरतो
मूर्ख पतग म्हणून ॥९॥

कितीक फसले अजुनिहि फसती
तुजवरि विश्वासून ॥१०॥

असंख्य फाद्या तुजविण सुकल्या
मातीमोल करून ॥११॥

जाउनि बघ तरि तत्क्षणिं इकडे
जाइन मीहि मरून ॥१२॥

वाऱ्यावरचा वाऱ्यासम तुज
घेउं कसें पाहून ?—॥१३॥

परि ठावें मद्रूप तुला रे
येशिल जरि परतून—॥१४॥

होशिल तूंही हिरमुसला, मज-
भस्मीभूत बघून ॥१५॥

जाळित कालाचा वणवाही-
तरुवन मधुन मधून ॥१६॥

अदय पांखरा ! हृदयहीन तूं
जाशि खुशाल उडून ॥१७॥

जड मति म्हणुनी जगतिं न जगती
तुज हृदिं कवटाळून ॥१८॥

थांब जरा येवढा पसारा
घेऊं दे अवरून ॥१९॥

चंचल पक्षी तरिहि जातसे
तोंडघशी पाडून ॥२०॥

॥ वा अनिला ! त्या सर्वेच नेईं
भस्महि हें उडवून ॥२१॥

॥ सुपर्णा ! जाशि कसा विसरून ? ॥

मु० शालीबडा, हैद्रा० द० }
आषाढ शु० १४ श० १८५० रविवार }



## "तीस" (वृत्त–पृथ्वी)

मदीय जपमालिका हिरकणी अमूल्या अशी
मदीय कविता ! जणूं हरपली, कशी दिव्यशी !
मदीय मधुदेवता ! अजि नसे इथें हाय ! ती
कसें मिळवुं मी तिला फिरुनिया मदीया सती ? ॥ १ ॥

सुरम्य नलिनीच ती मजशिं गुगवी सर्वदा ॥
कुठें वसत ती अता ! मज कळेल का एकदां ? ॥
क्षणींच तिज काढितो हुडकुनी जिथें ती असे ॥
कशास रवि चद्र कीं फिरति सारखे हे पिसे ! ॥ २ ॥

समीरगति खडुनी, चपल, तीव्र विद्युल्लता—
बघेन कशि यावते ? द्रुतगती तिची ती अता
मन पवनमानिती—गमत सथ तद्वेगही
स्वबुद्धि चपला—गमे उगिच काल का घालवी ? ॥ ३ ॥

कशास नच कीं कळे, दिसत ही उषा हर्षिता ॥
बघे यदि नभाकडे सतत अश्रु मीं गाळिता ॥
विजेहुनिहि दिव्य कीं नभिं लवेक मीं पाहिली ॥
मदीय मतिहारिणी "चमकली ?" "पुनः लोपली" ॥४॥

तसाच गमला मला उगवतां हंसे हा रवी
परंतु जन सांगती "हृदय केरवा हासवी
घनाभ्र तव धांवले, लपविले तयाला बळें
तमारि फिरवी मुखा, तिमिरराज्यही पातलें ॥ ५ ॥

निशीथसमयीं जिला हुडकिली नभीं सारखी ॥
परंतु पलही न मी फिरुनि पाहिली " ती सखी " ॥
अधीर मम वृत्तिही म्हणुनि कीं पुनः धांवते
अहा दिसलि ! छे—नसे—निजमनीं तसें भासतें ॥
विशुद्धपण लोपता रजनिकाल तो आठवी
प्रशांत मनहीं अतां हळहळू पुनः साठवी
प्रियांश मुखदृग्भ्रमें शशिस तेथ कीं पाहुनी
सुदुग्धसम तक्रकीं—शमविली पिपासा मनीं ॥ ७ ॥

ग्रंथ संग्रह
स्थळ प्रत
नं.
ता.

सुधांशु गमला गमो जरि ममेतरा गारसा ॥
समान मज वाटला शशिहि अर्क अंगारसा ॥
ममाश्रुजलवर्षणें तिमिर मज्जिला ही रसा ॥
अजुनिहि गमे मला जरि कितीहि कोणी हसा ॥ ८ ॥
तिला गगनिं पाहतां गलित अश्रुधारावली
मदीय नयनांतुनीं सतत जी तिथें वाहली
पडोनि कणजर्जरा अमित तारका जाहली
परंतु रविनें अतां सकल ती पहा शोषिली ॥ ९ ॥
कळे न जरि-शक्ति ही रविस का ? कुणीं ओपिली ?
तशीच मम दृष्टि ही नवल कीं तशी जाहली:—
लता सहज पाहतां करपली प्रसूनावली
प्रतीति पटली तरी उलट वृत्ति भाबावली- ॥ १० ॥
प्रदग्ध वन साम्य या सदनवस्तु कीं पाहुनी
असंख्य मग दाटल्या चिकटल्याच शंका मनीं

प्रियाच नसतां कसें अजुनि हे असें राहिले ?
प्रतप्तनयनाश्रुनीं नच कसें तथा जाळिले ? ॥ ११ ॥

रसा कुसुमपल्लवें विविध भूषणीं जी सजे
परी न मज लुब्धवी-गमति उष्ण निश्वास जे
विषण्णमन मानतें नच सुखा न कीं तत्त्वता
रमें न मन गायनीं रुदनसौख्य वाटे अता ॥ १२ ॥

भुजगश्वसिता परी मज सुगंध भासे पहा !
कुरंग नच-धावतो चिरडण्या गिरी तुंग हा
लतेवरि न भृंग-तो गमत मत्तमातंग सा
पिशाच रुदनस्वरें-फिरत काय कोणी पिसा ? ॥ १३ ॥

तुषार अनलापरी मृदुल पुष्प कीं जाळिती
सुगंधकण दाटले परि विषाग्नि कीं पोळती
विषाहुनिहि तीव्र ते विषय सर्व होती जिवा
करालमुखकाळही मजसि मित्र वाटे नवा ॥ १४ ॥

विलाप अजि होय तो सरस त्या विलासाहुनी
विकास गुण वाटतो सुकविती सुमांलागुनी
उदासमय भावना नच सुखास आशाळती
प्रदग्ध मम वासना नच कशास ही भाळती ॥ १५ ॥

विलाप मत होतसे-परि न आज आलापते
कशास मधु कोकिळा उगिच काय आलाप ते
रमेन जरि तीच कीं करिल मुक्त आक्रंदन
निमग्न मन राखुनी करिन अश्रुचें सिंचन ॥ १६ ॥

नसेच कमनीयता कुसुमहीन साऱ्या लता--
दिसेल यदि पाहता उपवनीं अरण्यें अतां
किमर्थ धुडगूस या अलितती तिथें घालिती
वृथा श्रमुनियां जरी परतती पुनः धावती ॥ १७ ॥
तिच्याविण गमे तसें निरस विश्व मल्लोचना
सुखें इतर वाटती गरलरूप कीं मन्मना
न सौख्य लवलेश ही परि जयास वाटे टिकें
तयास लखलाभ हें जगत पूर्ण होवो सुखें ! ॥ १८ ॥
सुसह्य अशि व्हावया विरहसंसृतीची व्यथा
उपाय यदि एक–हें जगत कीं असे तत्त्वत
अपाय अनुपान कीं बदलता जसा होतसे
तशी विषमता मला जगति प्रत्यया येतसे ॥ १९ ॥
स्वयें अविरमानसें गगन सोडुनी धावली
मदर्थ जगिं पातली ममहृदीं सदा राहिली
क्षणासमचि वाटले तिजसवें तपें दोन ती
तदीय विरहीं पळेंहि तरि अब्दशीं वाटती ॥ २० ॥
जिनें सहज लीलया अमरलोक जो आणिला
सवेंच अपुल्यासवें अजुनि वागवी त्याजला
तिचें सदन नित्य तें म्हणुनि आणिली खालती
मदीय जग खालती ! अजि असे प्रिया स्वर्गि ती ! ॥ २१ ॥
गमें क्षणिक आज तें सुखदसें असें स्वर्ग जें
धरा तरिहि का म्हणू अजि जया प्रिया कीं त्यजे

भ्रमो सतत कीं पडो विचरतां कुठेंही मही
अता मुळिंच कार्य कीं तिजकडे न अत्यल्पही ॥ २२ ॥

क्षणेक मज लाभला यदि कसा न तो शांतिचा
प्रवाहपतिता पहा विसर पूर्ण होतो तिचा
अघोर निशि काढिली बघत तीच ती श्यामला
प्रकाश अजुनीहि कीं दिसु न दे निराशा मला ॥ २३ ॥

हटेंच तरि चाललों विरहशोक सारावया
कुरूप हळु येतसे सुगम मार्ग दावावया
समुत्सुकमनासवें उचलिता पहा पाउला
तदा तिमिरभारहा– विरल होत कीं चालला ॥ २४ ॥

विशोकमन व्हावयां मम सशोकमग्नास्थिती
तदा विसरुनी पहा चरणही पुढें धावती
अहा! सुखद कल्पना गमत नेइ हास्योत्सवीं
प्रतिक्षणिंहि निर्मिते कितितरी हि विश्वें नवीं ॥ २५ ॥

प्रदग्धतरुदेह हा उमवला न संदेह ही
ममाश्रुजलसिंचनें फुटलि कीं तया पालवी
प्रियाच जणु वाटली हसत येत "आलीच तो?
तिला धरुनि ठेविल्या नच कधीं हि जाईल ती" ॥ २६ ॥

असह्य मनवेदना संवयिनें अशा जाहल्या
खरेंच समजोनिया सुखद स्वप्न त्या भाळल्या
क्षणेक हसलों असें बघुनिया रडें कोसळें
खरेंच मम हें रडें विकटहास्य कीं जाहलें ॥ २७ ॥

नवें पथहि कटकान्वितचि भूमिही तीच ती
अनेकपरिचीं पुढें दिसति संकटें हीं किती
फिरोनि बघतां पुनः परिचितस्वदु:खेल तीं
पदोपदिं परी पहा चलित मत्पदा खेंचती ॥ २८ ॥

अशक्य तरि शोधितों उगिच शीण कीं वृत्तिला
असेंच मनिं वाटलें ——सतत आठवावें तिला
तिचें स्मिताचि जाणुती—दिसलिया शरच्चंद्रिका
समीरलहरीच कीं गणुनिया प्रियादोलिका ॥ २९ ॥

उषेंत मधुहास्य तें—मृदुलता प्रसूनात कीं
तदीय नयनोत्पला च्युत मदीय नेत्रोदकीं
शचिप्रभवता, कवीं सुरलता मनीं आणुनी
निसर्ग कमनीयता सकल कीं तिचें जाणुनी ॥ ३० ॥

कुणी तरि म्हणें मला "थबकलासि का रे असा" ?
दिसे न परि पाहता, तरि पटे मना हेरसा
म्हणोनि नयनोत्सुका शमविण्या—"कसा हेर तो"
बघू तरि खरे असा सतत कोण का हेरतो ॥ ३१ ॥

अशी धरुनि लालसा अधिर कल्पना धांवल्या
मन स्फुरणशक्तिनें दशदिशाहि धुडाळल्या
परी न दिसले कुणीं म्हणुनि काय भांबावल्या ?
हताशनयनासवें फिरुनि मद्धृदीं पातल्या ॥ ३२ ॥



ग्रंथालय ... प्रत ... क्रमांक ... ता. ... दा.

उठे ध्वनि तिथें प्रतिध्वनिहि शेवटीं येतसे
प्रसंगहि वदेल कीं कितिक प्रत्ययां ये तसे
यदि ध्वनिहि येत ना, न पडसाद ही सागतां
परी पटवि वृत्ति जी सकलइंद्रियांतर्गता ॥ २३ ॥



## ४६ माणिक नगरचा हिरा हरपला. वृत्त—पृथ्वी.

कृतांत असला कसा अदय कालही कायसा
क्षणात सहजी बघा उलटवी नकाशा कसा
अशात विपरीत ते विहित मानण्याची दशा
निराशमय झालि कीं जगवितील आशा कशा ॥ १ ॥

अलाप निघतां जिथें भजनरंगिं रंगोनिया
विलाप अजि ऐकुनी हृदय जाइ भंगोनिया
दिसे तरिच बिंदु कीं अतुलवृत्ति आनंदली
अखंड कशि लागली नयनिं अश्रुधारावली ! ॥ २ ॥

जगे न जिव जीवनाविण जसें जगज्जीवना !
प्रभो पतितपावना ! तव कृपाहि आम्हा जना
जलात कलिका कशी सुकलि काय हें अद्भुत !
बुडोनि मृत जाहला अमृत कुंडिं ? नाहीं श्रुत ! ॥ ३ ॥

जगास **नरसिंह** कीं **महिपती** हिरे लाभले
प्रकाशमय शोभले, बघवले न काला भले
चकाकित तसेंच जें द्वितिय रत्न तें लोपलें
अजूनि नच एकही तपतपार्ध कीं लोटलें— ॥ ४ ॥

अशांत निज ज्येष्ठिंच्या दशमि मदवारीं निशीं
अताच नरसिंह ही स्वपदिं मग्न कां दाविशी
प्रभो ! मिटुनि नेत्र का बसशि ! काल धावोनिया—
कसा त्वरित घेतला बघ **हिरा** हिरावोनिया ॥ ५ ॥

जगत्रयिं नसेच कीं अतुल रत्न या तोडिचें
सतेज असलेंच हें वसत भाउ या जोडिचें
परंतु प्रभु **माणिका** ! बघवलें कसें हें तुला !
प्रकाश अजि लोपला दशदिशा तमीं व्यापिल्या ॥ ६ ॥

जनास यम जाणतो जणु रडे जसें लेंकरू
परी पुरुष तेंच तें सतत काय केलें करू—
असें समजुनी नवें नशिब इच्छिती जे मनीं
तयास प्रभु देतसे अधिक ही कधीं त्याहुनी ॥ ७ ॥

शिशू रुसुनि फेंकती समजुनी जुनी खेळणीं
शिलेवरि पडेल जें अपटुनी फुटे तत्क्षणीं
परंतु वरचेवरी प्रभुवरें तया झेलिलें
दिलें कितितरी नवें अजिवरी अम्हीं पाहिलें ॥ ८ ॥

स्वभाव सहजी असा अठवुनी तयाच्या यशां
मनात अति तोषलों म्हणुनि कां अशी दुर्दशा
दयाच करितो प्रभू सतत मानसीं वाटलें
कसें हृदय तें असें कठिण वज्रसें जाहलें ?—॥ ९ ॥

नशीब नुसतें न तें फुटुनियां उगें राहिलें
लगेंच कणधूळही बनुनिया उडों लागलें
नभीं क्षणभरीं न त्या फिरुनियां कुणी पाहिलें
नशीब फुटकें दिलें म्हणुनिया तया अर्पिलें ॥ १० ॥

नको नशिब थोर ही सतत देत जे आपदा
अनेक मनिंच्या न त्या पुरविल्याच इच्छा कदा

कितीक बसल्या तळीं विरुनिया मनींच्या मनीं
प्रभो ! परत घ्या नकोच यशभाग्य द्या उन्मनीं ॥ ११ ॥
प्रभुत्व प्रभु त्यागुनि अजि विभुत्व तो दाखवी
विभक्त नच तेच हे सुहृदभक्त कीं भासवी
आम्हांस जणुं तो प्रभू म्हणत हा ' तुम्हाला भ्रम
ममाश मम भक्त हे मग कुठें तयां विभ्रम ?' ॥ १२ ॥
प्रभू रुसलिया रुसो सदय नाम तें आठवू
तदीय यशपीयुषा हृदयिं सर्वदा साठवूं
जरी अदय लोटिले चरणसिंधु भक्तां दुरी
परंतु लहरी खरी कळवळोनि पोटीं धरी ॥ १३ ॥

---

* ही कविता ' माणिकप्रभु " मासिकाच्या (जून, जुलै १९२३ वर्ष २ रें अंक ३।४ ) जोड अंकातून प्रसिद्ध झाली आहे.

## ४७ माणिक माणिक बोल* (चाल—रामनाम तूं भजरे प्यारे)

**माणिक माणिक बोल** जिव्हे !
**माणिक माणिक बोल** गे ! ॥ ध्रु० ॥

नामामृतफल अती मधुर त्या ॥ नाहिं त्रिभुवनीं मोल गे ॥
पळ न दवडिं फल स्वीकारीं अधिं ॥ साल वराचि
मग सोल गे ॥ १ ॥

दृढ आणी जप जीवन जीवा ॥ जाऊ नको
अति खोल गे ! ॥
प्रभुयशगानरहित सर्वचि तीं ॥ इतर साधनें
फोल गे ! ॥ २ ॥

भवसागरिं तुज तरवि नाव परि ॥ जपुनि राखि
निजतोल गे ! ॥
जाशिं तरुनि जव पैलतिरीं मग ॥ स्वच्छंदें
नित डोल गे ! ॥ ३ ॥

नामामृत तुज प्राप्त म्हणुनि नच ॥ मदें जाऊ दे
झोल गे ! ॥
प्रौढी अपुली जनिं नच मिरवी--॥ माजवि
हलकल्लोल गे ! ॥ ४ ॥

पद **यशवंत** प्रभूचें गाउनि ॥ ब्रम्हानंदें
डोल गे ! ॥ ५ ॥


हित निज करीं अणि बध करणावरि ॥ लाउं नको
मग बोल गे ! ॥ ६ ॥

**माणिक माणिक बोल** जिव्हे
**माणिक माणिक बोल** गे ! ॥

---

* ही कविता "माणिकप्रभु" मासिकाच्या ( अंक ७।८।९ आक्टो० ते डिसेंबर १९२३ ) जोड अंकातून प्रसिद्ध झाली आहे

मराठी ग्रंथ संग्रहालय
ता.



## ४८ कोठील मी कोण मी ! वृत्त--शा. वि०

मी मोठा, अधिकारि मी, प्रबळ मी, श्रीमान्य मी, धीर मी
वक्ता मी सुविचारि मी सुशिळ मी विद्वान मी वीर मी
दाता मी, कनवाळु मी, विबुध मी गंभीर मी श्रेष्ठ मी
'**मी मी**' हें म्हणशी परी वद बरें **कोठील मी कोण मी** ॥ १ ॥
"ज्ञानी मी यजमान मी धुरिण मी शास्ताहि मी शांत मी
मानी मी बलवान मी कुलिन मी मोठा कृपावंत मी
भोक्ता मी गुणि मी उदारहृदि मी, खादाड मी तूं द्वाड तूं
न्यायी मी तसला पराक्रमिहि मी, खोटा महा भ्याड तू ॥ २ ॥
तूं मोठा मतिमंद, मूढ अति तू, अज्ञानि तू, दीन तू
तू तो मठ्ठ महा, द्विपाद पशु तूं त्याच्याहुनी नीच तूं"
मूढा ! हें दुजियास जें वदसि तें होशी तयानेंच तूं
ठावें जो नच तत्व **तत्वमसि**चें तो कोण, मी कोण तू ॥ ३ ॥
तो आहे सकलासि जीवनाचि, तो निर्माणकर्ताहि तो
स्वेच्छेनें जग चालवी, इहपरा दाताहि हर्ताहि तो
आहे दीनदयाळ तो, निजकृपें सर्वांस संरक्षितो
तो विश्वा घडवी जसें पुनरपी लीलें करी लीन तो ॥ ४ ॥
तो, तूं, एकचि, झालिया निकटिं तूं होतास जो दूर तू
धाता जो सकलासि निर्मित असे त्याच्या नियंताहि तू
तू तो कर्तुमकर्तु तूं सदय तू अध्यात्म तू वेद तू
पूर्वापारहि तू तसा अपर तू, तूं श्रेष्ठ सर्वज्ञ तू ॥ ५ ॥

तूं तू एकचि कीं त्रिकाळिं बसशीं तू आदि तू अंतिं तूं
तू तू तूचि खरा त्रिवार, असशीं तीन्ही जगीं वद्य तूं
विश्वव्यापक तूंचि विश्वहि, जसा विश्वेशसंपूर्ण तू
तू तैसा मजमाजिही वससिं तू मी-तूंपणा वीण तूं ॥ ६ ॥


वाटे मी जगतांत वावरत, कीं माझ्यांत ते—ऱ्यांत मी ?
आहे सत्यचि मी त्रिकाळिं म्हणुनी मी सर्व, सर्वांत मी !
सत्यज्ञानमनंत चिज्जडहि मी, कांहीं म्हणा तेंच मीं
जी जी जाणिव होतजाय मज, ती मद्रूप, सारेंच मी ॥ ७ ॥

मी, तू, तो, नुसतेच शब्द, वदती तीघेहि हाकेस मीं'
तीन्ही काळिंहि मीच एक वदतों निःसंशयें खास मी
नाहीं काहिं कठेंहि कीं मजविणें आधार सर्वांस मी
सादी सात जडादि मायिक असे वस्तूहि मी, भास मी ॥ ८ ॥

मी होतों, असतों, असेन जगिं मी, आहेच केव्हांहि मी
जें जें काहिं दिसे जयांस, वसतो तेथेंहि मी, तेंहि मी
दृश्यादृश्यहि भावरूप असि मी, आभाव, साकार मी
ऐसा सर्वचि मी—तरी शपथ घ्या—आहें निराकार मी ॥ ९ ॥

राहे रूप नसोनि सर्वगत मी, ध्याताहि मी ध्यान मी
जेथें कांहिं नसे तशा स्थळिं असे माझें अधिष्ठान, मी—
आहे एक जरी वसे त्रिभुवनीं कोठेंहि हो सिद्ध मी
माझा मीच जगाच मौज करितों कीं मुक्त मी बद्ध मी ॥ १० ॥

आहे मी घन, पूर्ण मी, अचल मी, सर्वांस आरंभ मी
कोणाचाहि नसे अनादि अपुला आहें निरालंब मी
ऐसा एकचि अद्वितीय अतुला स्वसिद्ध मी शुद्ध मी
अत्यतप्रिय मीच एक असला सच्चित्सुखानंद मी ११ ॥



## ४९ जगद्वंद्यां वंदा*

वृत्त—शिखरिणी.

मिळायां स्वानंदा सतत भवछंदा विसरुनी ।
भजेरे गोविंदा सुरपति मकुंदा निजमनीं ॥
त्यजीं स्वेच्छाच्छंदा कुमति मतिमंदा झडकरी ।
नको हेवा, निंदा, सकल सुखकंदा वशकरी ॥ १ ॥
जगद्वंद्या वंदा भजति सुरवृंदा कडुनियां ।
सुहृत्स्वात्मानंदा स्तविति सुखकदा हृदिं जया ॥
करी चेंदामेंदा सकल भवबंधां निजकरीं ।
हरी नष्टानंदा करि तपन अंधासचि हरी ॥ २ ॥

* रामकृष्ण निकेतन मासिक, वर्ष ५ वें, अक ८ वा, मे १९२९ त प्रसिद्ध झाली आहे.

## ५० भक्तकार्यकल्पद्रुम हा (चाल बालानंद)

साधन मन असता पाशीं
" कोण हरिल मम तापाशीं"
पुसशि जरी ममता पाशीं
अडकलाशि ममतापाशीं ॥ १ ॥

म्हणुनि सोडि या हीन कला
विषयोद्भव चेष्टा, नकला
शरण जाइ जो ज्ञानकला
अज्ञाना शिकवू शकला ॥ २ ॥

श्रीसद्गुरुपद अविनाशी
ते संसृति मूळ विनाशीं
सादर हो गुरुवचनाशीं
जेका भवभयवच नाशी ॥ ३ ॥

उपदेशक सताधिप हा
मायोद्भम शोकादि पहा
घालवि दैहिक मोह महा
**भक्तकार्यकल्पद्रुम** हा ॥ ४ ॥

काय अवधि लागे याला ?
निजभक्ता तारायाला !
हलवाया दळ रायाला
लघु वच एक पुरे झाला ! ॥ ५ ॥

## ५१ वावरशिल चिद्व्योमीं

( चाल—पादाकुलक )

सद्गुरुवचन मनिं रुजता झट्कन्
सुटतिल संसृतिपाशहि सट्कन्
ज्ञानपिसारा फुटोनि फट्कन्
**वावरशिल चिद्व्योमीं** चट्कन् ॥ १ ॥

वाहुनि फलभोगाची एडशीं
वरिवरि तोंडघशीं कीं पडशी
तरिहि विषयसौख्यां धडपडशी
दुर्दैवावरि उगिं चडफडशी ॥ २ ॥

विषयिं जरी आकंठहि पुरता
विषयभोग होई नच पुरता
सदृश न कोणिंहि सद्गुरुपरता
भ्रममति करिलहि चिद्रूपरता ॥ ३ ॥

वैराग्यानें मन तापाया
शांत कराया भवतापां या
हृदयिं धरावें सद्गुरु पाया
येइ न कामां हेम रुपाया ॥ ४ ॥

जाया, सुत याच्या ज्या गाठी
जन म्हणती जन्माच्या गाठी
परि होती पथिकांच्या गाठी
प्रेमहि जोंवरि भेटीं गांठीं ॥ ५ ॥

अपुरि वासनावसन शिवाया
कितिक जन्म घालशि वाया
जो न भजे कधिं ग्रंथ शिवाया
देशिल कधिं सद्‌बुद्धि शिवा ! या ॥ ६ ॥

मु० शालीबंडा, हैद्राबाद दक्षिण
रविवार अ० श्रा० शु० ५ श० १८५०

## ५२ सेवाप्रभुत्व.

वृत्त—मधुमाधवी वसंततिलका

स्वात्सिद्ध का मनुज हा म्हणजेच सेवा
विद्या न बुद्धि, बल, साक्षरही नसे वा—
सेवा कधींच जरि मानव घेति ना ती
आहे अहेतुक तरी अपमानिताती ॥ १ ॥
सेवार्थ जन्मभरि ते परि कष्टताती
कर्तव्यशूर नच मानि निराशखंती
सोडी न सिद्धि सहवास अशा जनाचा
सागे जणुं यमशिरावरि नित्य नाचा ॥ २ ॥
सेवा कधीं बुध न सेवि न याविणें ती
विद्याहि यद्यपि असे विनयाविणें ती-
स्वत्सिद्ध ऊर्ध्वगति मानवदेह याची-
आहे, परी न करणी तशि मानवाची ॥ ३ ॥

मु. शालीबंडा, है० द०
सोमवार का० शु० ६ श १८४९.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ क्र.
५१०४ ५१२
ता. ८-१-१९५३
ठाणे.

## ५२ संपादक. (चाल—बालानंद)

विश्वाकरितां सर्व हवे
यश एकाचें कधिंहि नव्हे
सर्व जुनें कांहीं न नवे
**संपादक** कैसा म्हणवे ? ॥ १ ॥

गतायुच्या उपचाराशीं
व्यर्थचि मात्रांच्या राशी
सोडुनि या अविचाराशीं
साह्य करा जगणाऱ्याशीं ॥ २ ॥

शक्य तेंच घडतें हातें
संस्कृति नच कीं देहातें
बुद्धि पोंचवी ध्येयातें
शक्याधिक ही दे यातें ॥ ३ ॥

धडपड निजमनिं सुख व्हाया
म्हणत आप्तजन सुखवाया
कन्यां, पुत्रां, जावाया,
परि शब्द म्हणे "जा वाया" ॥ ४ ॥

संपादन ऐसें व्हावें
ज्यां नच वृद्धिक्षय ठावें
घालविलें तरि नच जावें
'**संपादक**' तेंव्हां म्हणवे ॥ ५ ॥

मु० श्री सं० माणीकनगर }
रविवार भा० श्रा० शु० १२ श० १८५० }

**५४ रेगारे.** चाल—चलो मदनमोहन.

रेगारे माणिक प्रभुसकल सुख धाऽम
रेगारे मगारे निसारेगम पध गाऽम

पतित पावन प्रभु सच्चिदानऽद धाम ॥ ध्रु० ॥
पनिस रेसानि धप मधपधमप गाम

मनन ध्याऽन साधन साऽम्र न जरि
ममम धाऽनि साधनि साऽग नि निनि

होऽय तुज निधानि गाऽई ॥
निंऽनि सासा निधानि पऽप

मग होइल भऽस्म रेतर्व पाऽप
मग मपध गाऽम रेगरे पाऽप

गाइ गायी प्रभुनाम
मप धनी धपगम

मु० शालीबंडा, हैद्राबाद दक्षिण
बुधवार माघ व० १२ श० १८३३

---

## ५५ गारे माणिक तो.

राग-तिलककामोद; ताल-चौताल.

गारे माणिक तो जगदोध्दाऽर

गारे पमगा रे नासारेनिसासा

रे रे व्यर्थ घोळवीसी तूं काऽळ

रे रे मम पपनीध प मगारे

सऽर नसे नि सार हा संसार ॥ ध्रु. ॥

साऽनी धप नाधप म गारेसा

मनारे आधी घेइ माऽणिक नाम

ममम पनी पनी साऽसानि सासा

याऽभव जलधितुनि मग जाऽशि

निसारेगा रेसानीधप मप साऽनि

तरुनि करिल तो पार ॥ १ ॥

धपनी धपम गा रेसा

मु. शालीबंडा, है० द०
बुधवार, माघ व० १२ श १८३३.

## ५६ तूंचि एक.

वृत्त--अभंग.

तूंचि एक आम्हा सर्व गणगोत ॥ ब्रह्म ओतप्रोत
**माणीका** । तूं ॥ ध्रु० ॥

नेणों आम्हि कांहीं दुजे तुझ्यावीण ॥
हेंचि ब्रह्मज्ञान आम्हा लागी ॥ १ ॥

तूंचि जग, स्वर्ग, वैकुंठ कैलास ॥
मायिक हें भास जगत्सर्व ॥ २ ॥

कोणीं नये कामा तुझ्या पायावीण ॥
व्यर्थ शास्त्रशीण, ब्रह्मज्ञान ॥ ३ ॥

शक्य नसे ब्रह्मज्ञानाचें सायास ।
प्रभो ! तूंशि आस रक्षावे त्वा ॥ ४ ॥

ध्याऊं गाऊं तूझें पद **यशवंत** ॥
यातचि अनंत प्राप्त आम्हा ॥ ५ ॥

मु० शालीबंडा, हैद्रा० द०
सोमवार, श्रा. व ७ श. १८४१.

## ५७ जन जनार्दन पद. ( चाल–पादाकुलक. )

परोपकाराची शोभा–या
देहमंदिरातें शोभाया
कर्मजन्य भोगहि संपाया
फलत्याग भरभक्कम पाया ॥ १ ॥
चिरंजीव सेवक तो व्हावा ।
हेतु हाच सतत राखावा ॥
चिरस्थायि ऐशी जनसेवा ।
शिका, करा, मग जगास शिकवा ॥ २ ॥
कर्मजन्य जन्मचि यदि ठरलें
जनताहितकर्तें मग कुठलें
दीन दैन्यहारक हें नातें
सर्व एकरूपचि हें नाते ॥ ३ ॥
रवि एकाकरितां का उगवे ? ।
स्वातंत्र्यहि नच मोक्ष तें नवें ॥
उगिच काय म्हणुनी मिरवावें ।
तन मन जनचरणीं झिजवावें ॥ ४ ॥
लवहि न लोलुप कीर्तीसाठीं ।
ईश उभा मग त्याच्या पाठीं ॥
तोच **जनजनार्दन पद** गांठी ।
अगणित पुण्य जयाच्या गांठीं ॥ ५ ॥

## ५८ वस्तुस्थिति-संशोधन. ( चाल—चंद्रकांत. )

चोर पाउलीं मंदानिक कीं ।
आला भू-लोकीं ।।
कां च्युत झाला कळेच ना कीं ।
द्वेष केंवि नाकीं ।। १ ।।
स्पर्श तयाचा थंडगारसा ।
जाणवला महिला
तत्कंपित कर बघुनि दचकली
भय उपजें तिजला ।। २ ।।
तत्क्षणिं जागे होउनि पाहे
तेंव्हा तिज दिसलें
गगन सदनिंचे झाडुनि सारें
हिरे चोरि गेले ।। ३ ।।
घाबरलेली बावरलेली
हताश कीं झाली
हाय ! दिव्य ती माणिक मोतीं
म्हणे 'कोणि नेलीं' ।। ४ ।।
दवमौक्तिक जंव इतस्ततः ती
बघे विखुरलेलीं
हर्षित होउनि अधीर चित्तें
वेंचाया गेली ।। ५ ।।
परि एकहि नच हातीं आली
ठायींच्या ठायीं—

सर्व निमाली सत्यमुक्त अशि–
दिसली जी कांहीं ॥ ६ ॥
तत्त्वदृष्टिनेंच सृष्टिहि नच कां
दृष्टिभ्रम म्हणती
नामरूप हें असत् काल्पनि
परि सगळें भ्रमती ॥ ७ ॥
रम्य दृश्य कमनीय कल्पना
नव्य आणि नित्य
रम्य रूपकां कल्पुनि नच कां–
रमवावें चित्त ॥ ८ ॥
जोंवरि आहे रम्य कल्पना
रमवित ती चित्तां
**वस्तुस्थिति-संशोधन** होतां
कांहिं न ये हाता ॥ ९ ॥
दृश्य बघावें मन रमवावें
तरिच तृप्ति होई,
'दुरुनि साजिरे डोंगर सारे'
ही म्हण सुखदायी ॥ १० ॥
दिव्य असें सौंदर्य बघावें
सुरम्य विश्वाचें
रम्य कल्पना रम्य धारणा
देणें देवाचें ॥ ११ ॥

---

## ५९ एकादशीला शिवरात्र भेटे. (सप्तक) वृत्त–इंद्रवज्रा.

पाहे अति स्वच्छ तृषार्त पाणी।
धांवोनि गेला सरिता गणोनी॥
क्षारार्णवा पाहुनि त्यास वाटे।
**एकादशीला शिवरात्र भेटे॥ १॥**
शोकाकुळें कीं विरही बनाला।
गुंफीत गेला नयनाश्रुमाला॥
दावाग्नि धूमें नभ तेथ दाटे।
**एकादशीला शिवरात्र भेटे॥ २॥**
लाभोनियां कीं मधु सौरभाला।
माळ्यासही तो चुकवोनि गेला॥
पुष्पस्थळीं पाहत तीव्र काटे।
**एकादशीला शिवरात्र भेटे॥ ३॥**
भिक्षेस भिक्षेकरि कीं निघाला।
माधूकरीच्या सदनास गेला॥
तेथें असा भोजनबेत थाटे।
**एकादशीला शिवरात्र भेटे॥ ४॥**
कद्रुगृहीं एक क्षुधार्थ गेला।
हेमाद्रि रत्नास बघोनि धाला॥
पात्रांत पाहे जंव शाक काटे।
**एकादशीला शिवरात्र भेटे॥ ५॥**

दारिद्र्यसंत्रस्त कफल्लकाच्या–।
दारीं जरी ऐकवि दीनवाचा ॥
अन्योन्य कंठातरिं दु:खदाटें।
**एकादशीला शिवरात्र भेटे ॥ ६ ॥**

कीं मंददृष्टाहि निशीथ काळीं ॥
अधासवें दडवतास घाली।
पूर्वाधिकें संकट येत मोठें।
**एकादशीला शिवरात्र भेटे ॥ ७ ॥**



सं.
ता.



## ६० एकादशीला शिवरात्र ? ( अष्टक ) वृत्त--इंद्रवज्रा.

पूर्वगृहीं पश्चिमबाइ आली ।
ऐकोनि ऐसे प्रतिभा निमाली ॥
आश्चर्य कोणासहि का न वाटे ? ।
**एकादशीला शिवरात्र भेटे ॥ १ ॥**

वंध्यासुता कंठिं खपुष्पमाला— ।
घाली शुक्राचार्य कनिष्ठबाला ॥
टाळी जधीं वाजवितील थोटे ।
**एकादशीला शिवरात्र भेटे ॥ २ ॥**

कीं श्वान जो खंडितपुच्छ झाला ।
यत्नाधिकें प्रासहि तें तयाला ॥
फुटें न पुच्छा, परि श्वान कोठें— ।
**एकादशीला शिवरात्र भेटे ॥ ३ ॥**

आनंदरूपीं जगिं जीव नाचे ।
तरंग कीं नाचत जीवनाचे ॥
नावासही दुःख नसेच कोठें ।
**एकादशीला शिवरात्र भेटे ॥ ४ ॥**

विद्याधिकें संस्कृत चित्त ज्याचें ।
दावावया दैन्य तयास जाचे
औदार्यशून्या बघताचि वाटे ।
**एकादशीला शिवरात्र भेटे ॥ ५ ॥**

ते थोर जे दीनगृहीं न जाती ।
न दीनता मानिति हीन जाती ॥
गमें जरी हे विपरीत मोठें ।
**एकादशीला शिवरात्र भेटे ॥ ६ ॥**

द्वंद्वप्रवाहात समानचित्तें- ।
जे पोहली त्यास अशाति भीत्ये
साधू असें सांगति काय कोठें:–
**एकादशीला शिवरात्र भेटे ॥ ७ ॥**

विद्येस सन्मान कुठेंहि आहे ।
केव्हांहि तत्सन्निध विश्व राहे ॥
मोठे कधीं घालिति काय खेटे ?
**एकादशीला शिवरात्र भेटे ॥ ८ ॥**

## ६१ आला पूर खरा परंतु समजा ओढा. पुनः कोरडा

वृत्त—शा. वि.

व्योमीं मेघ जगद्धिता झटुनिया पर्जन्य कीं वर्षवी ॥
जैसे तृप्त करीत चातक तृषा वृक्षादिकां हर्षवी ॥
तैसे पर्वत डोंगरावरि हि कीं–हें घेउनी त्या जलां ।
ओढा बालक लाडका म्हणुनिया देती बलें त्याजला ॥१॥
वर्षाकालिं जरी नदीसम दिसे जोरात वाहे अती ।
याची होय खरी वसतसमयीं अन्योन्य ती दुर्गती ॥
आला पूर म्हणोनि पुष्ट दिसतो गर्जे अता एवढा ।
थोडा काल उगीं बसा मग बघा **ओढा पुनः कोरडा** ॥२॥
तेंव्हां तो असला मदाध दिसला कोणीं म्हणे त्याजला ।
त्वेषानें जणुं धाव घेत सुटला मातग कीं माजला ॥
धो धो वाहत गर्जना करुनियां तो ओरडा केवढा ! ॥
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा** ॥३॥
होता वाहत जो भरोनि दुथडी उद्दाम उन्मत्तसा ।
आतां किंचित ओलही नच दिसे आला उन्हाळा जसा ॥
वाळू रूक्ष जसे तसे बघुनि घ्या प्रत्येक गोटा खडा ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा** ॥४॥
मूर्खांना शिकवावयास करितां कांही घसा कोरडा ।
याचा अल्पहि फायदा न बधिरा कोणी किती ओरडा ॥
कैसे पुरित होय कल्पवरि ही कीं पालथा जो घडा ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा** ॥५॥

चाले कीं म्हणुनी उगी जरि तुम्ही बैसाल पाठीवरी ।
तेही राहि उगेच दंडवतही घालील भूमीवरी ॥
तट्टू चालत सत्वेंर पुनरपी—ओढा पुन कोरडा ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुन: कोरडा** ॥६॥
शब्दाचा जणुं शाहण्यास गमतो कीं तो खरा कोरडा ।
तैसे बोलुनि काय होय—असल्या ? याना हवा कोरडा ॥
होतो मूढहि सुज्ञ कोणि म्हणती ओढा जसा कोरडा ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुन कोरडा** ॥ ७ ॥
डोकेंफोड करा कितीहि शिकवा शाळेसही पाठवा ।
किंवा पाठ करावयास उठवा रात्रीं वळें जागवा ॥
नैरास्यें म्हणताल शेवटिं तुम्हीं प्रेमें जरी वागवा ।
'यांना येईल काय अकल कधीं हे रामा ! हे माधवा !' ॥८॥
लाडी गोडि करोनियां समजवा यांना किती आळवा ।
आशा सोडुनि द्या कधीं द्रव न ये स्वप्नीं अशा मानवा ॥
कीं काळास दया न येत कधींही कोणीं किती ओरडा ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा** ॥ ९ ॥
जाई हा शिकण्यास वर्ष नववें कीं लागलें जेधवा ।
तेव्हापासुनि यास अंधुक दिसे शाळेस कां पाठवा ॥
पाहोनी नयनास डाक्टर म्हणे ऐशास चष्मा हवा—।
नीळा एक, दुजा तसाच, हिरवा कीं पांढरा पारवा ॥ १० ॥
अभ्यासात न वेळ जाइ म्हणुनी तो व्यर्थ का घालवा ।
वेळोवेळिं पुसोनि स्वच्छ करितो कीं तो दिसावा नवा ॥

याचें कोड तुम्ही कितीहि पुरवा तोषे न हा बेरडा ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा ॥ ११ ॥**
शेंडीला अजिबात देउनि रजा वक्री शिरीं राखवा ।
मानेला नेक्टॉय कॉलर तसे शू बूटही घ्या नवा ॥
फाटे शर्ट जधीं तत्क्षणीं दुजा शॉपातुनी मागवा ।
तेव्हा बाळ म्हणे प्रसन्न हृदयें " शाळेस कीं पाठवा " ॥ १२ ॥
बाघोनी, धरुनी जरी क्षणभरीं वस्त्रें नवीं नेसवा ।
कीं त्या एकदिनींच राहि बरवा घेईल ही बाहवा ॥
हाही फाडुनि होतसे फिरुनिया वेडा जसा नागडा ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा ॥ १३ ॥**
हातीं पुस्तक हा कधीं नच धरी पाहील कोणीं तरी ।
येते लाज जणूं म्हणोनि बसतो जाऊनि माडीवरी ॥
मोठ्यानें करि पाठ पाहू म्हटल्या हा वाचतो अतरीं ।
कैसी होईल कीं पुढें नच कळे याची गती श्रीहरी ! ॥ १४ ॥
एका आठवड्यात पावहि धडा संपूर्ण नाहीं जरी ।
तोही पूर्ण न होय—बुद्धि असल्या देईं प्रभो तू तरी ॥
ऐशा मंद मुला उपाय कसला कोणी हंसा कीं रडा ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा ॥ १५ ॥**
आता पाठ करी क्षणात विसरी ऐशा मुलातें जरी ।
सामोरी बसवोनि पाठ करवी किंवा स्वतःही करी ॥
याच्याही उपरी न अक्षर जरी येई—किती सावरी ।
सांगा काय करील मास्तर तरी कीं बापही त्यापरी ॥ १६ ॥

देई हा नच एक उत्तर खरें कोपोनि कॉपी करी ।
पाहोनी लिखितास वाचक म्हणे, ' आहेत कांहीं तरी ॥
सांगा यासचि ' **शारदा** लिहि बरें ' हा काढितो " **षारडा** "।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा** ॥ १७॥
हौसेनें स्वयपाक उत्तम करी भाजूं शके भाकरी ।
जैसी आइ बहीण काम करित्ये हाही करी त्यापरी ॥
खर्चा मोलकरीण बाळगुनियां कां व्यर्थ पैसे तरी ।
आहे कीं घरचाच बाळ गुणि हा केव्हाहि बैसे घरीं ॥ १८ ॥
पोथी पुस्तक आणि कागद करीं घेवोनिया कातरी ।
चित्रें रगित सांपडे नच जरी कांहीं तरी कातरी ॥
अभ्यासास बसे कदाचित कधीं चित्रास मारी खडा ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा** ॥ १९॥
आतां उंच पुरा व योग्यहि असा झाला विवाहा जरी ।
पुत्रप्रेम म्हणोनियां तुम्हि गळा का बांधता नावरा ॥
कॉलेजाचि निदान एक तरी ही डिग्री न घे जोंवरि ।
टाका तोंवरि लांबणीवरचि वा लावोनि द्या नोकरी ॥ २० ॥
याला ती न बरीच कावडि खरी घेवोनि द्या ती तरी ।
आतां घ्याल जरी न घेतिल पुढें खाद्यावरी घागरी ॥
या मार्गासचि योग्य हा समजतो विद्यापथां वांकडा ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा** ॥ २१॥
घेई छंद नवीन कीं नच अतां शाळेस जाई सुखें ॥
बाळ्याचा मुखडा प्रसन्न हि दिसे वाटे तुम्हा नेटकें ।

साधे नाइट क्लासही म्हणुनियां काखेंत मारी बुकें ।
रात्रीं नित्य थियेटरात बघतो हा सेनिमा नाटकें ॥ २२ ॥
भागे खर्चहि, आजकाल फिरुनी डोके अती कां दुखे ।
कैसे फीसहि डॉक्टरास करि पे आम्हास तें ठाउकें ।
लुच्चा हा चकवोनि वाडवडिला भासे जणू भाबडा ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा २३ ॥**
स्वप्नामाजिहि नित्य नाटक बघे बैसोनि कोचावरी ।
मोटारींतुनि जात सत्वर जणूं तैसीच घाई करी ॥
केव्हा पार्टहि नाटकात करितो तेथें धरी चाकरी ।
होई हा न प्रधानही कधि तरी राजा न झाला जरी—॥ २४ ॥
होतो कचुकि वा घटोत्कच कधीं कीं चोर मारेकरी ।
केव्हां होउनि गोंधळी तुणतुणी घेऊनि ओढीत री ॥
केव्हां तेथिल हा शिपाइ बनुनी देतो पहारा खडा ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा॥ २५ ॥**
देतो उत्तर शिक्षकास उलटे बोले उणे तो जधीं ।
अभ्यासातिल प्रश्न तो जरि करी भासे मुका की तधीं ॥
भीती वाडवडील जास्त कथण्या ‘ हा प्राण देईल कीं ।
किंवा जाइल हा विदेशिं निघुनी आम्हास त्यागील कीं ’॥ २६ ॥
विद्याभ्यास करोनि हेहि जगतीं विद्वान होतिल कीं ।
आशा व्यर्थचि, ते तुम्हास उलटा हा दोष देतील कीं ॥
“ देतो त्रास कशास व्यर्थ असला आम्हास हा थेरडा ” ।
**आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा ॥२७॥**

विद्यादानसमान पुण्य जगतीं दूजे न जे मानिती ।
सत्पात्रीं घडणेंच योग्य म्हणुनी मूढास ते बोधिती ॥
प्रेमें वागविती स्वकीयसम कीं मित्रापरी वागती ।
कीं याचा कल पाहुनी शिकविती सन्मार्गिं ते लाविती ॥ २८ ॥
विद्येचीच अशास सतत अशी गोडी खरी दाविती ।
ऐसे दैव बळेंच शिक्षक जगीं थोडेंच कीं लाभती ॥
या वाक्यास सदैव ठेउनि पुढें ज्ञातेच घेती धडा ।
**"आला पूर खरा परंतु समजा ओढा पुनः कोरडा"** ॥२९॥

मु शालीबंडा, हैद्राबाद दक्षिण
गुरुवार मिति पौष शु० ७ शके १८४३.



## ६२ विजयादशमी.

वृत्त–गीति ( आर्या )

**विजयादशमी** झाली विजयप्रद पूर्ण जेवि **विजयातें** ।
सीमोल्लघन झाल्या सूज्ञहि मिळवील तेंवि विजयाते ॥१॥
पूर्वे द्विगुणित दुसरे यशमणिमालाच कठि जो मिरवी ।
सर्वाधिक्य असें ते निज शौर्ये **विजय** नांव कीं मिळवी ॥२॥
त्याच शुभदिन प्रेरित रक्षियलें तेज हिंद–राजांनीं ।
विजयश्रीपासुनि ती यशमाला फिरुनि मिळविली ज्यांनीं ॥३॥
त्याच हिंदमातेचे पुत्र म्हणवितों ! परंतु ती आता ।
विजयीमाला कोठें ? परि तीचा खेदही न ये चित्ता ॥४॥
ज्या शाप–शरबलाचा होता देवाहिकासही हेवा ।
वणिजवृत्ति वा सेवा पडलि गळां आजि हाय रे देवा ! ॥५॥
पुनरपि योग तसा कीं असीम तेजोबलादि सोपा न ।
म्हणुनि चढावे येथुनि मंथरगतिनेंच तेच सोपान ॥६॥
लक्ष्मीपुत्र हिशेबी काढिती दीपावलींत आढावा ।
तेविं शारदाभक्तें विजयादशमीस कां न काढवा ? ॥ ७ ॥
कर्माकर्म बघावें सत्कर्माधिक सदैव करण्यात ।
यत्नाधिक्य घडाया रहावें चिंतन तसेंच चित्तांत ॥ ८ ॥
कोठें, कैसें, कितिसें, गतवर्षीं काय काय चुकलें, तें ।
सर्व सुधारुनि त्याची वृद्धिस विद्यादि योग्य सुकलेतें ॥ ९ ॥
कीं इंद्रियगोचरही होइ न जें वर्तमान हर्षांत ।
जाइल अपुला कैसा काल तसा वर्तमान वर्षांत ॥ १० ॥

सत्कर्मांत मरावें जगदुपयोगार्थ जगतिं जन्मावें ।
उज्जलचरित निधाना पुढिलांस्तव कीं जपोनि राखावें ॥ ११ ॥
सत्कीर्तिनें उरावें शिक्षकरूपें जगास शिकवाया ।
निज निधनानतरही जाऊ न द्या मरण आपुलें वाया ॥ १२ ॥
विजयी वैशिष्यानें सागे कीं मिळविण्यास विजयातें ।
पायानें परदेशीं जाउनिया कर्म करित जा हातें ॥ १३ ॥
कीं ज्याचें देशाटण जितुकें हो जास्त होत जाईल ।
दैन्याचें उच्चाटण तितुकें तत्काल होत राहील ॥ १४ ॥
नौकागमननिषेधा निषेध करि **राम** सेतु बाधोनी ।
किती कंठशोष केला यावरि कळकळुनि **रामतीर्थांनीं** ॥१५॥
उत्क्रांतिपथाक्रमणीं दीर्घोद्योगात चित्त लावावें ।
श्रांत न होतां सतत कार्यीं यश मिळविण्यास सागावें ॥ १६ ॥
विश्राम त्यागाचे श्रम जे कां कुसुम घेतसे स्वागें ।
मग तें "राजाचेंही कंठालिंगन सहजसाध्य" हें सांगे ॥१७॥
किंचित्सौरभदूरी जाता कीं पथिक लुब्धवी पाहे ।
जेव्हा स्वयेंच जाये का नच तें देवमस्तकीं राहे ? ॥ १८ ॥
वृक्षच्युत पुष्पाचें उत्कर्षण कोवि होय स्वस्थानी
खाली धूळ कसे हो ! किति मातीमोल होत कीं रानीं ! ॥१९॥
गेहां सोडुनि देहा श्रमवा हो वर्तमानकाळांत ।
सीमोल्लघन तेव्हां होतें भूतांतुनी भविष्यांत ॥ २० ॥
काळकसोटीवर कीं कर्माची रेख कसुनि काढावी ।
त्याहुनि उज्ज्वल होण्या पुनरपि गाळोनि झीज सोसावी ॥ २१ ॥

मिश्रण त्यातिल सारें गेल्यानें शुद्ध होत सोनें तें ।
प्रत्येकाची रेषा अंतीं बावनूकशींस हो ! नेते ॥ २२ ॥
सीमोल्लंघन ऐसें झाल्या सिंहावलोकनन्यायें ।
विजयश्रीनें प्रेरित सत्वर ऐश्वर्य-शिखरिं तो जाये ॥ २३ ॥
यशमहतिन अल्पत्वें राहुनि सत्कर्मनिरत सावंत ।
उज्ज्वलयशध्वजातें मिरविल जो तोच होय यशवंत ॥ २४ ॥

मु. शालीबंडा, हैद्राबाद दक्षिण
गुरुवार भाद्रपद शु० १ शके १८४५

---

## ६३ देवघेव.

वृत्त गीति (आर्या)

ज्या हस्तें जें थावें घ्यावें तत्काल तेंच त्या हातें ॥
बैसे तसाच चिमटा दुजियातें घेतल्या स्वदेहातें ॥ १ ॥
खणता सखोल खड्डा खुद्द घसरतांच कोकलावें कां ? ॥
आधीं खो खो खुद्कन् दुजियातें
खद्खदां हंसावें कां ? ॥ २ ॥
हातों हातीं होतो नगदी व्यापार देवघेवीचा ॥
पाहूं पुढें दुपारीं, किंवा परवा असा उधारीचा ॥ ३ ॥

मु. शालीबंडा, हैद्राबाद, दक्षिण
सोमवार पौ० शु० १ शके १८४५

---

## ६४ मातृप्रेम. (वृत्त–शा. वि.)

झंझावात बळेंच जात गगनीं धुळीस कीं घेउनी ।
पाहोनी नयनीं न धीर धरते-तत्काळही मेदिनी ॥
चिंतेनें कृश होय, या अनुभवा आली जशी कीं मही ।
भूमातेविण या विशाल जगतीं दूजी नये एकही ॥ १ ॥

मानी मारुत मत्त शक्त न कुणां तो जेधवां आवरे ।
शाखादोलन होत आणि तृणही जे कावरे बावरे– ।
होती, त्यास बघोनि मातृमनही झालें असें घाबरें–॥
भीतीनें धृतिला जणू नखशिखीं वाटे भरे कापरें ॥ २ ॥

लक्ष्मी, चंद्र, सुधादि रत्नजनिता गंगादिका जोंवरी
तो रत्नाकर मातृभक्तसमकीं आहे जगीं जो वरी ॥
उत्तुंगाद्रि अनेक नष्ट करुनी गर्वा तयांच्या हरी ।
जेष्ठापत्य जिचा बलिष्ट असतां कां होय भू घाबरी ? ॥ ३ ॥

घेतो जें जळ गुप्तदान म्हणुनी आधीं जयापासुनी
कष्टानें घडवोनि शक्र गगनीं जीमूत–मार्गाहुनी–
प्रेषी, स्थैर्य न तेथ एक पळही विद्युल्लताही ही तशी ।
अभ्राच्छादित त्या नभास बघुनी भ्यावी मही का अशी ? ॥४॥

मातेचें मन प्रेमपूर्ण असतां वैरी न जै चिंति, ते–।
कां निष्कारण काल्पनीक नसत्या क्लेशादिकां चिंतिते ? ॥
चिंता–क्लेशचि भूषणास्पद गणीं यालाच कां इच्छिते ।
" वेडे प्रेम " असें तिला म्हणविण्या का धन्यता वाटते ? ॥ ५ ॥

अज्ञानी, असमर्थ, अर्भक अती निकृष्ट ज्यांची स्थिती ।
त्यांना मात्र विशेष योग्य समजे निःसीम प्रेमास ती ॥
माता एकचि या विशालजगतीं वाहे अती काळजी ।
प्रेमें घालविते सदैव शिशुच्या सांगोपनीं काळ जी ॥ ६ ॥

मातेला लघु, हीन दीन अथवा आपत्ति आधीं दिसे ।
ज्येष्ठ, श्रेष्ठ, समर्थ, बालक सुखी भासे न तीते तसे ॥
सौख्याचा अति उंच पर्वत तिच्या दृष्टीस मागाहुनी ॥
भासे क्षुद्र असा रजःकण जणूं किंवा लघू त्याहुनी ॥ ७ ॥

वस्तूपूरित होतसे घट जलां संपूर्ण कीं वारितां ।
लागे कांहिं न निर्झरास करणें संपूर्ण किंवा रिता ॥
वाहे प्रेमभरें सदैव सम त्या साजे न ही साम्यता–।
प्रेमाब्दें हृदयांबरीं पसरती शोकास कीं शोषिता ॥ ८ ॥

सेवा साह्य न बालकाकडुनिया केंव्हाहि इच्छी न जी ।
बाळांना सुखवावयास अपुल्या सौख्या सुखानें त्यजी ॥
स्वीकारी अति साभिमानहृदयें नि सीम दास्यत्व जी ।
त्रैलोक्यांतहि एक मातृसम ती आहे न व्यक्ती दुजी ॥ ९ ॥

स्वप्राणासम गर्भिणी जपुनियां गर्भास रक्षी जसें ।
होतां प्रेतहि त्यागिता न–उदरीं ठेवोनि घेई तसें ॥
केलें दग्ध जरी न लोटित दुरी अंकासही हालवी ।
**भूमाते**विण कोणती जननि ही वात्सल्यता दाखवी ? ॥ १० ॥

कां हा मारुत मृत्तिकारज असे जाणोनि नेतो दुरी ।
आश्चर्यातिशयें अशी गमतसे झाली न भू घाबरी ॥

त्यागोनी धन, हेम, रत्न सगळें कां मृत्तिका चोरतो ? ।
कीं चोरी दिसते परंतु न कळे कोणासही चोर तो ? ॥ ११ ॥

येती आड लहान थोर झुडुपें वृक्षादि पाषाणही ।
शाखा, पत्र, फलादिनाश बघुनी ओपोनिया प्राणही ॥
लोपे बांधव धर्म कीं म्हणुनिया वायूसवें झुंजती ।
बंधुप्रेमभरें तृणादिक किती धुळीसवें धांवती ॥ १२ ॥

होतां अल्प मनाविरुद्धहि जरी हा क्रुद्ध होवोनिया ।
झाला सिद्ध समूळ नाश करण्यां दुष्टास कैची दया ॥
आले आड म्हणोनियां उपटुनी पाडी तया आडवे ।
गेला प्राण तरी तरू फिरुनिया होती पहा आडवे ! ॥ १३ ॥

ग्रीष्मीं शुष्करसीं न जीवन जया रक्षोनि त्याना नवी–।
ज्यायोगें फुटते वसंतसमयीं शाखाशिरीं पालवी ॥
होता वाहत मंद कीं पवन तो लीलें जया खेळवी ।
ते पर्णान्वितवृक्ष आजचि कसा भूमीवरी लोळवी ? ॥ १४ ॥

भेटाया पसरोनि बाहु अपुले जे सर्वदा तिष्ठले ।
ज्याच्या आगमनें अहर्निश अती आनंदुनी डोलले ॥
ज्याचें स्वागत सार्वकाल करण्या निःसीम भक्तापरी–।
सेवातत्पर राहिले तरु जणूं एकाच पायावरी ॥ १५ ॥

वारा गार कधीं असह्य सुटतो मारा करी वाटतो ॥
केंव्हां उष्ण तसाच शांतहि, कधीं सो सो असा वाहतो ॥
शाखां, पर्ण, फलां, फुलां लहरिनें आघात ऐसे करी–॥
तेणें आदळती गरीब दुबळे हे एकमेकांवरी ॥ १६ ॥

कोपें ताडण ही करी शिरिं तरू हे वंदिति तत्पदां
तो जितुका खवळोनि येत तितुकें हे नम्र होती तदा
त्याचा राखुनि मान आपण अती सोसोनिया आपदा
माना डोलविल्या अनेक परिनें त्या त्या प्रसगीं सदा ॥ १७ ॥
झाले त्रस्त कितीतरीहि-अपुल्या हे जाणुनीया व्यथा ॥
येतो मारुतराज कीं म्हणुनिया संतोषवाया तयां ॥
घेवोनी करिं गुच्छ रम्य कुसुमें स्वादिष्ट तैसी फळें ॥
ज्यातें अर्पिलिं हाय! तोचि वधितो वृक्षांसि कां हो बळें ?॥१८॥

दुष्ट क्रूर अशा सवें कितितरी वर्षानुवर्षे जरी ॥
केलें सख्य परंतु तें विसरुनी हे दुष्ट केंव्हा तरी ॥
होती सिद्ध लगेच घात करण्या याना नको कारणें ॥
वाटे काहिं न घातपात करणें किंवा जिवें मारणें ॥ १९ ॥

मातेपासुनि दूर ओढुनि बळें पर्णादि धूलीस हा ॥
नेलें अंबरिं वायुनें जरि तया वात्सल्य तीचें पहा ! ॥
वाळूचा अति सूक्ष्म एक कणही राहूं न दे अंबरीं ॥
एका मांडिवरूनि कीं उचलुनी ठेवीत दूजीवरी ! ॥ २० ॥

जेंव्हां कां प्रतिरोधशक्ति थकली दुर्वांकुरापासुनी–॥
पानें, वृक्ष, विशाल पर्वत, गिरीपर्यंत हें पाहुनी ॥
**मातृप्रेम** अपत्य रक्षणिं तदा योजोनि धन्या मही ॥
झाली कीं **यशवंत** दु खविगता "आकर्षशक्ती न ही ! ॥२१॥

मु॰ शालीवंडा, हैद्रा॰ द॰
गुरुवार, श्रावण व॰ ३ श॰ १८४४.

## ६५ प्रेमाचे बोल.* वृत्त—गीती (आर्या)

प्रेमाच्या साम्राज्यीं प्रेमाची प्रार्थना कधीं नसते ॥
विनती, इच्छा आज्ञा तीहींची एकरूपता असते ॥ १ ॥
वक्ता मुकाच तेथिल बधिर सभेचा पहा कसा डुलवी
मौनाचीं व्याख्यानें परममधुर, मालकासही खुलवी ॥ २ ॥
फरडा फडणिस थोटा लिखित लिहुनि शीघ्र पांगुळ्यां पळवी
प्रेमी प्रजेस संतत राजाज्ञा जीहुनी[१] त्वरें कळवी ॥ ३ ॥
वाचस्पति जरि झाला **प्रेमाचे बोल** बोलता लाजे
गाता मुखें न शोभति मुखडे परणादि बोल ताला जे ॥ ४ ॥
बोलावे हृदयानें प्रेमाला भाषणें न कामाची
मृण्मय मूर्ती सजवा ! हेमाला भूषणें नका साची ! ॥ ५ ॥
गद्यपद्य ते कैचें हृदय मृदंगेंच बोल बोलावे-
प्रेमाचे ऐकुनियां प्रेमी श्रोतेच संथ डोलावे ॥ ६ ॥
प्रेमप्राकारातिल आदर्शासम दुजे न दाखविते
नसते नच तें असतें प्रतिबिंबीं बिंब तेंच कीं दिसतें ॥ ७ ॥

मु० शालीबंडा, हैद्रा० द० }
बुधवार माघ व० १० श १८४६. }

---

* (अरुणोदय मालेच्या (वर्ष २ रें किरण पहिल्या)—विजयादशमीच्या अंकातून ही कविता प्रसिद्ध झाली आहे.)

१ वीज.

## ६६ संक्रांतीचा सण.

वृत्त—गीति ( आर्या )

संक्रातीचा सण कीं प्रेमाख्यापन करीत-तिळ गूळ ।
स्वस्वप्रेमें होती उभय विरह कीं हरावया मूळ ॥ १ ॥
गुडभेटीस्तत्र होती तिळतिळ तुटुनि जीव ते तीळ ।
कीं तेल्याते भीती तेलास्तव ते तयांस नेतीळ ॥ २ ॥
म्हणुनि गुळाच्या पोटीं राहुनि ' तिळगूळ ' नाव हे मिळवी ।
स्नेहाचें प्रेमाचें मिश्रणमाधुर्य कीं जगां शिकवी ॥ ३ ॥
तिळगूळ हे निराळे असतां माधुर्य केविं हो गवसे ।
तेली वाणी याच्या सदनीं या उभयतास कोण पुसे ॥ ४ ॥
मोह इक्षुरसयोगें ममता गुड शुद्ध राब होवोनी ।
प्रेमळ शुभ्र असा तो होई कीं शर्कराच तेथोनी ॥ ५ ॥
कीं संक्रातिमिषें एकीचें फल जगास कळवाया ।
संमिश्रणचातुर्यें हलवा हा होइ फलद हलवाया ॥ ६ ॥
प्रेमालिंगन देती ऐसे तिळगूळ एकमेकांते ।
ऐक्यें बनले हलवा विसरुनि निजदेहरूप नांवाते ॥ ७ ॥
तेल्यातें त्यागुनिया तिल आम्हा स्नेह शिकवितो स्वागें ।
वणिजा सोडुनि गुड कीं वाणीनें गोड बोलण्या सागें ॥ ८ ॥
संक्रांतीच्या दिवशीं तिळगुळ देण्यांत प्रेम हें मूळ ।
जैसा देशिक देई गोडी कळण्यास गोडसा गूळ ॥ ९ ॥
प्रेमानें स्नेहानें हृदयातें गोड बोलुनी हलवा ।
प्रेमोद्भव होण्या द्या परोपरीनें परस्परा हलवा ॥ १० ॥

पोष्टानें तिळगुळ कीं पत्रीं तत्काळ तोचि पाठवितो—।
जो जीव जिवलगास्तव तिळ तिळ तुटत तेचि दाखवितो ॥११॥
'मगरमिठी मारावी' म्हणतो कीं मकरसंक्रमण तीळ।
परक्यालाहि पडावा पोटांतिल प्रेम पाहुनी पीळ ॥ १२ ॥
जो का प्रसन्न चित्तें तनमनतिळगूळ हेच दे होतें
देशातें, देवातें तोषवि तो जेवि कीं स्वदेहाते ॥ १३ ॥
मधुसयोगें मृत परि स्नेहाकुर सेवितो कसा हलवा ?
प्रेमामृत स्वयें व्हा त्यागा सर्वस्व आळसा हलवा ? ॥ १४ ॥
साधे विश्वप्रेमहि त्यागानें शांति सौख्य कीं सहजीं
श्री, न्ही, धी देवी ती सर्वस्वहि देतसे सुखासह जी ॥ १५ ॥
तिळगुळ होण्या हलवा तप्त तव्यावरि चढोनि ते दोघे
अहमहमिका धरोनी उज्वलसें दिव्यरूप जो तो घे ॥ १६ ॥
एकीच्या माधुर्या चाखाविण्याला स्वनाश पतकरती
'बोले तैसा चाले' हें व्रत आधीं स्वयेंच आचरती ॥ १७ ॥
नरदेह सार्थ करिती परोपकारार्थ झिजवुनी जगतीं
यावच्चंद्र दिवाकर तेच खरे या जगात की जगती ॥ १८ ॥
तिळगुळ काव्यमिषें या सागाया ऐक्य महति सर्वांना
प्रेषी प्रेमें प्रार्थुनि यशवतें शब्दातिल रसज्ञाना ॥ १९ ॥

---

## ६७ मानव महति.

सतत मनन करण्याचा आहे ज्याचा स्वभाव **मानव** तो
सद्वस्तु जाणुनीया जो का इतरे जनास जाणवतो ॥ १ ॥
देहांत देह धारक विश्वभर व्यापिला असे अवनीं
त्रैलोक्यनाथ म्हणवी तीन्ही लोकांत व्यापिला म्हणुनी ॥ २ ॥
देहातीत असा तो देव असे देह हीच ती माया
देहावाचुनि कैची मायारूपें दिसेल कीं छाया ॥ ३ ॥
सर्वांतरिंचा आत्मा नटुनि थटुनि थाट माटजो करितो
कामी, क्रोधी, लोभी दांभिक हा क्षुद्र शांतही होतो ॥ ४ ॥
विकृतिवश नच होतां विचारयोगें जगात वावरतो
पूर्ण विवेक विरागी मायिक दृश्यासि पाहि वरवर तो ॥ ५ ॥
देह विसरुनी चालवि चित्तीं चिंतन सदैव देवाचें
मानावरि आला कीं प्रिय मधुरहि सत्यते वदे वाचे ॥ ६ ॥
ऊर्ध्वाधोगत होण्यामध्य असा देह मानवाचा कीं
नारायण वा वानर ज्ञाना ज्ञानें प्रवृत्तिच्या चाकीं ॥ ७ ॥
कर्माकर्मविवेचन साधन हें पूर्ण वसत नरदेहीं
सत्कर्मे दाता, परि फिरत अकर्मे करूनि नर "देही" ॥ ८ ॥
**नरका नारायण** ही होण्याचा योग मानवांना कीं
आहे परंतु जाती कर्मानें यमपुरींत वा नाकीं ॥ ९ ॥
मानावा नच मानव क्षेत्र म्हणा पाप पुण्य पिकण्याचें
कीं मायिक बाजारीं जननमरणफल दुकान विकण्याचें ॥ १० ॥

त्यागी कर्मफलोचित स्वानंदें हाच निजपदीं नाचे
परि नर विषयेच्छेनें भोगी परतंत्र भोग दीनाचे ॥ ११ ॥
जेव्हां का कंटाळा एकलकोंडेपणामुळें आला
इशेच्छा ही माया स्वभासम रंजवीत कीं त्याला ॥ १२ ॥
खोटा खेळ खऱ्यासम खुलवाया सृष्टि सर्व ब्रह्मांडीं
पिंडीं ही नरतनु कीं निर्मियली जेवि जादुची कांडी ॥ १३ ॥
औट अशा हाताच्या मायिकमूर्तीस सूज्ञ कीं काया-
म्हणती मुळें नकाया, छाया झपटेल हीच ती माया ॥ १४ ॥
दिसते वामनमूर्ती जीनें त्रैलोक्य व्यापिलें होतें
बळिचे बलिष्ट नेलें राज्य सकल कीं रसातळा हो तें ॥ १५ ॥
एकांता कंटाळुनि द्वैतीं आल्यास दुःख जाणवतें
तीनच माडा धोंडे म्हणजे त्रिभुवन लगेंच आठवतें ॥ १६ ॥
गति, अवगति, निर्गति, या सर्वां सद्गति नराविणें नाहीं
चक्रव्यूह भवाचा भेदाया हाच शक्त कीं पाहीं ॥ १७ ॥
निःशेष ब्रह्माची सुरेश मूर्तीच नरतनू आहे
नित्य नवनव्या रूपें अनेक वेषें स्वयेंच कीं पाहे ॥ १८ ॥
पाहुनिया वाटे कीं नरदेहाची अशी उभी रचना
ऊर्ध्वगती सिद्धाचि कीं परि हा इकडे कधींहि पाहिचना ॥ १९ ॥
नरहरि अगम्य लीला थबकुनि आश्चर्यवत जणूं पाहे ।
कीं दास मारुती हा आत्मारामापुढें उभा आहे ॥ २० ॥
कर्मेंद्रियें खांद्यावरि ज्ञानेंद्रिय कावडीच कीं वाहे ।
इहपर रामेश्वर कीं काशी यात्रेस चालला आहे ॥ २१ ॥

इद्रिय दशकासह मन एकादश मणि रचुनियां अकरा ।
घेउनि ऐसा हारा गौळणही चालली जणूं मथुरा ।। २२ ।।
शिर हें कलशस्थापन विधि करि कीं सत्यदेव पूजाया ।
नरनारी देहानें उभयात्मक जाहला पती जाया ।। २३ ।।
ज्ञानामृत कलशचि कीं आहे भव देउळावरी कळस ।
कीं विधि कौशल्याचा झाला नरदेह हाच हो कळस ।। २४ ।।
ज्ञानाधिष्ठित नरशिर अकर्म केल्या उरीं भरवि धडकी ।
ज्ञानाचा कर्मावर दाब पडुनि कर्म होतसे धड कीं ।। २५ ।।
नेत्रांतर्गत बाहुलिसम पाही सर्व विश्व दृष्टीनें ।
सूक्ष्मज्ञान लयातें मायिक ही स्थूल विश्व दृष्टी ने ।। २६ ।।
तिर्यङ्नरास समसम वागवितो प्राणवायु दोघातें ।
दैहिकदृष्ट्या देतो जन्म, जरा, व्याधि, मृत्यु भोगातें ।। २७ ।।
" पशुका होत पन्हया नरका कछु होत नहि " असें म्हणती ।
" नरका नारायण " ही करणी केल्यास त्यास बुध वदती ।। २८ ।।
परि बुद्धिबळें नर हा स्वेच्छें अधिकार पूर्ण चालवितो ।
गज, वाजि, उष्ट्र, फरजी, सैनिकनाशें नृपास वाचवितो ।। २९ ।।
ठेवण पशुशरिराची पाहुनि वाटेल इंद्रियें ज्याचीं ।
ज्ञानेच्छेनें डोकें उन्नत होण्यात त्यास कीं जाची ।। ३० ।।
ज्ञानेंद्रियें शिराला चिकटति कर्मेंद्रियें जणूं उदरा ।
वाटे देह पशूचा ' सुंदरसा आडवाच डोलारा ।। ३१ ।।
कर्ण असुनिही बहिरे नयनान्वित अंधसेच कीं दिसती ।
मुख आहे जिव्हा ही परि पशु कीं मुक बोबडे असती ।। ३२ ।।

तोंडानें घ्राताचें नेत्रानें कर्णकार्य भागवितो ।
चक्षुःश्रवा म्हणवितो उरग उरानेंच चपल कीं पळतो ॥ २३ ॥
मन असुनि मढ जैसे पशुचें कीं इतर इंद्रियें असती ।
नर एक पूर्ण ज्याच्या देहीं सपूर्ण इंद्रियें वसती ॥ २४ ॥
पशु राहिलें उभें तरि डोक्यासह पोट आडवें असतें ।
उत्क्रांतिपथीं म्हणुनी ज्ञानें शिर होतसे न तें वरतें ॥ २५ ॥
मानस सरोवराचा **मानव** हा राजहंस कीं आहे ।
नित्यानित्य अशा या नीरक्षीरास निवडतो पाहे ॥ २६ ॥
इहपर फलभोगातें औदासीन्यें उपेक्ष्य जो मानी ।
ज्ञानी स्वर्गा नरका भोग म्हणूनि दूर सारि जोमानी ॥ २७ ॥
कष्टातें न जुमानी साध्य करी शमदमादि षट्कातें ।
अधिकारी तोच असे धारण करण्यां मुमुक्षु पदकातें ॥ २८ ॥
नरतनुच्या नौकेला सगुणोपासन सुकाणु लावावें ।
सज्जनसंगसमीरें सहज सुलभसे सुमार्ग साधावे ॥ २९ ॥
गुरुकर्णधार साह्यें भवसागरिं तरुनि जाय सहजगती ।
धन्यचि ते नर होती साधुनि इह **यश** सुकीर्तिसह जगती ॥ ३० ॥

## ६८ माया उर्फ कल्पनाराणी

‘ मा ’ म्हणजे नाहीं ‘ या ’ म्हणजे जी सरळ अर्थ हा पाही
मायामय सृष्टी ही ‘ माया ’ म्हणजे मुळांत जी नाहीं ॥ १ ॥
दोरीचा सर्प खरा असता तर तो कधीं न आवरता
स्वप्न दिसे परि कोठें, डोळे उघडोनि पाहता पत्ता ? ॥ २ ॥
आभासें सर्प दिसे, विपरीताचा स्वभाव मनुजातें
भासवि भयकपादिक नूतनसृष्टीमुळें, जुनी जाते ॥ ३ ॥
भ्रमवि शिरावर बसुनी कीं ही शिरजोर कल्पना आम्हा
प्राणी निजला तरि हो, स्वप्नमिषें नेत आणिका धामा ॥ ४ ॥
देहगडी कीं फिरतो जिकडे फिरवील कल्पनाराणी
जैसे सैरावैरा प्राणी पश्वादि फिरति कीं रानीं ॥ ५ ॥
सौभाग्यवती जैशी आहे तैशीच अष्टपुत्राही
त्रिगुणें पचहि भूतें प्रसवुनि मनुजां करीतसे त्राही ॥ ६ ॥
ही अक्षय्यसुवासिनि वरिलें ईनें अखड जीवातें
जरि तो आत्मज्ञानें मृत तरि त्याच्यासवें सती जाते ॥ ७ ॥
“ देहोऽहं ” ही बाधा बसवि उरावरि शिरीं स्वयें राहे
जी बारसे सुखाचें दु खाच्या बारव्यासही पाहे ॥ ८ ॥
जेथें आत्मा आहे तेथें ही कल्पना सदा राही
परि कल्पनेंत आत्मा किंवा आत्म्यांत कल्पना नाहीं ॥ ९ ॥
परतर तो परमात्मा पार न ज्याचा परादिका पाही
परि हो ! भाव परात्पर, स्वपर, अपर त्यां परात्परा नाहीं ॥१०॥

कर्माकर्म विकर्में गुणसगतिनेंच कर्म ओढवतें
चौऱ्याशि लक्ष योनी फिरवुनिया मुक्तिहेतु आडवितें ॥ ११ ॥

करि जो विवेकमार्गें आधीं आरंभ कर्मयोगातें
त्या कर्माचा पाया वसतो कीं शेष मस्तकावरते ॥ १२ ॥

पृथ्वी व्यापुनि जेव्हा झालें नाहींच तत्व नि शेष
त्यास धराधर म्हणती उरला अवशेष म्हणुनिया शेष ॥ १३ ॥

अहमादि गुणें अमच्या व्यापुनिया नखशिखान्त अवशेष-
उरलों अम्हि साक्षित्वें परि विषयें मूर्तिमंत विषशेष ॥ १४ ॥

तो नर अलिप्त तूर्या साक्षित्वें सर्व कर्म जो करि घे
नातरि "कर्ताहं" या भावें कर्मांत जेवि तोक रिघे ॥ १५ ॥

गुरुबुद्धिविशेषानें झाल्या आरंभ शुद्ध कर्माला
ते शुद्ध कर्म पोंचवि अखंड आनंदरूप आत्म्याला ॥ १६ ॥

स्थूल विचारें नच जो ठेवी परमात्म वस्तुचें ध्येय
बहुमतवादी बनवी किंवा तें कर्म त्यास "अज्ञेय" ॥ १७ ॥

नैय्यायिक, वैशेषिक, शैवहि, शाक्तादि, जैन, अद्वैती,
योगी, भोगी, त्यागी, मीमासक, मध्व, साख्य, वेदांती ॥ १८ ॥

मत्त, "अहभाव" करी मताभिमानास धरुनि जो चाले
शंका आणि कुशका त्याच्या हृदयात टोचिती भाले ॥ १९ ॥

रुतल्या पायीं कांटा म्हणतो 'प्रारब्धवादि' "दैवानें—
घडणें असें, न चुकतें जरि गेल्या सरळ नीट रस्त्यानें" ॥२०॥

धर्माधर्म विवेचक म्हणतो "अपराध होत पन्नास—
पायीं काटा रुततो, द्यावा नच दोष काहीं अन्यास" ॥ २१ ॥

म्हणतो प्रयत्नवादी ‘ मार्गानें नीट पाहुनी चाला ’
चदतो स्वभाववादी ‘ काट्यावरि पाय नेमका पडला ’ ॥ २२ ॥
ऐकुनिया या वृत्ता म्हणतो ‘अज्ञेयवादि’ कीं “गूढ”
कोणी काहिं विचारा आश्चर्ये होउनी बसे मूढ ॥ २३ ॥
चार्वाक वदे तेव्हा ‘काटा तत्काळ काढुनी टाका ’
वैशेषिक हित सांगे “कांट्यानें काढितात वा ! कांटा ” ॥२४॥
‘शिक्षा द्यावी’ म्हणतो झाडूवाल्यास कायदा-वादी
दूजा म्हणतो ‘ऐशा वादावादेंच वाढती वादी’ ॥ २५ ॥
कोणी म्हणतो “दादा, वादविवादात फायदा नाहीं ”
कोणी म्हणतो “होतो वादानें तत्त्वबोध कीं पाहीं” ॥ २६ ॥

---

## ६९ मायेची मगरमिठी.

ब्रह्मातून निघालें जें कां ब्रह्माड एक वाटोळें
आहे, झालें, होतें, परि अतीं एकदांच वाटोळें ॥ १ ॥
पंचमहाभूतात्मक पंचांगुलिच्या मुठींत सांठवतें
विश्वां ज्ञानी म्हणतो माया कीं स्वप्न एक आठवतें ॥ २ ॥
सर्वगत ब्रह्मपरी अवगत उमगत नसेच कोणाला
कैसें ये बोधाला बोधकता स्वस्ववेद्यता ज्याला ॥ ३ ॥
सोऽहं-हंस-स्वरुपें शिष्यगुरु-युग्म होत अवतरण
सोऽहं हें सर्वांचें गेल्यानें स्मरण ओढवे मरण ॥ ४ ॥

सोऽहं या साह्यानें राखे जरि सौंवळ्याच सद्रूपा
हंसस्वरूप होउनि राहे कीं नर जपोनिया अजपा ॥ ५ ॥
सहज जरी जप घडतो अजपाचा जप जपोनिया जपणे-
लागे इतरां परि कीं याला हें बुद्धिपूर्वकें करणें ॥ ६ ॥
मारावें नच मन कीं मुरवुन मिरवून त्यास रमवून
लावावें मननाला सगुण-भजन-पूजनास शिकवून ॥ ७ ॥
आत्मानात्मविवेकें गुरुबोधें गुरुवाळि ती उमजे
कीं गौप्य '**तत्त्वमसि**'चें मृगनाभींतील कस्तुरी सम जें ॥ ८ ॥
शास्त्रगुरु-प्रतितीच्या त्रिवेणि संगमिं करोनि मज्जन जो
साधुनि इह, पर संध्या संसृतितर्पण करीत सज्जन तो ॥ ९ ॥
संसाराचर पाणी सोडुनि संकल्प-संत जेववितो
तृप्त जरी स्वानंदें निज जठरा कीं प्रसाद सेववितो ॥ १० ॥
कर्मभ्रष्ट कसा तो वेदांती आपणां म्हणवि मुक्त
मौंजीबंधन झाल्या कर्मांतचि मरण त्यास कीं युक्त ॥ ११ ॥
मृत्युभयें जो दडतो मित्रें बालक अशास हो ! माना
विन्मुख जो वैराग्या शृंगरहित कीं द्विपाद तो जाणा ॥१२॥
नयनविना अवलोकन सुरतेवीण सौख्य जें साचें
ज्ञातृ, ज्ञेय, विना जें ज्ञात्याचें रूप तेंच आत्म्याचें ॥ १३ ॥
संपत जाणारी जी नवल गमे तीस म्हणति संपत्ती !
संतत जी नच राहे तीस कसें बुधहि संतती म्हणती ! ॥१४॥
मायेची मगरमिठी सोडवि जो तोच पूत मायेचा
जातो गर्भीं रतिनें पति परि तो होत पूत जायेचा ॥ १५ ॥

हा उदरीं धरि देहा हा ! हा ! तेव्हाच दुःख सांगाती
आला, केला, मेला, झाला मातीस मिळुनिया माती ॥ १६ ॥
निजजागृतिनें जिरतो जाल जगद्भास जागिच्या जागीं
जागा तो सद्रूपा जाणुनियां जाणवी जगालागीं ॥ १७ ॥
हटयोगी जें साधी योग नव्हे तो वियोग जाणावा
नाहीं तळमळ हृदयीं अभक्त नर तो पशूच मानावा ॥ १८ ॥
तप नच तें तापत्रय तपशामक ज्या तपांत हरि नाहीं
सांसारिक संतापें ज्ञानतपन पतन होतसे पाही ॥ १९ ॥
होई तप विद्रूपाचि हरिच्या चिद्रूप चिंतनें वीण
शुद्धस्वरूपशोधन सोडुनिया मूर्ति पूजणें शीण ॥ २० ॥
जें नाहीं बौद्धिक तप तापद तें तपचि होय संतापा
तापत्रय नच हरि तें सद्गुरु बोधेंच शांतवी बापा ! ॥ २१ ॥
संतत शुद्धाचरणीं अंतरिं बाहेरिं **एक तो संत**
सर्वांतरीं प्रभु जाणुनि जिंकी कलिकाल तोच **यशवंत** ॥ २२ ॥

---

## ७० जीवन्मुक्तानंदलहरी [ वृत्त—शिखरिणी

पुरे पौरान्पश्यन्नरयुवतिनामाकृतिमया- । न्सुवेशान्स्वर्णालंकरणकलिताश्चित्र-सदृशान् ॥ स्वयंसाक्षीद्रष्टेत्यपि च कलयस्तैसह रमन् । **मुनिर्न व्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः** ॥ १ ॥

जगीं पाहोनीया नरयुवति सर्वांस सम, जे—
सुवर्णालंकारें नटति परि त्या चित्र समजे

स्वयें क्रीडे, स्वेच्छें निरत जरि ऐसा मुनि दिसे
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ १ ॥**

क्वने वृक्षान्पश्यन्दलफलभराच्चम्रसुशिखा- । न्घनच्छायाच्छन्नान् बहलकलकूज-
द्विजगुणान् ॥ भजन् घस्रोएवादवनितलकल्पैकशयनो । **मुनिर्न व्यामोहं० ॥२॥**

फलानीं, पुष्पानीं तरु दिसति जे नम्र बरवें
घनच्छाया त्यांची, सुखद गमल्या कोकिलरवें-
रमे तेथें स्वेच्छें, जनिं वनिं, कुठेंही जरि वसे
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ २ ॥**

कदाचित्प्रासादे क्वचिदपि च सौधेषु धनिना । कदाकाले शैले क्वचिदपि च कूलेषु
सरिताम् ॥ कुटीरे दान्तानां मुनिजनवराणामपि वसन् । **मुनिर्न व्यामोहं० ॥३॥**

कधीं हर्म्यीं केव्हां धनिक गृहिं माडीवरि बसे
कधीं शैलाग्रीं हा कधिं नदितटीं जाउनि वसे
जसें श्रीमंतांच्या सदनिं, उटजीं राहत तसें
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ ३ ॥**

क्वचिद्बालै. सार्धं करतलगतालैश्च हसितै । क्वचित्तारुण्यालङ्कृतनववधूभि
सह रमन् ॥ क्वचिद्वृद्धैश्चिंताकुलितहृदयैश्चापि विलपन् । **मुनिर्न व्यामोहं० ॥४॥**

कधीं खेळे टाळ्या पिटुनि शिशु बाळासह मुदें
कधीं स्वेच्छें क्रीडे, तरुण वधुशीं, तीस सुख दे
कधीं केव्हा वृद्धासम सतत चिंताकुल दिसे
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ ४ ॥**

कदाचिद्विद्वद्भिर्विविदिषुभिरत्यन्तनिरतै कदाचित्काव्यालङ्कृतरसरसालै.
कविवरै. ॥ कदाचित्सत्तर्कैरनुमितिपरैस्तार्किकवरै ॥ **मुनिर्न व्यामोहं० ॥५॥**

कधीं वक्तृत्वानें विबुध मुखि विद्वास म्हणवी
कधीं संतोषानें रसभरित काव्या प्रगटवी
कधीं वादें तर्कें निवचि खलही तार्किक तसे
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ ५ ॥**

कदाध्यानाभ्यासै क्वचिदपि सपर्यां विकासितै । सुगन्धै सत्पुष्पै क्वचिदपि दलैरेव विमलै । प्रकुर्वन्देवस्य प्रमुदितमना सनतिपरो । **मुनिर्न व्यामोहं० ॥ ६ ॥**

कधीं ध्यानाभ्यासीं अविरत मुदें मग्न असतो
करीं घेवोनीया कुसुम, तुळसी बिल्वदल तो
प्रभू भक्ता ऐसा प्रमुदित मनें पूजनि बसे
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ ६ ॥**

शिवाया शम्भोर्वा क्वचिदपि च विष्णोरपि कदा । गणाध्यक्षस्यापि प्रकटित-वरस्यापि च कदा॥पठन्वै नामालीं नयनराचितानदसलिलो। **मुनिर्न व्यामोहं०॥७॥**

गणाधीशा, ईशा, स्तवित हृषिकेशा कधिं शिवा
कधीं प्रेमें बाहे वरदसुरवृंदाग्रजशिवा
कशाही देवांची पठणकरि नामावलि तसे
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ ७ ॥**

कदा गंगाम्भोभि क्वचिदपि च कूपोस्थसलिलै । क्वचित्कासारोत्थै क्वचिदपि सदुष्णैश्च शिशिरै ॥ भजन् स्नान भूत्वा क्वचिदपि च कर्पूरनिभया ॥
**मुनिर्न व्यामोहं० ॥ ८ ॥**

करी गंगेमाजी तटिनि तटिं हा मज्जन जलें
कधीं हा, कासारावरिहि, शिशिरीं उष्णसलिलें
कधीं भस्मस्नानां न करि तरि अन्या शुचि दिसे
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ ८ ॥**

कदाचिज्जागृत्या विषयकरणै संव्यवहरन्कदाचित्स्वप्नस्थानपिच विषयानेव च भजन्॥
कदाचित्सौषुप्तं सुखमनुभवन्नेव सतत ॥ **मुनिर्न व्यामोहं०** ॥ ९ ॥

कधीं लोकां वाटे विषयरत हा जागृतिंतही
कधीं स्वप्नामाजी नच अनुभवी स्वप्न लवही
खऱ्या सौख्या भोगीं जरि कधि सुषुप्तींतहि असे
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ ९ ॥**

कदाप्याशावास क्वचिदपि च दिव्यांबरधर ॥ क्वचित्पंचास्योत्था त्वचमपिदधानः कटितटे ॥ मनस्वीं नि सग सुजनहृदयानंदजनको ॥ **मुनिर्न व्यामोहं०** ॥१०॥

कधीं आशावस्त्रें[1] तनुवरि कधी शाल मिरवे
कधीं भस्मी रंगे, कटिस कधि व्याघ्रावर नवें
कधीं वागे ऐसें सुजन हृदयीं मोद विकसे
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ १० ॥**

कदाचित्सत्त्वस्थ क्वचिदपि रजोवृत्तियुगत–॥स्तमोवृत्ति क्वापि त्रितयरहित क्वापि च पुन ॥ कदाचित्संसारी श्रुतिपथविहारी क्वचिदहो ॥ **मुनिर्न व्यामोहं०** ॥११॥

कधीं हा सत्त्वाचा गमत पुतळा, राजसि तसा
कधीं कोणा तीन्ही गुणरहित, वा, तामसि असा
कधीं ससारीं, हा, श्रुतिपथ[2]विहारी कधि दिसे
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ ११ ॥**

कदाचिन्मौनस्थ क्वचिदपि च वाग्वादनिरत ॥ कदाचित् सानंद हसतरभसात्यक्त-वचन ॥ कदाचिल्लोकानां व्यवहृति समालोकनपरो ॥ **मुनिर्न व्यामोहं०** ॥१२॥

कधीं मौनी जैसा गमत कधि वाचाळहि तसा
कधीं हास्यें भासे विकच[3], कधि हा सस्मित असा

---

१ दिगबर. २ कर्मठ. ३ पसरलेलें.

कधीं हा दीनांचें दुरित हरि देशाटण मिषें
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ १२ ॥**

कदाचिच्छक्तीना विकचमुखपद्मेषु कवलान् ॥ क्षिपस्तासा क्वापि स्वयमपि च गृण्हन्स्वमुखत ॥ तदद्वैत रूप निजपरविहीन प्रकटयन्॥**मुनिर्न व्यामोहं०॥१३॥**

कधीं दिव्यस्त्रीच्या विकच मुखपद्मां भुलुनिया
स्वयें घेई, घाली कवल[1] मुखिं, स्वत्वा स्मरुनिया
अभेदाद्वैतातें जणुं प्रगटवी लौकिक मिषें
**परी तो मोहेना गुरुघन कृपा ज्यावरि असे ॥ १३ ॥**

क्वचिच्छैवै सार्धं क्वचिदपि च शाक्तै सहवसन् ॥ कदाविष्णोर्भक्तै क्वचिदपि च सौरै सहवसन्। कदा गाणापत्यैर्गतसकलभेदोऽद्वयतया॥**मुनिर्न व्यामोहं०॥१४॥**

कधीं सौरस्मार्ता सम, तरि कधीं शाक्त दिसतो
कधीं गाणापत्यापरि, गमत सद्वैष्णवहि तो
जनां कीं दावी हे वसत जगिं अद्वैतचि कसें ?
**परी तो मोहेना गुरुघनकृपा ज्या वरि असे ॥ १४ ॥**

निराकार क्वापि क्वचिदपि च साकारममलं ॥ निज शैवं रूप विविधगुणभेदेन बहुधा ॥ कदाश्चर्यं पश्यन्किमिदमिति हृष्यन्नपि कदा ॥ **मुनिर्न व्यामोहं० ॥ १५ ॥**

कधीं साकाराते तरि, कधिं निराकार पदवी
'**शिवोऽहं**' या रूपा विविध गुणभेदें प्रगटवी
कधीं आश्चर्यानें बघत कधिं हा तुच्छहि तसें
**परी तो मोहेना गुरुघनकृपा ज्यावरि असे ॥ १५ ॥**

कदाद्वैतं पश्यन्नखिलमपि सत्य **शिवमयं।** महावाक्यार्थानामवगत समभ्यासवशत ॥ गतद्वैताभासा शिव शिव शिवेत्येव विलपन् । **मुनिर्न व्यामोहं०** ॥ १६ ॥

---

१ घास.

वधे अद्वैतानें शिवमय जगज्जाल परि तो
महावाक्यार्थातें सुलभ वदण्या यत्न करितो
कधीं भेद द्वैता विरहित ' **शिवोऽहं** ' म्हणतसे
**परी तो मोहेना गुरुघनकृपा ज्यावरि असे ॥ १६ ॥**

इमां मुक्तावस्था परमशिवसंस्था गुरुकृपा-।
सुधापाङ्गावाप्यां सहजसुखवाप्यामनुदिनम् ॥
मुहुर्मज्जन्मज्जन्भजति सुकृतैश्चेन्नरवरः ।
सदा त्यागी भोगी **कवि**रिति वदन्तीह कवयः ॥ १७ ॥

अशी मुक्तावस्था, परम **यशदायी** गुरुदया-
जयां झाली आहे सुकृति फलयोगें वश तया-
**कवी**, त्यागी, भोगी विबुध कवि संबोधिति, तरी-
अशा **जीवन्मुक्ता** दिसत जग **आनंदलहरी** ॥ १७ ॥

मौने मौनी गुणिनि गुणवान्पाडिते पडितश्च ॥
दीने दीन सुखिनी सुखावान्भोगिनि प्राप्तभोग. ॥
मूर्खे मूर्खो युवतिषु युवा वाग्मिनि प्रौढवाग्मी ॥
धन्य. कोऽपि त्रिभुवनविजयी योऽवधूतेऽवधूत· ॥ १८ ॥

मौनी मौनयुतीं, गुणी गुणवतीं, विद्वांसविद्वज्जनीं
दैन्यें दीनजनीं, सुखीं ससुख जो भोग्यांत चूडामणी
मौर्खें मूर्खजनीं, युवा तरुणिला, वक्त्यात वाग्भासतो
**त्रैलोक्यीं मग धन्य कीं सुचरितें सिद्धावधूतांत तो१८**

मु. माणिकनगर,
रविवार मार्ग. शु ८ श. १८४८

## ७१ नांवाची नवलाई.

[ वृत्त–अभंग

नाव आहे सुंदराबाई ।
डोळा एकच नाकहि नाहीं ॥ १ ॥
नाव सांगे अन्नपूर्णा ।
एक शीतहि ना दे कोणां ॥ २ ॥
नाव ऐका हरणाबाई ।
दोन खाचा बुबुळाचि नाहीं ॥ ३ ॥
नाव नाजुक बकुळा वदते ।
द्रोणासह जी पोळी गिळिते ॥ ४ ॥
जन्मसावित्रीचा तोरा ।
लग्नरात्रीं मेला नवरा ॥ ५ ॥
नाव लक्ष्मीबाई सांगे ।
जन्मापासुनि भीक मागे ॥ ६ ॥
नांव ऐका चंपाबाई ।
नाकाचा तर पत्ता नाहीं ॥ ७ ॥
नांव सांगे अहिल्याबाई ।
उष्टे तेंही टाकित नाहीं ॥ ८ ॥
नांव शांताताई सांगे ।
नाकानें तर सोली वागें ॥ ९ ॥
नउ रत्नाची ही माला ।
नच शोभा–फांस गळां ॥ १० ॥
ऐशी नावांची नवलाई ।
वाटे कांहीं, प्रत्यय कांहीं ॥ ११ ॥

शालीबंडा हैद्रा. द०
सोमवार, फा. शु. १० श १८४७ }

## ७२ नांवाचे नामधारक

[ वृत्त—अभंग.

नाव आहे सुंदरपंत
कुबडा, तिरळा वक्रदंत ॥ १ ॥
नाव ऐका धर्मदत्त
दारीं साऱ्या धक्के देत ॥ २ ॥
नाव गौरीशंकर वदतो
काळाकभिन्न शिद्दी दिसतो ॥ ३ ॥
नाव आहे अर्जुनराव
झुरळ पाहता घेतो धांव ॥ ४ ॥
अमृतराय नाव ज्याचें
श्राद्ध होतें काल त्याचें ॥ ५ ॥
नाव ऐका राजा कर्ण
कवडि देता येतें मरण ॥ ६ ॥
नाव आहे नृसिंहशास्त्री
कुत्रीं घुसती दिवसा रात्रीं ॥ ७ ॥
नांव सांगे बळभिमदादा
कळाशि नेतां अपटे दहादां ॥ ८ ॥
नाव म्हणतो गंभिरराव
एक पळांत पंध्रा भाव ॥ ९ ॥
ऐसे नावाचे नऊ रत्न
वेळ पडतां न चले यत्न ॥ १० ॥
नाव जैसें यशवंत
पदोपदीं अपयश येत ॥ ११ ॥

शालीबंडा हैद्रा. द०
सोमवार, फा. शु. १० श. १८४७ }

## ७३ नववत्सर*

[ वृत्त–यूथिका.

स्वागता करितसे नववत्सरा !
आगमा तव विलोकुनि ही धरा
वाटते अतिव हर्षुनि सुंदरा
येत कीं लगबगेंच वसुंधरा ॥ १ ॥
ही उषा जणुं गुलाल तवागमें–
हर्षुनी उधळिते अजि कीं गमे
केशरा अरुण टाकितसे सडा
पाहरा करित कीं ध्वजही खडा ॥ २ ॥
कोकिला प्रतुर गात असे मुदें
वंश कीं मधुर सूरहि त्यास दे
वीचिका श्रवुनिया मधुगान तें
मोद कंपित अशी जणुं नाचते ॥ ३ ॥
काय हा धबधबाच धडा धडा
सारखा झडतसे जणुं चौघडा
शैलही नच प्रतिध्वनि देतसे
वाटते सतत ताल धरीतसे ॥ ४ ॥
वृक्ष जे गलितपर्ण तया नवी
दिव्यशी फुटुनि नूतन पालवी
कहिं ते मधु फलान्वित जाहले
आगमें तव गमे जणुं हांसले ॥ ५ ॥

*ही कविता चित्रमयजगत् मे १९२८ च्या अंकांतून प्रसिद्ध झाली आहे.

उंच ही द्रुमलता तुज पाहते
गुल्मिनी अधिर होउनि धावते
गुच्छकें नटुनि मानसहारिका
स्वागता जणुं निघे अभिसारिका ॥ ६ ॥

आम्र हा धन हि दे जरि सांवली
ही लता तरि पुढें सरसावली
त्यागुनी अगम-आश्रय आज का
धावते म्हणुनि पाहत सारखा ॥ ७ ॥

आज कीं तुजशि लोक विलोकुनी
हर्षुनी म्हणति धन्यचि तूं जनीं
हर्षिता गमत आज जशी धरा
होइ गा ! सुखद नूतन वत्सरा ॥ ८ ॥

धावती सकल कीं तुज पाहण्या
कां बरें दिसति ना नभिं चांदण्या !
लाजल्या लपविल्या स्वमुखां झणीं
लोपती विषय कीं सकृत क्षणीं ॥ ९ ॥

लाभते क्षणहि ज्यास सुचिंत न
केविं तो सुख बघेल चिरंतन
वासना अपुरि कीं सुखयाचना
सर्वदा करविते जगिं याचना ॥ १० ॥

अंतरीं स्वसुख—शांति न अंतरीं
ना तरी सुख मिळेल वनांतरीं

नाचवी मन जिथें सुख ना चवी
दाखवी सुख कुठेंहि सदा कवी ॥ ११ ॥
आगमें तव फुटे नव पालवी
दाखवी सुदिन सत्वर हर्षवी
होऊं दे गलित पर्णचि दुर्दिन
घालि गा ! त्वरित जीवन नूतन ॥ १२ ॥

---

## ७४ स्वागत

[वृत्त—स्वागता.

स्वागता करित आज उषा ही
या दिशा उजळवी बघ दाही
सांगते जणुं असें जगताला :—
हा अतांच नववत्सर आला ॥ १ ॥
स्वागतार्थ जणु मेदिनि आली
भूषणें कितिक हर्षुनि घाली
नेसुनी वसन दिव्य निघाली
कचुकी हरित त्यावरि ल्याली ॥ २ ॥
कुंकुमाक्त टिकली नव भालीं
आलि गालिं मधुर स्मितलाली
शालु कीं फडकवी जरतारी
घाइ आजचि निराळिच सारी ॥ ३ ॥

आगमास तव दाखवितांना
कोकिला मधुर ऐकवि ताना
का कवीसहि सुचे कविता ना,
सृष्टि कीं म्हणत 'ऐकवितांना' ? ॥ ४ ॥
केविं ठेविल अशा समयाला
स्फूर्तिहीन दगडासम याला
कीं निसर्ग मधु हास्य मुखानें-
तोषवी पिकहि मजुल गानें ॥ ५ ॥
मोद हा अजि कसा भ्रमराला—
जाहला वध तसा कुमुदाला
रुजि ऐकवुनि कीं भ्रमवीला
रजवी उलट ती भ्रमराला ! ॥ ६ ॥
शैल, अद्रि, गिरि, वप्र पहाना
उंच कीं करुनिया निज मानां
सौध, हर्म्य, गृह एकमतानें
पाहती तुजशि उत्सुकतेनें ॥ ७ ॥
हेंच काय वसुधा प्रिय होती
एक हा अरुण आणि उषा ती
**स्वागतास** तव पाठवितांना
योग्य ना गणत आणिक कोणां ॥ ८ ॥
बाभळी विपुल पाहुनि रानीं
वाटते पुसति कां नच कोणी

माधवी मधुलता म्हणवीते
दोन तीनच फुलें फुलवीते ॥९॥
वृक्षपल्लवित सर्वचि झाले
सारखेंच नवजीवन आलें
कृष्णसार-रुरुयूथ पहा हे
स्वागतार्थ जणु धांवत आहे ॥ १० ॥
आम्रराजि नववल्लरि वाहे
सर्वदा हृदयिं आदर वाहे
त्वत्पदीं तरिच सादर राहे
तत्फलीं म्हणुनि माधुरि आहे ॥ ११ ॥

REFBK-0004935

---

**७५ मंगलनाम.**

श्री गणराया पाहूं चला या ॥ मंगल नामां गाऊं चला या
समर्थ जें यम भय पळवाया
दवडुं नका जन हो पळ वाया
दुरित आपदा झणिं पळवा या ॥ मंगल० ॥ १
विद्यारंभीं गुरु या नामां
शिकविति श्रीगणेशायनमः
हेंचि सदा यशवंताचि आम्हां ॥ मंगल० ॥२॥

[ अपूर्ण

" ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते "



५९३५